

# माणूस

शनिवार
७ सप्टेंबर १९७४
एक रुपया

# १ सप्टेंबर

१ सप्टेंबरला पुण्याच्या शिवाजी मंदिरात सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ प्रा. वि. म. दांडेकर यांचे भ्रष्टाचार निर्मूलन या विषयावर भाषण झाले. सुबोध विश्लेषण व नर्मविनोदी खोचक शैली, यामुळे भाषण चांगलेच रंगले, उद्‌बोधकही झाले. तरीपण काही शंका अनुत्तरित राहिल्या, काही उणीवा जाणवल्या.

१ : दांडेकर म्हणाले त्याप्रमाणे लोक प्रतिनिधींनी समजा आपली मिळकत दरवर्षी जाहीर केली; सर्वांना ती पाहायला मिळण्याचीही सोय झाली; पण यामुळे भ्रष्टाचाराला परिणामकारक आळा कसा बसू शकतो ते स्पष्ट होत नाही. आजही प्राप्तीकर अधिकाऱ्यासमोर लोकप्रतिनिधीला आपली मिळकत, उत्पन्न वगैरे प्रकट करावे लागतेच. तरीही हा लोकप्रतिनिधी निवडणुका आल्या की कुठूनतरी पैसा उभा करतो, खर्च करतो. दांडेकरांनाही हे मान्य असावे, की भ्रष्टाचाराचे मूळ, उत्पन्न – मिळकत – पत्रकात न दाखविल्या जाणाऱ्या या वरकड पैशाच्या वापरात आहे. हे पत्रक प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे खाजगीपणे दिले गेले काय किंवा जाहीर ठिकाणी ते उघड मांडून ठेवलेले असले काय, जोवर प्रत्यक्षात वरकड पैसा जमा होत राहणार व खर्चही केला जाणार, तोवर भ्रष्टाचार चालूच राहणार. चोर आडमार्गाने पळाला काय किंवा किंवा हमरस्त्यावरच्या गर्दीत मिसळला काय, जोवर त्याला ओळखण्याची कुठलीच खूण आपल्या जवळ नाही किंवा ओळखल्यावरही त्याला पकडण्याचे धैर्य व शक्ती आपल्याजवळ नाही, तोवर तो निसटत राहणार हे उघड आहे. या निसटत्या चोरांचा बंदोबस्त कसा करायचा हा खरा प्रश्न आहे. यासाठी काहीतरी जालीम उपाय हवेत अशी लोकांची मागणी आहे. दांडेकरांनी सुचवलेला मिळकत जाहीर करण्याचा उपाय आजच्या परिस्थितीत फार मवाळ, दीर्घसूत्री व औपचारिक ठरण्याचा संभव आहे. एक नीतीतत्त्व म्हणून हे बंधन सर्वांनी स्वीकारावे अशी दांडेकरांची अपेक्षा आहे. ती कदाचित पूर्णही होईल. पण जी अवस्था, उदाहरणार्थ, आज खादीची झाली ती अवस्था या नीतीतत्त्वाची होऊन बसली तर ! एक शिष्टाचार आणखी वाढला एवढाच काय तो फरक पडेल. बाकी जाहीर केलेले उत्पन्न आणि प्रत्यक्षात हाती खेळणारा पैसा यातली आजची तफावत कायमच राहणार. म्हणजेच भ्रष्टाचाराला परिणामकारक आळा काहीच बसणार नाही.

२ : सुरुवातीलाच दांडेकरांनी भ्रष्टाचार हा विषय महागाई, काळाबाजार, साठेबाजी, विषमता, चैनबाजी, उधळपट्टी इत्यादी संलग्न बाजूंकडून सोडवून घेतला व अगदी अलगपणे त्याचा विचार केला. त्यामुळे विवेचन-विश्लेषण सुबोध व सरळ झाले, रेखीव झाले पण विषयातला प्राण हळूहळू मावळत गेला. वास्तवाची जमीन सुटली, आजचे संदर्भ दृष्टिआड झाले. चालू आर्थिक अरिष्टाचा एक उद्रेक या दृष्टीने या विषयाकडे समग्र भूमिकेतून वास्तविक पाहायला हवे आहे, उपाययोजनेची दिशा अखेर या अरिष्टावर मात करण्याची

पृष्ठ ३२ वर


निक्सन हे 'पाणीदार' पुरूष आहेत. हे तुझे म्हणणे, नाही पटत बुवा आपल्याला!
वॉटर म्हणजे पाणी गेट म्हणजे दार वॉटरगेट म्हणजे 'पाणीदार'!


कार्टे कुठे ग गायब झाली होतीस?
रॉकेल, धान्य, मीठ, साखर, तेल, तूप गायब होते त्याबद्दल काहीच बोलत नाहीस!


बरेच दिवस माझ्या मनात होते...
...की आपलीही
धिंड गाढवावरून
निघावी !


मुक्काट्यानी सगळं
पाणी पी. म्हणजे
माझ्यावर लफडं
येनार न्हाई !
कुमार जोशी—

# साप्ताहिक माणूस

| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
|---|---|---|---|
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | ७ सप्टेंबर | अंक : पंधरावा |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७४ | किंमत : एक रुपया |


## भटकंती...पुणे...मुंबई...औरंगाबाद...दिल्ली...पाटणा

बिहारसाठी दाही दिशा.

बिहारमध्ये काय चालले आहे ते तपासण्यासाठी सारखा भटकतो आहे.

२१ आणि २२ ऑगस्टला पुण्यात मुक्काम होता. समाजवादी नेते बागाईतकरांशी चर्चा. समांतर राज्यव्यवस्था आणि मूल्यव्यवस्था बिहार चळवळीने दिली पाहिजे असे ते सागत होते.

त्यांच्या डोळ्यासमोर पत्री सरकार होते. पत्री सरकारमधला काही नको असलेला भाग सोडला तर 'इथे आमचे राज्य आहे. घरच्यापासून तर राजकारणापर्यंतच्या सर्व प्रश्नांची सोडवणूक आमचे पर्यायी सरकार करील' अशी ब्रिटिशांना धडकी भरवणारी पत्री सरकारची भूमिका.

बागला देशातही हाच प्रकार थोड्याफार फरकाने होता. मुक्ती वाहिनी किंवा स्थानिक सरकारलाच कर द्यावे लागत होते, पाकिस्तान सरकारचा अंमल जवळ जवळ धुडकावूनच लावण्यात आला होता.

एक प्रयोग म्हणून काही जिल्ह्यात असा एक प्रयत्न व्हावा असे बागाईतकरांना वाटत होते.

थोडासा वेगळा माणूसही पुण्यात भेटला. वाडिया कॉलेजचे प्राध्यापक व. द. देशपांडे, आता 'ग्रामायन'चे अध्यक्षही झाले आहेत.

तसा प्राध्यापक माणूस. पण बिहारच्या चळवळीतून आशा बाळगीत होता. आम्हाला इझम-बिझमच्या चर्चेचा कंटाळा आला आहे. नीट साधेसुधे व स्वच्छ जीवन जगू देण्याची व्यवस्था व्हायला हवी. किंमतीवर नियंत्रण नाही राहिले, आर्थिक परिस्थिती-वर लगाम नाही राहिला तर देश आता खड्डयात जाण्याच्या मार्गा-वर आहे अशी तिडीकेची मांडणी देशपांडे करीत होते. प्राध्यापक मंडळींना चर्चेचा कंटाळा येणे म्हणजे काहीतरी घडतय नक्की.

बिहारहून येणाऱ्या बातम्या गोंधळून टाकणाऱ्या आहेत. चळवळ चांगलीच मुळे धरीत आहे असे तेथून येणाऱ्या काही बातम्या सांगताहेत. सरकार चळवळ थंड झाल्याचे सागत आहे. पूर-परिस्थितीला अनुलक्षून कृपया चळवळ स्थगित ठेवा असे सांगण्याची पाळी येणे ही गोष्ट पुरेशी बोलकी आहे.

२३-२४-२५ औरंगाबादेत. लोकांना उत्सुकता आहे. २३ ला लायन्स क्लबमध्ये भाषण होते. तेथेही कॉंग्रेसला अनुकूल असणाऱ्यांची बिहारबाबत उत्सुकता जाणवत होती.

१८ तारखेला औरंगाबादला झालेली युवक जनसंघर्ष समितीची बैठक झाली होती. औरंगाबादेत महाराष्ट्रात भ्रष्टाचार-महागाई विरोधी आंदोलनासाठी ही समिती वर्ध्याला युवकांनी तयार केली आहे, जयप्रकाशजीचा आशीर्वाद होता. पण वरील बैठकीचे चित्र निराशाजनक होते. अखील भारतीय विद्यार्थीपरिषदेचा सहभाग संशयास्पद होता. युक्रांद काय करणार याबाबत समिती संशय बाळगून होती. कारण युक्रांद बोलते आहे एक आणि करते आहे दुसरे असे समितीच्या संयोजकांना वाटत होते.

महाराष्ट्रात काही होईल असे वाटत नाही.

दिल्लीत काही चाचपणी करावी हा विचार केला.

२६ ला मुंबईत मुक्काम.

मुंबई तशी थंड आहे. मुंबईचे स्वत:चे प्रश्न आहेत. रॉकेल नाही. मीठ नाही. सर्वात स्वस्त मीठ म्हणून केवळ प्रतिकाच्या स्वरुपात गांधीजींनी एक चिमूट मीठ उचलून आंदोलन सुरू केले.

आता मुंबईत मिठाचा भाव होता पावणे दोन रुपये किलो.

रॉकेल नाही. साठवून ठेवा.

मीठ नाही. साठवून ठेवा.

साबण नाही. साठवून ठेवा.

साठवणुकीसाठी ३ खोल्यांचे गोदाम करा आणि घराच्या गॅलरीत जेवण, झोपणे व राहणे हे कार्यक्रम करा.

मृणालबाई, अहिल्याबाई व त्यांची फौज बिचारी लढते आहे.

बाकी लोक बिचारे कसल्यातरी रांगेत उभे आहेत.

महाराष्ट्रात लोक स्वस्थ आहेत.

एका नव्या अवताराची वाट पहाताहेत. येईल एखादा जयप्रकाश नारायण, करील एखादे आंदोलन.

तेव्हा आम्ही कदाचित पॉकेट मार सिनेमाची काढलेली (काळ्या बाजारात) तिकीटे रद्द करून, (च्यायला, चांगला पिक्चर गेला! च्-च्-च्.)

किंवा तत्सम त्याग करून.

आणि आंदोलनात सहभागी होऊन.

२८ ला दिल्लीत.

येताना गाडीत एक शिपाई लोकांचे सामान तपाशीत होता. सोन्याचे नी लवंगांचे चोरटे साठे पकडण्यासाठी म्हणे.

किलो आणि क्विंटलच्या मापात येणाऱ्या या वस्तूंच्या व्यापारांत वरच्या स्तरावर मंत्री पैसे हाणतो. खाली बिचारा शिपाई ४-६ रुपयांची सोय लावू पहात आहे.

माझ्या पलीकडे काही व्यापारी मंडळी 'तीन पत्ते' खेळत होते. एकजण म्हणाला 'एका दिवसाच्या प्रवासात पत्त्यात २॥-३ शे रुपये घालवायचे आहेत याची तयारीच केली आहे.'

७-८ जण खेळत होते.

अधून मधून चर्चा चालायची (मी चावी मारल्यावर) जयप्रकाशजीच्या आदोलनाची. आणि हे तीन पत्तेवाले मग भ्रष्टाचार नष्ट झाला पाहिजे असे (पैसे मोजीत) सागायचे. हा देश सुधारला पाहिजे असे सागायचे

सकाळी व सध्याकाळी दिवे (गाडीतले) लागल्यावर हात जोडून (रुद्राक्षाची माळ हातात घेऊन) परमेश्वराची प्रार्थना नियमितपणे मडळीनी पार पाडली. मद्रासमध्ये रेस बद केल्याबद्दल मडळीनी हळहळ व्यक्त केली.

—रेसमधल्या घोड्यापेक्षा यानाच जास्त वाईट वाटले. हिंदी सिनेमासाठी कथा लिहिणारा एक माणूस दोस्त बनून गेला.

दर सिनेमाला १५ लाख रुपये XXXX घेतो. त्यातले १-२ लाख व्हाईट व उरलेले ब्लॅक अशी फिल्मी विभागणी त्याने सांगितली. आघाडीवरच्या अनेक नटाचे हिशेब त्याने दिले.

बाळ ठाकऱ्यानी इथे लक्ष द्यायला हवे. मराठी नटाना इतके काळे-गोरे पैसे का दिले जात नाहीत? आदोलनाला नवीन विषय शोधण्यासाठी त्याना आता वसतरावाशी बोलायला नको हा चांगला विषय आहे

दिल्लीत पोहोचलो.

इथला ऐशआराम आहे तसाच आहे. कॅनॉट सर्कलमधील चकचकाट आहे तसाच आहे. बदमाशीचा पैसा दिल्लीत नसानसातून वाहातो आहे त्यात खड नाही. खरेद्या चालू. दारू आहे. सिनेमा-हॉटेल्स भरपूर चालली आहेत. गफूरसाहेब इदिराजीच्या पायाला हात लावण्यासाठी आज इथे आहेत.

बिहारात गेल्या काही महिन्यात ३५००० माणसे देवीच्या साथीत मेली. महापुरानेही हजारोचे ससार उध्वस्त केले आहेत. प्रशासन गप्प आहे. काळाबाजार-भ्रष्टाचार नित्य नियमाने चालूच आहे. गफूरना याची खत नाही.

दिल्लीत ते आले आहेत मत्रीमडळाचा आकार वाढविण्यासाठी.

आणखी भ्रष्ट लोकाना मत्रिमडळात घेऊन आपले आसन टिकवण्याचीच त्याना फिकीर आहे.

ते महाराज आले दिल्लीत आणि पाटण्याहून त्याच्याच कॉंग्रेसच्या आमदारानी त्याच्याच विरुद्ध लेखी तक्रार केली. त्यांच्यावर आमदारांचा—जनतेचा विश्वास आहे की नाही हे गफूरनी तपासून पहावे असे सांगणाऱ्या निवेदनावर कॉंग्रेसच्या १०० आमदाराच्या सह्या आहेत.

आणि

२९ तारखेला आणखी एक तमाशा मावळकर सभागृहात पहायला मिळाला.

'भारतीय लोक दल' नावाचा नवीन पक्ष या दिवशी एकदाचा अस्तित्वात आला.

मी पोचलो तेव्हा चौधरी चरणसिगाचे भाषण सपले होते आणि आचार्य कृपलानी बोलत होते. 'या देशात कोणताच इझम चालणार नाही' या वाक्याला त्यानी टाळ्या घेतल्या. काही करा पण फूट पडू देऊ नका असे या नव्या पक्षाला आशीर्वाद देताना ते म्हणाले. आचार्यांनी एकदरीत धीर सोडल्यासारखा दिसतो. या वयात ते सहाजिकही आहे. पण काहीही करा, कोणीही करा असा त्यांचा घोषा दिसतो.

आचार्य कृपलानीच्या भाषणानतर पिलू मोदी उभे राहिले. हा माणूस सिनेमा पहात असेल की नाही याची शका येते. कारण सिनेमागृहाच्या एका खुर्चीत याचा देह राहणे शक्य नाही. कदाचित दोन खुर्च्यांवर एक मोठी फळी टाकून गणपतीसारखे या गृहस्थाला बसावे लागत असेल. असा गृहस्थ खूप धावपळ करीत माईकजवळ आला आणि टाळ्याच्या गजरात आणि छायाचित्रकारांच्या स्वतत्र कॅमेऱ्याच्या डोळे मिचकावण्यात म्हणाला की, याची स्वतंत्र पार्टी नव्या भारतीय लोकदलात सामील करण्यात आली आहे. तसा अधिकार त्याना स्वतत्र पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीने दिला आहे असे मोदी म्हणाले. मसानीना मात्र हे मान्य नसावे. त्यांच्या म्हणण्यानुसार मोदीनी पार्टीला फसवले आहे.

मोदीच्या पाठोपाठ उत्कल कॉंग्रेसचे बिजू पटनाईक, स. सो. पा चे मामा बालेश्वर दयाल व अन्य लोकानी आपापले पक्ष लोकदलात विलीन केल्याचे सांगितले. बलराज मधोकही आपला पक्ष या सर्कसमध्ये घेऊन आले होते. गोव्याचे सिक्वेरा (खासदार) आणि जनसघाचे मांजी खासदार सोधी दोघेही लोकदलात आल्याचे जाहीर झाले. पक्षाचे नाव जाहीर झाले की त्या पक्षाचा आणि पक्षातल्या पुढाऱ्याचा जयजयकार व्हायचा.

तमाशा कसा आहे पहा.

बलराज मधोकाना जनसघातून गचाडी मिळालेली. हा माणूस कट्टर मुस्लीम द्वेष्टा. भाषणात म्हणाला की भारतीय लोकदल हे शामाप्रसाद मुकर्जीचेच स्वप्न होते.

पिलू मोदीच्या म्हणण्यानुसार हे स्वप्न राजाजीचे होते. हा माणूस पक्का भाडवलदार.

मामा बालेश्वर दयालांच्या म्हणण्यानुसार हे स्वप्न डॉ. लोहियांचे होते.

जमलेले लोक चौधरी चरणसिगानी बसेस भरभरून उत्तरप्रदेशातून आणले होते. सर्व जाट मडळी होती. त्यांना वाटत होते की हे स्वप्न चौधरी चरणसिगाचेच आहे.

गमत पहा.

प्रत्येक जण प्रथम आपल्या नेत्याचे नाव सवयीनुसार घ्यायचा. नतर त्याच्या लक्षात यायचे की आता इतरही पक्ष आपल्या बरोबर आहेत. मग त्या त्या पक्षांच्या नेत्याची नावे घ्यायचा.

मधोकनी प्रथम मुकर्जीचे नाव घेतले. लक्षात आल्यावर राजाजी, लोहियाची नावे जोडून मोकळे झाले.

आता या पार्टीने फायदा काय व्हायचा तो होवो पण एक वैताग मात्र जनतेचा वाढला. आतापर्यंत लोकाना 'लोहियाने कहा था' किंवा 'राजाजीने कहा था' ऐवढेच सतत ऐकावे लागायचे. आता त्यात मुकर्जी, गाधीजी, चरणसिग, राजनारायण अशाची नावे वाढली.

पक्षाला कार्यक्रम काय? कोणत्या तत्त्वावर पक्ष निर्माण झाला आहे?

मामा बालेश्वर दयाल म्हणतात त्यानुसार हा पक्ष डावा नाही, केवळ लोकांचा पक्ष आहे. इदिराजीना पाडणे आणि राष्ट्रीय पर्यायी पक्ष निर्माण करणे यासाठी हा पक्ष आहे.

प्रश्न सोडवण्यासाठी 'चांगली' माणसे असली की सर्व काही

होईल असे पक्षाच्या धोरणात जाहीर करण्यात आले आहे. पिलू मोदींची भांडवलशाही आणि राजनारायणचा समाजवाद दोन्हींना या टोपलीत गुंडाळण्यात आले आहे. तत्त्व वगैरेची भानगडच नाही.

आता नवीन पक्षात जातीविहीन समाजरचनेचे लोहियांचे स्वप्न सोंधी रंगवणार, मुस्लीमांना न्याय द्यायला मधोक सांगणार, भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे नवीन आकार राजनारायण समजावून देणार, भ्रष्टाचाराविरुद्ध बिजू पटनाईक लढणार, स्त्री स्वातंत्र्या-साठी चौधरी चरणसिंग लढणार. पिलू मोदी समाजवाद सांगणार.

पक्षाचे धोरण मंजूर आहे ना? प्रेक्षकातून होऽऽऽचा गजर व्यायचा, चौधरीजी पक्षाचे अध्यक्ष आहेत. मंजूर ना? पुन्हा होऽऽऽचा गजर. देशातल्या परिस्थितीवर चर्चा वगैरे करण्याची आवश्यकता कोणालाच भासत नव्हती.

राजनारायणजी घसा खरडून ही पार्टी खरोखर कशी डॉक्टर लोहियांच्या म्हणण्याप्रमाणे आणि गांधींच्या विचारानुसार चालणार चालणार आहे ते सांगत होते. १॥–२ तास बोलले. लिलावात वस्तू विकताना जसा लाळघोटेपणा चालतो तसलाच प्रकार वाटला.

बाहेर चौधरीजींची माणसे भेटली. ती म्हणत होती की चौधरीजी पिलू मोदी व मधोकला थोड्याच दिवसात गचांडी देतील. हे खरे तर भारतीय लोकदल नसून भारतीय क्रांतीदलच आहे. राज्य चरण-सिंगाचेच चालेल. राजनारायणलाही चरणसिंगाचेच ऐकावे लागेल.

राजनारायणजी एका भाषणात म्हणाले होते की 'चौधरीजी राम है और मैं उनका हनुमान हूँ'

अत्यंत हुकूमशाही प्रवृत्तीचा, हेकेखोर आणि अत्यंत पाताळयंत्री असे चौधरी चरणसिंगाचे वर्णन केले जाते.

उत्तर प्रदेश आणि ओरिसा या पलीकडे या पक्षाचा राष्ट्रीय पर्याय जाईलसे दिसत नाही. पुढल्या महिन्यात बाई बिजू पटनायकचा बंदोबस्त करतील. बिजू पक्षाचा राजीनामा देईल किंवा त्याला काढले जाईल. बिजूच्या अनंत भानगडी आहेत. इंदिराबाईंकडे त्याची फाईल आहे.

स्वार्थी, लंगडे पांगळे झालेले एकत्र जमा झाले आहेत, चरणसिंग त्यांचा वापर करून घेईल.

बिहारमधल्या चळवळीबद्दल लोकदलाच्या अधिवेशनात फारसे बोलले गेलेले नाही.

३० ला संध्याकाळी भटकंतीत काही गोष्टी कळाल्या.

कूली मस्तानसह बरेच नामांकित स्मगलर्स काल परवा दिल्लीत उतरले आहेत. काही जण खोटी नावे लावून मोठ्या हॉटेलात राहाताहेत. कूली मस्तानतर उजळ माथ्याने वावरतो आहे. महा-राष्ट्र मंत्रीमंडळातील एका स्मगलर मंत्र्याला फक्रुद्दीन साहेबांची रिकामी झालेली जागा मिळावी ही खटपट करण्यासाठी त्यांची धडपड चालू आहे. अहमदाबादच्या दंगलीनंतर मदतीसाठी जमवण्यात आलेला पैसा खाणाऱ्या एका काँग्रेसी मंत्र्याला वरील मंत्रीपदासाठी जमल्यास घुसडून देता आल्यास पहावे असाही त्यांचा विचार आहे. तशी खटपट ते करीत आहेत. प्रमुख मंत्री व 'बॉस' लोकांशी त्यांच्या वाटाघाटी चालू आहेत. हे स्मगलर लोक म्हणतात की त्यांच्या 'पेरोल' वर महाराष्ट्र मंत्रीमंडळातले व आमदारांपैकी काही जण आहेतच, आता त्यांना दिल्लीतही काही मंत्री मिळवावयाचे आहे. राज्य आता स्मगलर्सच चालवणार आहेत.

—निळू दामले



# मुंबई (भ्रष्टाचार) विद्यापीठ

१० ऑगस्ट माणूस अंकात दुसरा स्फोट प्रसिद्ध झाला होता

## स्फोट तिसरा : प्रतिनिधी

मुंबई विद्यापीठाच्या परिसरात आज अपूर्व गोधळ उडालेला आहे. सुमारे तीन-चार महिन्यापूर्वी एक सिनेट सदस्य डॉ. वागळे ह्यानी किमतराय बिल्डिंगवरून निर्माण झालेल्या चर्चेच्या निमित्ताने विद्यापीठाच्या बाधकाम खात्यावर कडाडून हल्ला चढविला. भला मोठा रिपोर्ट तयार करून कुलपतीकडे धाडून दिला विद्यापीठ यत्रणा मात्र ह्यावेळी स्वस्थ होती. महाराष्ट्राचे शिक्षण मत्रालयही गप्पच राहिले. एकटे डॉ. वागळे ओरडून काय कुणाचे वाकडे होणार असा हा साधा सरळ हिशेब होता. पण प्रकरण तिथे थाबले नाही. वृत्तपत्रानी हा प्रश्न उचलून धरला. कुलगुरूचे निवासस्थान, पॅव्हेलियन, किमतराय बिल्डिंग, कॅपसमधली कोसळलेली भिंत, अफलातून वॉटर प्रुफिंग, 'वॉटर प्रुफिंग' होऊनही (??) यदा कुलगुरूच्या ऑफीसमध्ये साचलेले गुडघाभर पाणी (दोन दिवसापूर्वी ह्या प्रकरणाची दुसरी आवृत्ती निघाली असे विद्यापीठाच्या आवारात काल पोचताच पुन्हा समजले!) एक ना दोन; हजारो लफडी मग प्रकाशात येतच राहिली...दीड दोन कोटीच्या घरातली उधळपट्टी (की भ्रष्टाचार?) आकडेवारीनिशी दाखवून दिली जाऊ लागली श्री. डोगरकेरी विद्यापीठातून गेल्यानतर म्हणजे गेल्या १०-१२ वर्षात ह्या भ्रष्टाचाराने(?) अक्षरशः कळस गाठला. त्या साऱ्याचा केंद्रबिंदू रजिस्ट्रार चिदम्बरम् असले तरी, कुलगुरू, शिक्षण मत्रालय त्यातून मोकळे सुटू शकत नव्हतेच...

ह्या प्रकारच्या विद्यापीठातल्या प्रकरणावर प्रकाशझोत टाकणारे हल्ले मराठी साप्ताहिकातून (मनोहर, प्रभजन, माणूस) प्रामुख्याने होत असताना दुसरीकडे अशी आणखी प्रकरणे चवाठ्यावर येतच राहिली, वेगवेगळ्या खात्यातली...

परीक्षा विभागातले भ्रष्टाचार उघड उघड समजून येऊ लागले एक साधे क्लार्क. पगार सर्व मिळून असेल फार तर चार-पाचशे. पण गेल्या वर्षभरात (किंवा अधिक स्पष्ट सांगायचे तर गेल्या काही महिन्यात!) हे क्लार्कबाबू एकदम साहेब बनले. फ्रीज, टी. व्ही., सोफा, इतर फर्निचर, पखे-एकदम रेलचेल. आता एवढे घेतल्यावर व तेही एकदम, गिरणगावातल्या दहा बाय दहाच्या दोन खोल्यातून ते ठेवणार तरी कसे? म्हणून मग ओघानेच, शिवाजी पार्क परिसरात अद्यावत फ्लॅट रोकड मोजून घेणे भागच पडले!! गिरणगाव परिसरात देखील महिला मडळे आहेतच. ह्या साहेबाच्या सौ. दुर्दैवाने त्यात सहभागी आहेत. महिला मडळात त्या अभिमानाने सागतात म्हणे, 'कुणाला जर परीक्षा पास व्हायची असेल तर त्यानी किनई, आमच्या साहेबाना भेटावे. काम होतेच होते!'

अशीच कथा आहे दुसऱ्या एका साहेबांची. त्यांना सध्याकाळी घरी भेटायचे म्हटले तर, त्यांच्या घरासमोर 'क्यू'मध्ये उभे राहावे लागते. मीही गमत म्हणून एकदा उभा राहून आलो. तिथल्या परिसरात ते 'डेप्युटी रजिस्ट्रार' म्हणून म्हणवून घेतात (विद्यापीठात मात्र लेखनिक हं! नाहीतर विद्यापीठात जाऊन डे. रजिस्ट्रार××× कुठे आहेत म्हणून विचाराल आणि एकच गोधळ उडेल!) परीक्षा विभागातला गोधळ मी नतर एखाद्या स्फोटातून खुलासेवार माडणार आहेच. तूर्त एवढे मासलेच पुरेत...

इमारतीच्या गोधळावर तर गेल्या दोन्ही लेखामधून मी लिहिलच. त्यातल्या किमतराय बिल्डिंगवरही नतर अधिक प्रखर प्रकाशझोत टाकावा लागणार आहे; कारण राजाभाई टॉवरवरून तितका चागला प्रकाश तिथपर्यंत पोचू शकत नाही...

जसे हल्ले रजिस्ट्रारवर तसेच हल्ले विद्यापीठ प्रेसच्या मॅनेजरवरही होत आहेत. तिथले कर्मचारी साफ नाराज आहेत. सध्या ओव्हरटाईम करणे वगैरे बद आहे. मॅनेजरसाहेबावर अनेक आरोप आहेत. विद्यापीठात येण्यापूर्वी ते दुसरीकडे मॅनेजर होते. पगार ६०० रु. वर, वापरायला गाडी वगैरे. ती नोकरी सोडून ते विद्यापीठात आले. कमी पगारावर. हे सहजासहजी होईल का? विद्यापीठासाठी होणाऱ्या एकूण खरेदीपैकी (कागदासह!)निम्माच माल प्रेसमध्ये येतो! बाकीच्याचे काय होते कोण जाणे!

अशा सर्वच आघाड्यावरची मोहरी घडाघड कोसळू लागल्यावर, विद्यापीठात गोधळ उडणे साहाजिकच होतं. एकदिलाने 'खादाडी' उरकणारी मडळी, ठपका दुसऱ्यावर कसा ठेवता येईल इकडे लक्ष घालू लागली. नेमक्या ह्याच वेळी विद्यापीठातल्या कर्मचाऱ्यांनी, त्यांच्याविरुद्ध चाललेल्या दडपशाहीविरुद्ध बडाचा झेडा उभारला. विद्यार्थ्यांनीही नेमक्या ह्याच वेळी आवाज (मर्यादित स्वरुपात का होईना) उठवायला सुरुवात केली. युक्राद व डाव्या आघाड्याचा त्यात प्रामुख्याने उल्लेख करायला हवा. ह्या साऱ्या घडामोडी परीक्षेच्या ऐन धामधुमीच्या काळात घडल्या. मलिदा मिळणारी मोजकी मडळी सोडली तर इतर सारे कर्मचारी आदोलनात सहभागी झाले. वर्क टु रूल (नियमाप्रमाणे काम!) सुरू झाले आणि सारी परीक्षा यत्रणाच कोसळली. तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचा भरणा करून, साहेब लोकाना वेठीला धरून वेळ निभावून न्यायचा प्रयत्न झाला. पण त्यातून गोधळ वाढतच गेला. परीक्षांच्या उत्तरपत्रिकाच

गायब झाल्या. काही ठिकाणी उत्तरपत्रिका गटारामधून वाहाताना आढळल्या. परिणामतः चालू शैक्षणिक वर्षातली पहिली टर्म जवळ जवळ संपत आली असली तरी, महाविद्यालये यदा धड सुरू झालेली नाहीत. विद्यापीठात एम. ए. साठी आत्ता (३१-८-७४ लाही) प्रवेश सुरू झालेले आहेत. प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरू केव्हा होणार, सपणार केव्हा, विद्यार्थी अभ्यास कसा करणार ते एक कुलगुरूच जाणोत आणि रजिस्ट्रार जाणोत. पण ह्याही मडळीना फारसा वेळ नाही. कारण रजिस्ट्रारनी जुलै महिन्यात, घाईघाईने प्रॉ. फडातली ९०% रक्कम (जवळ ४०-५० हजार रु फंड!) काढल्याच्या प्रकरणात ते सध्या गुतले आहेत. रजिस्ट्रार साहेबाची नोकरीची बाकी मुदत आता फक्त ३ वर्षांची आहे. म्हणजे ३६ हप्त्यात ही घाईघाईने काढलेली रक्कम फेडायची आहे. ही रक्कम जागेसाठी काढली असा एक युक्तिवाद आहे. पण ती तशी खर्च केल्याचे दिसत नाही. शिवाय रजिस्ट्रारसाहेबाना सध्या विद्यापीठाचा आलिशान फ्लॅट वापरायला मिळत आहे वसईला त्यांनी टुमदार बगला बांधला आहे त्याची मुले अमेरिकेत शिकत आहेत. तेव्हा जागेसाठी घाई-घाईने हा पैसा काढला गेला हे पटणे तर्काला धरून नाही. ह्या प्रकरणात आणखीही दोनचार गंमती आहेत. प्रॉ. फडातून रक्कम काढायला किती यातायात पडते हे नोकरदार माणसाला सागणे न लगे. पण रजिस्ट्रार चिदम्बरम् साहेबाना त्यासाठी फक्त ४८ तास लागले! ह्या गोंधळावर ताशेरे झाडणारे, मूळ मजूर अर्जातल्या परतफेडीच्या ४८ हप्त्यांबाबत आक्षेप घेणारे (कारण निवृत्तीपूर्व नोकरीची रजिस्ट्राराची फक्त ३ च वर्षे बाकी आहेत!) व एवढी मोठी रक्कम तडकाफडकी मजूर करण्याच्या पद्धतीलाही आक्षेप घेणारे पत्र डॉ. वागळचानी कुलपतीना लिहिले. तेव्हा या साऱ्या डॉ. वागळचानी उपस्थित केलेल्या प्रश्नाना साफ बगल देऊन 'रजिस्ट्रार फड' संबधातली माहिती वागळचाना मिळाली कशी ह्याची चौकशी करण्यासाठी एक समिती कुलगुरूनी नेमली. 'टाटा'च्या एज्युकेशन इन्स्टिटयूट्सचे डायरेक्टर श्री. चदिरामानी हे ह्या कमिटीचे प्रमुख आहेत. डॉ वागळचाना ह्या चौकशीच्या गोंधळात अडकवून ठेवून विद्यापीठसबधातल्या सगळ्या प्रश्नावरून लोकाचे लक्ष दुसरी-कडे केंद्रित करायचे व डॉ लवद्यासारखा डॉ. वागळचांचा 'बळी' घ्यायचा असा हा डाव असावा असे विद्यापीठ आवारात मानले जात आहे. डॉ. वागळचानी मात्र स्वत:ला या वादात गुरफटवून घ्यायचे नाही असे ठरवले आहे असे दिसते. त्यांनी चदिरामानींना दिलेले उत्तर मोठं मार्मिक आहे. 'कुलगुरूना पाठवलेल्या पत्रात माझी भूमिका मी स्पष्ट केली आहे. या ऊप्पर ह्या ओंगळ चौकशीत (कारण ती चौकशी मूळ मुद्द्याच्या सदर्भातच मुळात नाही!) सहभागी होण्याची माझी इच्छा नाही. इतर अनेक चांगली अन् महत्त्वाची कामे माझ्यामागे आहेत!...'

रजिस्ट्रार प्रॉ. फंड प्रकरणात आणखी एक गमतीची बाजू आहे. हप्ता कापून घेतल्यावर साहेबाच्या हातात पगार पडणार आहे दरमहा रुपये एकशे छत्तीस फक्त. आयकर भवनाला पाठवलेल्या लेखी निवेदनात, विद्यापीठाकडून मिळणाऱ्या, पगाराव्यतिरिक्त आपली इतर कुठलीही प्राप्ती नाही असे श्री. चिदम्बरम् ह्यानी म्हटले आहे. सहज दोन चार दिवस त्यांचा दिनक्रम मी नजरेखालून घातला. गाडीवाचून साहेब हिंडत नाहीत. पोशाख नित्य नवे, अति उची! रोज सध्याकाळचा क्लब चुकत नाही. किमान बीयर तर नक्कीच असते. ह्या व्यक्तिगत खर्चाशिवाय, घरखर्च आहे, मुलाची अमेरिकेतली शिक्षणे आहेत. आजच्या 'इदिरा-युगात' १३६ रुपयात हा सारा खर्च ते भागवतात, हे जगातले दहावे आश्चर्यच (नववे बऱ्याच वेळा होऊन गेले आहे!) मानावे लागेल. इदिराजी फार फार थोर आहेत. पण त्याना एक छोटासा सल्ला द्यायचे धाष्टर्य इथे जरूर करावेसे वाटते. कुणाला तरी पाठवून त्यानी १३६ रुपयात चिदम्बरम् साहेब हा सारा खर्च कसा भागवतात याचे रहस्य जाणून घ्यावे. कानमत्र समजून घ्यावा. जनतेला ते रहस्य उलगडून दाखवले की झालीच 'गरिबी हटाव'-मोहीम यशस्वी! आहे काय नि नाही काय!! इदिराजी (किंवा त्यांच्या हजारो पाईकानो!) प्लीज, कराच एवढे!!!...

ह्या खेरीज इतर अनेक उद्योग ह्या साऱ्या अधिकाऱ्यांना होतेच. वसईचा बगला, सागर सहवास, लोणावळ्याचे बगले, जिमखाना, बाटल्या पार्ट्या वगैरे वगैरे... डॉ. वागळचची लढत, कर्मचाऱ्याचे आदोलन, परीक्षातले गोंधळ, विद्यार्थ्यांमधला असतोष हे सारे वर उल्लेखिलेल्या महत्त्वपूर्ण उद्योगापुढे किस झाडकी पत्ती होते! साहा-जिकच विद्यापीठ, शिक्षण खाते, महाराष्ट्र शासन सारेच थड थड राहिले. पण डॉ. वागळे, कर्मचारी सघाची मडळी सारीच फार चमत्कारिक! पुन: पुन्हा प्रश्न उकरीत राहिले. डॉ. वागळे पत्रावर पत्र लिहित राहिले. कर्मचारी सघाची मडळी जॉर्ज फर्नांडिस, दत्तोपत ठेंगडी, राममूर्ती वगैरेंपर्यंत जाऊन थडकली. श्री. नुरूल हुसेन (केंद्रीय शिक्षण मत्री) ह्यानाही ह्या नेत्यांनी, कर्मचाऱ्यानी भडकावले. युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशनला पत्र मिळताच त्याची मडळी मुबईत येऊन थडकली एवढ्या धमालीत डॉ. वागळचानी कुलगुरूना (राज्यपालाना) पुन्हा एक निर्वाणीचे पत्र धाडले. मग मात्र विद्यापीठाच्या 'दादा'चा नाईलाज झाला. अत्यत महत्त्वाचे बाकीचे उद्योग बाजूला सारून, त्यानी वागळचाचा अहवाल इमारत कमिटीकडे धाडला. त्यातही बऱ्याच ठिकाणी कानउघाडणी होते आहे असे दिसल्यावर तो गुलदस्तातच ठेवला. चर्चा न करताच, इमारत कमिटीने डॉ. वागळचाचे दोषारोप खोडून टाकल्याचे सागितले आणि पाशवी बहुमताच्या जोरावर डॉ. वागळ्यानाच दोषी ठरवणारा ठराव पसार करून घेतला. डॉ. वागळचांनी ह्या

पृष्ठ २५ वर


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पाढऱ्या डागावरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बाधून पाढऱ्या डागावरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्या-वर आपणास त्याच्या गुणाची खात्री पटेल ह्यापासून हजारो लोकानी लाभ घेतला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगमुक्त होण्यासाठी अवश्य सागा.

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरीसराय (गया)**

# माणिकगड, धुळे आणि पुणे

## पन्नालाल सुराणा : शरद पाटील

दिनाक २२ ऑगस्ट १९७४.

*स्थळ . गोखले हॉल, पुणे, सायकाळचे ६ वाजलेले.*

सभेचा विषय. माणिकगड (चद्रपूर) व धुळे जिल्ह्यातील आदिवासीवरील पोलिसांची दडपशाही.

'आँखो देखा हाल' सागणारे वक्ते होते साथी पन्नालाल सुराणा आणि कॉ. शरद पाटील अध्यक्षस्थानी प्रा. रा. म. बापट.

प्रारभी लोकशाही हक्क सरक्षण समितीचे कार्यवाह श्री. रा. प. नेने यानी आपल्या प्रास्ताविक भाषणात समितीची भूमिका विशद केली, व छापील 'भूमिका पत्रक' परवडेल त्या किंमतीस विकत घेण्याचे आवाहन केले. ते म्हणाले: आपल्या लोकशाही हक्कावर हितसबधी वर्गाकडून व शासनाकडून वारवार आक्रमणे होत आहेत. या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी आणि लोकशाही हक्काचे सरक्षण, सवर्धन करण्यासाठी ही समिती कोणत्याही राजकीय पक्षाशी निगडित न राहता कार्य करील.

लोकशाही मूल्याचा आशय सामाजिक गरजेनुसार व्यापक बनविण्याची जबाबदारी वास्तविक येथील शासनावर आहे. स्वातत्र्यापूर्वी कॉंग्रेस पक्षाने भारतीय लोकशाहीच्या घडणीबाबत जी भूमिका मांडली होती तिच्या सर्वस्वी विरुद्ध असे वर्तन आजचे सत्ताधारी करीत आहेत. १९३० साली प. नेहरूनी भारतीय जनतेला जे आश्वासन दिले होते ते आज पायदळी तुडविले जात आहे. पर्यायाने लोकशाही मूल्यांवर आघात होत आहेत. आर्थिक, सामाजिक, राजकीय असे सर्व हक्क सपूर्ण लोकशाहीत अभिप्रेत असतात. केवळ घटनेचा सागाडा असणे व निवडणुकाचा निधी पार पाडणे म्हणजे लोकशाही नव्हे. आर्थिक अरिष्ट जसजसे वाढते आहे तसतसे हे हक्क कायदेशीरपणे व बेकायदेशीरपणे हिरावून घेतले जात आहेत. आणि म्हणूनच सर्व रास्त आदोलनांना पूरक शक्ती म्हणून लोकशाही हक्क सरक्षण समिती आपले कार्य करील.

धुळे जिल्ह्यातील व माणिकगड येथील आदिवासीवर पोलिसानी जे निर्घृण अत्याचार केले आहेत त्याचा धिक्कार करण्यासाठी आणि ३ जुलैला पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे आगमनप्रसगी पुण्यातील युक्रांद, ससोपा, समाजवादी, युवजन सभा, दलित पँथर आदि राजकीय पक्ष व सघटनाच्या प्रमुख नेत्यांना बनावट आरोप लादून अटक करण्यात आली त्याबद्दल तीव्र निषेध करण्यासाठी आजची सभा आयोजित करण्यात आलेली आहे. या सदर्भात श्री. रा. प. नेने यांनी दोन ठराव मांडले आणि हे ठराव संमत करण्याची विनती करून त्यांनी आपले प्रास्ताविक भाषण सपविले.

श्री. पन्नालाल सुराणा यांनी प्रारभीच लोकशाही हक्क सरक्षण समितीचे अभिनदन केले. ते म्हणाले, येथील लोकशाहीला काही मर्यादा आहेत हे खरे; परंतु ज्या मर्यादेत लोकशाही हक्क मान्य करण्यात आले आहेत त्या मर्यादादेखील पाळल्या जात नाहीत ही अत्यत खेदाची गोष्ट आहे येथील दलितांची, दुबळ्याची, श्रमिकाची पिळवणूक, शोषण करण्याचे कार्य येथील बलिष्ठांकडून सदोदित होत आहे. याविरुद्ध आवाज उठविण्याचे कार्य ही समिती यापुढेही करील अशी अपेक्षा बाळगतो. आपल्या विषयाकडे वळून साथी पन्नालाल सुराणा यानी प्रारंभीच परखडपणे बजावले, की समाजवादाच्या लव्या चवड्या गप्पा मारणारे, आदिवासींच्या उन्नतीबाबत नक्राश्रू ढाळणारे महाराष्ट्र सरकारच आदिवासींच्या हक्कावर आज आक्रमण करीत आहे.

माणिकगड-चद्रपूर जिल्ह्याचा एक भाग हा महाराष्ट्राचा पूर्वेकडील व सर्वात मोठा जिल्हा. पूर्वी हा भाग मराठवाड्यात होता. १९५६ साली महाराष्ट्रात आला. माणिकगड पूर्वी निजामाच्या काळात नादेड जिल्ह्यात होते. नंतर प्रशासनाच्या सोयीसाठी त्याचा समावेश चद्रपूर जिल्ह्यात करण्यात आला. ही पार्श्वभूमी सांगण्याचे प्रयोजन असे, की आज चाललेल्या आदोलनाच्या सदर्भात हा मुद्दा महत्त्वपूर्ण आहे. माणिकगड हे तेथील किल्ल्यावरून पडलेले नाव. डोंगराच्या माथ्यावरील २५० चौ. मलाचा परिसर. दुर्गम, घनदाट जगल. या जगलात बाबू, खैर, साग याची झाडे विपुल प्रमाणात. काही वस्तूच्या उत्पादनाच्या सदर्भात ही झाडे, वनस्पती अत्यंत उपयुक्त. म्हणून १९६० पासून या झाडाचे-वनस्पतीचे उत्पन्न वाढविण्याचे प्रयत्न करण्यात आले.

या जगलाचे ठेके देण्यात येतात ठेकेदारांशी करार करण्यात येतो त्या प्रमाणे ते जगल कापून नेतात. परतु ठेकेदार या परवान्याचा फार मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करतात. आणि कराराच्यापेक्षा अधिक प्रमाणात बाबू, साग, खैर यांची झाडे तोडली जातात. १५ टक्क्यापेक्षाही अधिक प्रमाणात ही जगलतोड झाल्याची उदाहरणे आहेत. अशा प्रकारे बिर्लाशेठजी (कागद नगर) अजितसिंग नानकसिंग (भडारदरा) यानी मोठ्या प्रमाणात साग, बांबू तोडले.

जगल तोड करण्यासाठी स्थानिक आदिवासी कमी पडले म्हणून ठेकेदारांनी नादेड, बीड, परभणी, अदिलाबाद येथून मजूर आणले.

या परिसराचे एकंदर क्षेत्रफळ साधारणपणे १॥ ते १॥। लाख एकर आहे. पण सरकारजवळ क्षेत्रफळ, जगल आदिबाबत निश्चित स्वरुपाची माहिती नाही. सरकारी उत्तरे, माहिती यात प्रत्येकवेळी तफावत, विसगती आढळून येते.

१९५६ ते १९६४ पर्यंत ही जंगल लूट मोठ्या प्रमाणावर चालू होती. बडे उद्योगपती, ठेकेदार यानी जवळजवळ निम्मे जगल उजाड केले. जंगल खात्याच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांनी या व्यवहारात भरपूर

पैसे कमावून घेतले. जंगलाचे सवर्धन करण्यात त्याना आनद नाही आणि उजाड झाले म्हणून खेद नाही.

या उजाड झालेल्या जमिनी जवळपासच्या भागातील गोंड, कोलाम आदि आदिवासीनी लागवडीखाली आणल्या. एक-दोन जुने जहागिरदार, दोन-तीन पुढारी, काही सेवानिवृत्त सरकारी कर्मचारी यानी बातमी पसरविली, की माणिकगड भागात सरकार कसण्यासाठी जमीन देत आहे. त्याबरोबर उस्मानाबाद, नांदेड, बीड, परभणी, यवतमाळ, आदिलाबाद, आदि जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरानी माणिकगडवर मोर्चे बांधले आणि दिसेल ती जमीन लागवडीखाली आणली. रोजगार, उद्योगधंदा, जमीन नसलेल्या बहुसख्य लोकानी माणिकगड व्यापून टाकले.

## शिवाय सारा वसूली !

आदिवासीना शेती आपला धदा वाटत नाही. जगलाच्या उत्पन्नावरच ते प्रामुख्याने अवलबून असतात. काही गोंडानी आपल्या जमिनी १००–१५० रुपये एकर एवढ्या स्वस्तात विकल्या. मन्याड धरणग्रस्तांनी या जमिनी घेतल्या. शिवाय बहुसख्य भटक्या जमाती, विमुक्त जाती यानीच माणिकगडचा आश्रय घेतला.

नव्याने शेती करणाऱ्या या लोकांकडून सरकारी कर्मचाऱ्यानी वसुल्या केल्या. जंगल खात्याच्या, महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यांनी ह्या वसुल्या अनामत म्हणून, सारा म्हणून घेतल्या. एवढेच नव्हे तर, 'शिवाय सारा' ही वसूल केला गेला. शिवाय सारा म्हणजे दड.

पट्टे मिळवून देतो अशा भुलथापा मारून कांग्रेसच्या पुढाऱ्यांनी कोणाकोणाकडून १००–२०० रुपये घेतले. सरकारने नेमलेल्या चौकशी समितीला अशा प्रकारे ८४ हजार रुपये घेतल्याचे आढळून आले परंतु लोक म्हणतात, की या पुढाऱ्यानी १॥ ते २ लाख रुपये घेतले आहेत

माणिकगडच्या जगलात 'अतिक्रमण' झाल्याचे कधीतरी सरकारच्या ध्यानी येई. तेवढ्यापुरती हालचाल होई. परतु पुढाऱ्याच्या धावपळीमुळे गाडे पुन्हा स्तब्ध होई.

दरम्यान सरकारने या लोकांकडून सारा वसूल केला, ग्रुप ग्रामपंचायती कायम केल्या, ज्वारीची लेव्ही वसूल झाली. मतदारांच्या यादीत नावे नोदवली गेली. जिल्हा परिषद, लोकसभा, विधानसभा अशा तीनही निवडणुकामध्ये लोकांनी मतदान केले. या निवडणुकाच्या प्रचारसभामध्ये श्री. वसतराव नाईक यांनी जाहीरपणे सागितले, की निवडणुकीमध्ये कांग्रेसला मते द्या म्हणजे माणिकगडच्या जमिनी नावावर करतो. मला ही गोष्ट समजताच मुख्यमंत्र्याना या बाबतीत मी विचारले. तेव्हा असे बोलल्याचे मुख्यमत्र्यानी मान्य केले आणि ते पुढे म्हणाले की, 'मी असे सागितले म्हणून काय कोणीही, कुठेही, कितीही जमीन कसायची काय ?' जगल खात्याच्या कर्मचाऱ्यानी पैसे खाल्ले, महसूल खात्याच्या कर्मचाऱ्यानी सारा वसूल केला, कांग्रेसच्या पुढाऱ्यानी आपले उखळ पाढरे करून घेतले. स्वत मुख्यमत्री वसतराव नाईकानी निवडणुकांच्या जाहीर सभामध्ये 'जाहीर आश्वासन' दिले, परंतु या लोकाच्या नावावर जमिनी झाल्या नाहीत.

या प्रकाराने लोक अत्यत सतप्त झाले.

या सर्व प्रकरणाच्या बुडाशी कांग्रेस अतर्गत असलेल्या दोन गटातील रस्सीखेचीचे राजकारण आहे. या प्रकरणात ज्याने पैसे खाल्ले त्याच्या विरोधी गटातील लोकानी मोहीमच उघडली. पत्रकाराना या भागात घेऊन गेले. नागपूरच्या 'तरुण भारत'मध्ये लेख प्रसिद्ध झाला. १०० कोटी रुपयाचे जंगल नष्ट झाले याला जबाबदार कोण ? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला. अर्थात ही रक्कम फारच अतिशयोक्तीची आहे. ही रक्कम साधारण ५०–६० लाख रुपये होईल.

दुसरा प्रश्न असा उपस्थित करण्यात आला की, 'आमच्या जिल्ह्यातील आदिवासी भूमिहीन असताना या परक्यांना (मराठवाड्यातील) काय म्हणून थारा द्यायचा ?'

या प्रकरणी नामदार मधुकरराव चौधरी यानी सैद्धान्तिक भूमिका घेतली. त्याचे जगलप्रेम एकदम उफाळून आले. जगलसंवर्धन हे त्याचे स्वप्न माणिकगडला भगले गेले होते ! या 'आक्रमणाचा' प्रतिकार करण्याचा त्यानी निर्धार केला आणि १९७३ च्या भर पावसाळ्यात माणिकगडाच्या २३ गावातील झोपड्या जळून खाक झाल्या. एका गरोदर स्त्रीस ऐन पावसात हाकलण्यात आले. ती एका झाडाखाली प्रसूत झाली. बाळ–बाळतीण दोघे तडफडत मेली.

पण या अत्याचाराला वाचा फोडणार कोण ?

९९ गावे आहेत पण पोस्ट ऑफिस, तार ऑफीस नाही.

वर्तमानपत्रवाल्याची भूमिका सपूर्णपणे या लोकाच्या विरोधी.

शे. का. पक्षाचे अदमपूरचे श्री. गणपतराव देशमूख आणि कंधारचे केशवराव धोडगे या आमदारानी विधानसभेत आवाज उठविला आणि झोपड्या पाडण्याविरुद्ध 'स्ट' आणला.

मी आणि मृणालताई गोरे यांनी माणिक गडावर जाऊन परिस्थिती पाहिली. जमिनीवरील 'आक्रमण' उठविण्यासाठी झोपडी पाडण आणि आदिवासीना तेथे राहाणे अशक्य करणे अशी सरकारी भूमिका आढळली. वनअधिकारी आणि एस. आर. पी. नी २५०० झोपड्या पाडून नेस्तनाबूत केल्या.

आश्चर्याची पण प्रांजलपणे मान्य करण्यासारखी बाब म्हणजे माणिक गडावर पोलिसाकडून एक देखील अत्याचार झाला नाही. आदिवासीवर अत्याचार करण्याची सपूर्ण कामगिरी सरकारच्या वन अधिकाऱ्यानी आणि एस. आर. पी. नी पार पाडली.

अतिक्रमण हटविण्याचे कार्य असे चाले. बायका, मुले, माणसें भराभरा मालट्रकमध्ये कोबीत. त्यातच झोपडीतील सामान खेचाखेच करून भरीत असत आणि जगलच्या हद्दीबाहेर नेऊन सोडीत. मार्चच्या शेवटच्या आठवड्यात असे प्रकार खूप झाले. एक बाई ट्रकमध्येच बाळंत झाली. नवजात अर्भक वन अधिकाऱ्याच्या पायाखाली तुडवले गेले. दोन मुले आईबापापासून दुरावली आणि मेली. एका वृद्ध स्त्रीलाही असेच मरणाने कवटाळले. असे अनेक अमानुष अत्याचार झाले.

झोपड्या पाडूनच थाबले नाहीत. घरातील भाडी, कोंबड्या, अडी जे जे हाती लागेल ते पळविण्यात आले आणि झोपड्याचे अर्धवट पाडलेले सागाडे जाळून खाक करण्यात आले.

या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी आम्ही २० एप्रिल ७४ ला

पृष्ठ २१ वर

# दक्षिण कोरियातील दडपशाही राजवट

## वा. दा. रानडे

वॉटर गेट प्रकरण, निक्सन यांचा राजीनामा, सायप्रसमधील युद्ध या घटनांपुढे आशिया तील घटना काहीशा दुर्लक्षित झाल्या आहेत. दक्षिण कोरियात १५ ऑगस्टला अध्यक्ष पार्क चुग-ही याच्या खुनाचा प्रयत्न झाला, पण गोळी त्याना न लागता त्याच्या पत्नीला लागून त्या ठार झाल्या. सरक्षक दलाच्या सैनिकानी नतर केलेल्या गोळीबारात बदूक-धारी हल्लेखोर मुन से क्वांग जखमी झाला. चकमकीत एक सोळा वर्षाची गायिकाही ठार झाली. हल्लेखोर जपानमधील ओसाका-हून आला होता. आपल्या सूटकेसमध्ये त्याने एक पिस्तुल लपविले होते. सेऊलच्या नॅशनल थिएटरमध्ये अध्यक्ष पार्क याचे कोरियाच्या स्वातत्र्यदिनानिमित्त भाषण व्हावयाचे होते. आपण जपानी वकिलातीचे अधिकारी असल्याची बतावणी करून त्याने तेथे प्रवेश मिळवला. अध्यक्ष पार्क पधराशे निमत्रितापुढे भाषण करीत असता हल्लेखोर उभा राहिला आणि त्याने व्यासपीठाच्या रोखाने गोळ्या झाडल्या अध्यक्ष! पार्क रीडिंग डेस्कच्या मागे असल्याने वाचले पण गोळीने त्याच्या पत्नीचा बळी घेतला. श्रीमती पार्क यांनी आपल्या स्नेहार्द वागणुकीने जनतेचे प्रेम सपादन केले होते, त्यामुळे त्यांच्या मृत्यूने लोकाना हळहळ वाटली पण अध्यक्ष पार्क याच्या खुनाचा प्रयत्न हा त्याच्या दडपशाहीच्या राजवटीविरुद्ध असलेल्या असतोषाचा उद्रेक होता. खुनी हल्ला झाला तरच पार्क अध्यक्षपदावरून दूर होतील असे काही कोरियनांना वाटू लागले होते,

अध्यक्ष पार्क यांची गेल्या तेरा वर्षाची राजवट म्हणजे अमानुष दडपशाहीची राजवट आहे. खुल्या लोकशाही निवडणुका झाल्या तर आपण निश्चित जिंकू असा विश्वास न्यू-डेमोक्रॅटिक पार्टी या विरोधी पक्षाचे उपाध्यक्ष किंग यग सॅम यांनी व्यक्त केला. अध्यक्ष पार्क यांना तीच भीती वाटत असल्याने सत्तेवर राहाण्यासाठी विरोधी पक्षाविरुद्ध त्यांनी दडपशाही चालविली आहे. घटनेतील तरतुदी बाजूला सारून त्यानी आपली अध्यक्षपदाची मुदत वाढवून घेतली. अध्यक्षावर टीका करणे एवढेच नव्हे तर मतभेद दर्शविणे सुद्धा अध्यक्षीय हुकमाने गुन्हा ठरविण्यात आला असून त्याला दीर्घ कारावास किंवा फांशीच्या शिक्षेचीही तरतूद केली आहे. विरोधी पक्षाच्या एक हजार लोकांना अटक झाली असल्याचे सरकारनेच मान्य केले आहे. त्यापैकी १७१ जणांना दीर्घ करावास किंवा फाशीची शिक्षा झाली आहे. बाकीच्यांवर खटले चालू आहेत. काहीवर गुप्त खटले चालून त्याना शिक्षा झाल्याच्याही बातम्या आहेत. धरपकडीचा सरकारी आकडा एक हजार असला तरी प्रत्यक्षात तो त्यापेक्षा बराच मोठा असल्याचे विरोधी पक्षाचे नेते सांगतात. अध्यक्ष पार्क याच्या खुनाच्या प्रयत्नाचा एक परिणाम म्हणजे दडपशाहीचे सत्र अधिकच वाढेल. सारे विरोधक व टीकाकार आपले शत्रू असून ते जणू आपल्या खुनाचा कट करीत आहेत अशा धास्तीने पार्क यांनी पधरा ऑगस्टच्या कार्यक्रमा-नतर कोणत्याही जाहीर समारंभात भाग घेतलेला नाही. लोकांपासून व सहकाऱ्या-पासून ते अलग राहू लागले आहेत. खुनाच्या प्रयत्नानतर सबध मत्रिमडळाने राजीनामा दिला. मत्र्यांपैकी फक्त गृहमत्र्याचा व अधिकाऱ्यांपैकी शरीररक्षक दलाचे प्रमुख पार्क चाँग किसू याचा राजीनामा अध्यक्ष पार्क यानी स्वीकारला. तेरा वर्षापूर्वी उठाव करून पार्क अध्यक्ष झाले त्यावेळेपासून किसू त्याच्या निकटच्या विश्वासू अधिकाऱ्या-पैकी होते.

अध्यक्ष पार्क याच्या खुनाचा प्रयत्न हा उत्तर कोरियन कम्युनिस्टाच्या कटाचा एक भाग होता असे सरकारतर्फे सांगण्यात येत आहे. जपानमधील कोरियनांच्या कम्युनिस्ट धार्जिण्या संघटनाशी हल्लेखोर निगडीत होता असा आरोप करण्यात येत आहे. पण यासबधी निश्चित व निर्णायक स्वरुपाचा पुरावा अजून मिळालेला नाही. या घटनेने दक्षिण कोरियाचे जपानशी असलेले सबध मात्र आणखी बिघडले आहेत. दक्षिण कोरियाचे पतप्रधान किम जाँग पिल टेलि-व्हिजनवरील भाषणात म्हणाले, ' हल्लेखोरा-जवळ बनावट जपानी पासपोर्ट आणि चोर-लेले जपानी पोलीस रिव्हॉल्व्हर होते हे लक्षात घेता या खुनाची कोणतीही कायदे-शीर किंवा नैतिक जबाबदारी जपानवर नाही असा दावा जपानच्या परराष्ट्रखात्याने करावा हे असमर्थनीय आहे.' या घटनेमुळे जपानविरुद्ध सतप्त प्रतिक्रिया दक्षिण कोरियात व्यक्त केली जाणार याची कल्पना जपानच्या पतप्रधानाना होती. या सतप्त भावना शात करण्यासाठी श्रीमती पार्क यांच्या अंत्यविधीस ते स्वत: उपस्थित राहिले होते. पण अध्यक्ष पार्क यानी त्या-बद्दल त्यांचे औपचारिक आभारही मानले नाहीत.

जपानमध्ये दक्षिण कोरिया सरकार-विरोधी सघटनाना आसरा मिळतो याबद्दल अध्यक्ष पार्क याचा जपानविरुद्ध पूर्वीपासून रोष आहे. अध्यक्षीय निवडणुकीतील विरोधी पक्षाचे एक उमेदवार किम दाए जग याना टोकियोतील एका हॉटेलातून पळविण्यात आले होते. त्याची मुक्तता करून त्याना परदेशी जाण्याची परवानगी देण्यात येईल असे आश्वासन दक्षिण कोरियाच्या पत-प्रधानानी गेल्या वर्षी दिले होते, पण ते त्यांनी पाळले नाही. उलट निवडणूक गुन्ह्यांच्या आरोपावरून त्याच्यावर सध्या खटले भरण्यात आले आहेत. दक्षिण कोरियात दोन जपान्याना नुकतीच वीस वर्षांची शिक्षा झाली, त्यामुळेही या दोन राष्ट्रात वितुष्ट वाढलेले आहे. अध्यक्ष पार्क येत्या नोव्हेंबरात जपानला भेट देतील त्यावेळी हे सर्व प्रश्न उपस्थित करण्याचे जपानने ठरविले होते, पण आता ही भेटच रद्द होण्याची शक्यता आहे.


दक्षिण व उत्तर कोरियाच्या एकीकरणा-बाबत दोन्ही देशांच्या प्रतिनिधींनी बोलणी करावीत याबद्दल दोन्ही सरकारात एकमत झाले होते, पण अध्यक्ष पार्क याना हे एकी-करण मनापासून नकोच आहे. त्यासबधीची बोलणी लाबणीवर टाकण्यासाठी आपल्या खुनाचा झालेला प्रयत्न हे चागले निमित्त पार्क याना मिळाले आहे.

चोवीस वर्षापूर्वी उत्तर कोरियाच्या फौजांनी दक्षिण कोरियावर हल्ला केला. तेव्हा दक्षिण कोरियाच्या मदतीसाठी यूनोच्या फौजा गेल्या होत्या. कम्युनिस्ट हुकूमशाहीविरुद्ध लोकशाहीच्या रक्षणाचा लढा असे या लढयाचे वर्णन त्यावेळी करण्यात आले. पण दक्षिण कोरियात पार्क यांनी चालविलेली दडपशाही म्हणजे लोक-शाहीचा खून आहे. तेथे लोकशाही प्रस्था-पित व्हावी अशी कळकळ स्वत:ला लोक-शाहीप्रेमी म्हणविणाऱ्या राष्ट्राना दिसत नाही. त्यांना आपले हितसबध अधिक महत्त्वाचे वाटतात. दक्षिण कोरियातील दडपशाहीबद्दल अमेरिकेचे परराष्ट्रमत्री किसिंजर यानी नापसती दर्शविली पण लष्करी हितसबध अमेरिकेला टिकविलेच पाहिजेत यावर भर दिला. अशा प्रतिकूल परिस्थितीत लोकशाहीच्या प्रस्थापनेसाठी दक्षिण कोरियाच्या जनतेला फार खडतर लढा द्यावा लागणार आहे. □



# विवेकभ्रष्ट वॉटरगेट प्रकरणाची धावती ओळख...

● वि. स. वाळिंबे



दुसरे महायुद्ध नुकतेच संपले होते आणि त्यामुळे युद्धकालीन गरजे-नुसार सेनादलामध्ये भरती झालेले लक्षावधी अमेरिकन तरुण पुन्हा नागरी जीवनात प्रवेश करीत होते. जो तो आपल्या आवडी-निवडीनुसार नोकरी वा व्यवसाय शोधीत होता.

रिचर्ड मिल्हौस निक्सन नावाचा तरुण एका वेगळयाच विचाराने भारून गेला होता. नौदलात दाखल होण्यापूर्वी या तरुणाने वकिली-च्या व्यवसायाला प्रारंभ केला होता. परंतु आता त्या व्यवसायात पुनश्च प्रवेश करण्याऐवजी राजकारणाच्या क्षेत्रात आपण पदार्पण करावे असे त्याच्या मनाने घेतले.

१९४६ साल उजाडले होते आणि अमेरिकन प्रतिनिधीगृहाच्या निवडणुका तोंडावर आल्या होत्या. या निवडणुकीसाठी रिपब्लिकन पक्षाचे तिकीट आपल्याला मिळावे अशी निक्सन यांची इच्छा होती.

पण त्यावेळी रिचर्ड निक्सन हे नाव अमेरिकन जनमताला पूर्णपणे अपरिचित होते. प्रशांत महासागरात उभ्या असलेल्या अमेरिकन नौदलातील हा सेकंड लेफ्टनंट सर्वसामान्य नागरिकाला माहीत असण्याचे तसे कारणही नव्हते.

काही एका योगायोगानेच निक्सन यांची इच्छा पूर्ण झाली.

कॅलिफोर्निया राज्याच्या बाराव्या जिल्ह्यासाठी रिपब्लिकन पक्षाने आपला उमेदवार म्हणून व्हिटिअर कॉलेजमधील एका प्राध्यापकाची निवड केली. पण त्या प्राध्यापकाला निवडणुकीची आणि त्यापाठोपाठ येणारी राजकारणाची दगदग मानवणारी नव्हती. अन् म्हणून त्याने आपल्या ऐवजी रिचर्ड निक्सन या आपल्या माजी विद्यार्थ्याच्या नावाची शिफारस केली.

रिपब्लिकन पक्षाच्या केंद्रीय निवड समितीने त्या प्राध्यापकाच्या शिफारशीवर अवलंबून राहून निक्सन यांना तिकिट दिले आणि निक्सन यांनीही आपल्यावर टाकलेला विश्वास खरा करून दाखविला. ते निवडून आले.

रिपब्लिकन पक्षाच्या दृष्टीनेही ही निवडणूक यशस्वी ठरली. कारण गेल्या चौदा वर्षांनंतर प्रथमच त्या पक्षाला प्रतिनिधीगृहामध्ये बहुमत लाभले होते.

दुसऱ्या महायुद्धाने जागतिक राजनीतीचा पट पूर्णपणे बदलून टाकला होता. विजयी मानकऱ्यांच्या यादीमध्ये ब्रिटन, फ्रान्स आणि चीन यांचा समावेश झालेला असला तरी महासत्ता म्हणून त्यांना आता काहीच किंमत उरलेली नव्हती. अमेरिका आणि रशिया या दोन राष्ट्रांच्या हातातच आंतरराष्ट्रीय राजकारणाची सूत्रे आलेली होती. अधिकाधिक भूप्रदेश आपल्या वर्चस्वाखाली यावा यासाठी या दोन महासत्ता, महायुद्धाची समाप्ती नजरेच्या टप्प्यात आल्यापासून, प्रयत्नशील झाल्या होत्या.

साम्यवादाच्या आकर्षक आवरणाखाली, आपले वर्चस्व-क्षेत्र वृद्धिंगत करण्याच्या रशियाच्या खटाटोपाला आवर घालण्याची इतिहासदत्त कामगिरी अमेरिकेने पार पाडली पाहिजे अशी रिपब्लि-कन पक्षाची धारणा होती.

निक्सन यांची विचारधारा नेमकी अशीच असल्यामुळे, प्रतिनिधी-गृहाने अमेरिकाविरोधी कारवायांवर लक्ष ठेवण्यासाठी जी समिती स्थापन केली तिच्यात निक्सन यांना स्थान देण्यात आले.

निक्सन यांचे नाव प्रकाशात यावे अशी एक घटना लवकरच घडली.

कार्नेजी एण्डाऊमेण्ट या दरवर्षी कोट्यवधी डॉलर्सच्या देणग्या देणाऱ्या धर्मादाय संस्थेच्या अध्यक्षपदावर अल्गेर हिस हा परराष्ट्र खात्यातील एक निवृत्त अधिकारी विराजमान झालेला होता. परराष्ट्र खात्यात नोकरी करीत असल्यापासून हिस कम्युनिस्ट पक्षाचा क्रियाशील कार्यकर्ता आहे आणि त्यामुळे उघडउघड कम्युनिस्ट पक्षपाती व्यक्ती कार्नेजी एण्डाऊमेण्टसारख्या धनाढ्य धर्मादाय संस्थेच्या प्रमुखपदी कायम राहिली तर या संस्थेचा बराचसा पैसा

कम्युनिस्टधार्जिण्या व्यक्तींना आणि संस्थाना दिला जाईल अशी भीती 'टाईम'चे संपादक चेंबर्स यानी व्यक्त केली.

चेंबर्स याच्या आरोपाचा हिसने जोरदार इन्कार केला. हिस एवढा चलाख होता की या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी प्रतिनिधीगृहाने नेमलेल्या समितीतील अनेक सदस्यानाही हिसवर उगाच कम्युनिस्ट म्हणून आगपाखड होत आहे असे वाटले. आपले हे मत त्यानी अहवालात नमूदही केले.

हिसच्या कैफियतीवर विश्वास ठेवायला एकच सदस्य तयार झाला नाही. तो म्हणजे रिचर्ड निक्सन.

आपला संशय खरा आहे की नाही याचा छडा लावण्यासाठी निक्सन यांनी बर्ट ॲण्ड्रुज या नामांकित वार्ताहराची मदत घेतली. ॲण्ड्रुजही असा हिकमती की त्याने गेल्या अठरा वर्षांतील म्हणजे १९३० पासूनचे सगळे संबधित कागदपत्र नजरेखालून घातले आणि परराष्ट्र खात्यात असल्यापासून अल्गेर हिस कम्युनिस्ट पक्षाचा सदस्य असल्याचे दाखवून दिले, ॲण्ड्रुजने गोळा केलेली ही माहिती निक्सन यांनी जाहीर करताच, हिसचा सारा कबुलीजबाब धादात खोटा असल्याबद्दल चौकशी समितीच्या अन्य सदस्यांची खात्री पटली. निक्सन याच्या या प्रयत्नामुळे अखेर हिसला शिक्षाही झाली.

संसदीय राजकारणामध्ये प्रारंभीच एवढे यश मिळविल्यामुळे १९५० मधील निवडणुकीच्या वेळी रिपब्लिकन पक्षाने निक्सन यांना वरिष्ठ सभागृहाचे म्हणजे सेनेटचे तिकिट दिले. कॅलिफोर्नियाचा उदयोन्मुख प्रतिनिधी म्हणून निक्सन यांचा सेनेटमध्ये प्रवेश झाला.

१९५२ साल उजाडले तशी अध्यक्षीय निवडणुकीची धामधूम सुरू झाली.

गेली काही वर्षे आपल्याला हुलकावणी देत असलेले अध्यक्षपद यावेळी हस्तगत करायचेच असा रिपब्लिकन पक्षाने मनसुबा केला; आणि हे मनोगत सिद्धीला जावे म्हणून, दुसऱ्या महायुद्धातील ज्यांच्या कर्तृत्वाचा सुगंध अजूनही दरवळत आहे अशा सेनानीला—ड्वाईट आयसेनहॉवर याना—आपली उमेदवारी बहाल केली.

अमेरिकेत उपाध्यक्षपदाचा उमेदवार अध्यक्षीय उमेदवारच मुख्यत: निवडीत असतो. आयसेनहॉवर यांना तरुण रक्ताचा आणि नव्या उमेदीचा सहकारी हवा होता. म्हणून त्यांनी रिचर्ड निक्सन यांची निवड केली. आयसेनहॉवर-निक्सन जोडीचा देशभर प्रचार-दौरा सुरू झाला. आयसेनहॉवर यांच्यासारख्या ख्यातनाम व्यक्तीची साथ लाभल्यामुळे, निक्सन यांच्या महत्त्वाकांक्षेला नवे धुमारे फुटू लागले. अमेरिकेच्या सर्वच्या सर्व म्हणजे पन्नास राज्यात आयसेनहॉवर यांच्या जोडीने निक्सन याची छायाचित्रे प्रसिद्ध होत होती.

एवढ्यात एक बातमी प्रसिद्ध झाली.

निक्सन याच्या निवडणूक-खर्चासाठी कॅलिफोर्नियातील काही धनिकानी अठरा हजार डॉलरचा स्वतंत्र निधी गोळा केलेला आहे ही बातमी प्रसिद्ध होताच, निक्सन याची गेल्या पाच-सहा वर्षांपासून उजळू लागलेली प्रतिमा काळवंडू लागली. निक्सन यानी असा काही प्रकार केला असेल तर त्यांना उपाध्यक्षपदासाठी आपण उभे करू नये असे रिपब्लिकन पक्षाच्या काही नेत्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. या बातमीने आयसेनहॉवरही अस्वस्थ झाले. ते म्हणाले, "हा आरोप खोटा आहे अशी निक्सन यानी ग्वाही दिली तरच मी त्याच्या उमेदवारीचा पुरस्कार करीन. एरवी मला दुसरा उमेदवार शोधणे भाग पडेल."

निक्सन पेचात पडले.

खरे बोलावे तर पुढे केव्हा तरी राष्ट्राच्या सर्वोच्च पदावर आरूढ होण्याच्या आकांक्षेला विसरून जावे लागेल आणि खोटे बोलावे तर ज्याने आपल्यावर विश्वास टाकलेला आहे अशा आयसेनहॉवर यांच्यासारख्या नेत्याची प्रतारणा करावी लागेल असा हा पेच होता.

राजकारणात वावरायचे तर नैतिकतेची एवढी आंतरिक चाड बाळगून चालत नाही असा निक्सन याच्या व्यवहारी मनाने कौल दिला. सदसद्विवेक बुद्धीला ठोकरून देऊन निक्सन यानी जाहीर केले—

'असा कोणताही निधी जमविण्यात आलेला नाही.. पाहिजे तर विरोधकानी हा आरोप पुराव्यानिशी सिद्ध करून दाखवावा.'

निक्सन चक्क खोटे बोलत होते.

### चढती कमान

एखादा आरोप कितीही खरा असला तरी तो सिद्ध करून दाखविता येतोच असे नाही हे वकिलीच्या व्यवसायाने जीवनाला प्रारंभ करणाऱ्या निक्सनला चांगले ठाऊक होते.

पुढे वीस वर्षांनी घडणाऱ्या घटनाची ही नांदी होती.

पण त्यावेळी तसे काही घडले नाही. संबधितानी निक्सन याचा खुलासा खरा मानला आणि उपाध्यक्षपदाची त्यांची उमेदवारी अबाधित राहिली.

आयसेनहॉवर यांच्यासमवेत निक्सनही विजयी झाले.

१९५५ मध्ये आयसेनहॉवर आजारी पडले तेव्हा त्यांच्या जबाबदारीची धुरा निक्सन यानी मोठ्या कौशल्याने सांभाळली. पुढल्या वर्षी निक्सन दक्षिण अमेरिकेच्या दौऱ्यावर गेलेले असताना, कॅराकस येथील कम्युनिस्टांचा निक्सन याच्यावर खुनी हल्ला करण्याचा विचार होता. या बेताचा सुगावा लागूनही निक्सन यानी आपला नियोजित दौरा पूर्ण केला.

१९५६ मधल्या निवडणुकीत पुन्हा आयसेनहॉवर यांची अध्यक्षपदी आणि निक्सन यांची उपाध्यक्षपदी निवड झाली.

रशियाचे त्यावेळचे प्रधानमंत्री रुश्चोव्ह याच्याशी समझोता करण्याचा आयसेनहॉवर याचा प्रयत्न होता, पण त्यात त्याना यश आले नाही. ती कामगिरी १९५९ मध्ये रशियाच्या दौऱ्यावर गेलेले असताना निक्सन यानी पार पाडली. रुश्चोव्ह आणि निक्सन याच्यातील खुल्या चर्चेला त्यावेळी बरीच प्रसिद्धी मिळाली होती.

वॉशिंग्टनमधील श्वेतभवन हे अध्यक्षीय निवासस्थान आता आपल्यापासून फार दूर नाही असे निक्सन मानू लागले.

१९६० मधल्या अध्यक्षीय निवडणुकीत त्यानी जॉन केनेडी यांच्याशी लढत देण्याचे ठरविले. परंतु केनेडी यांच्या शालीन व्यक्तिमत्त्वापुढे निक्सन याचा प्रभाव पडू शकला नाही. ती निवडणूक निक्सन हरले. दोन वर्षांनी ते कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदासाठी उभे राहिले. पण तेथेही त्यांच्या पदरी अपयशच आले. बारा वर्षापूर्वी ज्या राज्याने आपला प्रतिनिधी म्हणून आपल्याला सेनेटवर पाठविले होते त्या राज्याने आपल्याला आता झिडकारावे या घटनेने निक्सन एवढे हताश झाले की ते त्याच्या मुलाखतीसाठी

आलेल्या वृत्तपत्र-प्रतिनिधींना म्हणाले, 'यापुढे तुम्हाला माझ्यावर टीका करण्याची संधी मिळणार नाही. मी यापुढे कोणत्याही निवडणुकीला उभा राहणार नाही. ही आपली शेवटचीच भेट समजा.'

निक्सन यांचा त्यावेळचा वैताग खरा होता. कारण त्यांनी लगेच न्यूयॉर्कला येऊन आपला जुना वकिलीचा व्यवसाय पुन्हा सुरू केला. या काळात ते आपल्या मित्रांशी बोलताना आपले राजकीय जीवन कायमचे संपुष्टात आलेले आहे असेच सांगत असत.

पण नियतीच्या मनात काही वेगळेच होते.

जॉन केनेडी यांच्या विजयामुळे, मध्यंतरी निष्प्रभ झालेल्या डेमोक्रॅटिक पक्षाला पुन्हा चैतन्य लाभले. त्यातच या लोकप्रिय राष्ट्राध्यक्षाचा निर्घृण खून झाल्यामुळे, १९६४ मधील अध्यक्षीय निवडणूक जिंकणे डेमोक्रॅटिक पक्षाच्या लिंडन जॉन्सन् याना सोपे गेले. त्यावेळी रिपब्लिकन पक्षाने बॅरी गोल्डवॉटर याना उभे केले होते. त्यांचा धुव्वा उडाल्यामुळे रिपब्लिकन पक्षाच्या आत्मविश्वासाला जबर तडा गेला. त्यामुळे १९६६ मध्ये जेव्हा प्रतिनिधीगृहाची निवडणूक तोंडावर आली तेव्हा रिपब्लिकन पक्षाचे अनेक मान्यवर नेते प्रचारधुरा स्वीकारायला तयार झाले नाहीत.

पुन्हा प्रकाशात यायला निक्सन याना वाव मिळाला तो त्यामुळे. रिपब्लिकन पक्षाचे प्रचारप्रमुख म्हणून त्यांनी पुन्हा देशभर दौरा केला आणि निक्सन याचे नशीब असे की निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाला सत्तेचाळीस जागा मिळाल्या. निक्सन याच्या रूपाने रिपब्लिकन पक्षाला नवा आधार सापडला.

## स्वप्न साकार झाले

शिवाय याच सुमारास, व्हिएटनाममधील युद्धातील अमेरिकेचा सहभाग वाढविल्याबद्दल लिंडन जॉन्सन यांच्यावर असे काही टीकेचे मोहोळ उठले होते की, आपण १९६८ मध्ये अध्यक्षीय फेरनिवडणुकीला उभे राहणार नाही असे त्यांनी जाहीर केले. त्यामुळे साहाजिकच निवडणूक जिंकण्याच्या दृष्टीने अधिकारपदस्थ व्यक्तीला मिळणारे फायदे डेमोक्रॅटिक पक्षाच्या नव्या उमेदवाराला मिळणार नव्हते. त्यातून नवा उमेदवार निश्चित करायला डेमोक्रॅटिक पक्षाला काही अवधी लागणार होता आणि तो निश्चित झाल्यावरच त्या पक्षाची प्रचारयंत्रणा कार्यरत होणार होती.

रिपब्लिकन पक्षाने ही परिस्थिती न्याहाळून, रिचर्ड निक्सन यांची उमेदवारी लवकर जाहीर केली आणि प्रचाराचा धूमधडाका आरंभिला. डेमोक्रॅटिक पक्षाचे उमेदवार ह्यूबर्ट हम्फ्री प्रचार-तंत्रामध्ये निक्सन यांच्याइतके कुशल नव्हते. शिवाय जॉर्ज वॅलेस याच्यासारख्या मातब्बर नेत्याने अपक्ष म्हणून आपली उमेदवारी जाहीर केल्यामुळे, नेहमीसारखा दुरंगी सामना न होता, यावेळी तिरंगी झाला; आणि जेवढे अधिक उमेदवार उभे राहतात तेवढा यशाच्या जवळपास उभ्या असलेल्या उमेदवाराचा विजय अधिक निश्चित होतो हा नेहमीचा अनुभव यावेळीही आला.

निक्सन राष्ट्राध्यक्षपदावर निवडून आले.

बावीस वर्षांपूर्वी प्रतिनिधीगृहाच्या निवडणुकीला उभे राहाताना मनाशी खेळवलेले त्याचे स्वप्न साकार झाले होते.

कॅलिफोर्नियातील सॅन क्लेमेण्टे शहरामध्ये राहणारे रिचर्ड निक्सन वॉशिंग्टनमधल्या श्वेतभुवनामध्ये रहावयास आले. जगातील सर्वांत संपन्न आणि समर्थ देशाच्या सर्वोच्च स्थानाचा उबदार स्पर्श होताच ते सुखावले.

परंतु आता त्यांना एक नवाच अनुभव घ्यावा लागणार होता.

आर्थिक आणि सैनिकी सामर्थ्याची मिजास मारणाऱ्या महासत्तेलाही टीचभर भूभागातील जनतेच्या ज्वलंत स्वातंत्र्याकांक्षेवर मात करता येत नाही या प्रखर सत्याचा प्रत्यय उत्तर व्हिएटनाम गेली पाच-सहा वर्षे अमेरिकेला आणून देत होता. त्यापायीच जॉन्सनना अध्यक्षपदाच्या फेरनिवडीचा मोह टाळावा लागला होता. दक्षिण व्हिएटनाममधील दुबळ्या राजवटीला पुढे करून उत्तर व्हिएटनामशी मुकाबला करण्यापायी, अमेरिकेची जगभर तर नामुश्की झालीच; परंतु हे आत्मघातकी धोरण आता तरी मागे घ्या असे अमेरिकन जनताही प्रशासनाला बजावू लागली.

लोकमताचा दबाव वाढल्यामुळे, निक्सन यांनी, अमेरिका दक्षिण व्हिएटनाममधून आपली सेना क्रमशः मागे घेईल असे जाहीर केले. लोकक्षोभ काहीसा शांत झाला.

निक्सन यानी व्हिएटनाममधून अमेरिकन सेना मागे घेण्याचे धोरण जाहीर केले असले तरी त्यांना 'सन्माननीय शांतते'ची आस लागलेली होती आणि त्यामुळे या युद्धात अमेरिकेची फजिती झाली असे अपश्रेय घ्यायला ते राजी नव्हते. म्हणून त्यांनी दक्षिण व्हिएटनामी नेत्याना उत्तर व्हिएटनामवर चढाई करण्याची चिथावणी दिली. या कार्यात दक्षिण व्हिएटनामी सेना यशस्वी ठरली तर आपल्याला आपली सेना तेथून काढून घ्यायला काहीच हरकत नाही असा सोयिस्कर विचार करूनच निक्सन आपली पावले टाकीत होते. अमेरिकेच्या प्रोत्साहनाने दक्षिण व्हिएटनामी लष्कराने उत्तर व्हिएटनामवर हल्ला चढविला खरा; पण परकीय सहाय्यावर पोसलेल्या आणि त्यामुळेच पोखरल्या गेलेल्या दक्षिणी व्हिएटनामी सेनेमध्ये कस असा काही उरलेलाच नव्हता. त्यामुळे कशीबशी अकरा मैल आगेकूच केल्यानंतर त्या सेनेचा पुरा फज्जा उडाला. शेवटी दक्षिण व्हिएटनाममधील अमेरिकन सेनेने आपल्या सहाय्याचे छत्र दक्षिण व्हिएटनामी सेनेवर धरले तेव्हा कोठे तिला माघार घेता आली. नाही तर उत्तर व्हिएटनामी भूमीवर ती सारी सेना गारद झाली असती. या घटनेमुळे, आपले सैन्य दक्षिण व्हिएटनाममधून काढून घेण्याचा कार्यक्रम कार्यवाहीत आणायला निक्सन टाळाटाळ करू लागले. इतकेच नव्हे तर उत्तर व्हिएटनामी सेनेचा पुरवठा मार्ग तोडण्याच्या जिद्दीने त्यानी कंबोडियात आपले सैन्य घुसविले.

आणि तरीही निक्सन सांगत होते की 'दक्षिण व्हिएतनाममधून आपली सेना काढून घेण्याचा आमचा प्रयोग यशस्वी होत आहे.'

निक्सन आपली उघडउघड फसवणूक करीत आहेत हे अमेरिकन जनतेच्या ध्यानात यायला वेळ लागला नाही. विशेषतः कंबोडियावरील आक्रमणाची बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर तर युवकवर्ग खवळून उठला.

विद्यापीठाच्या आवारामध्ये विद्यार्थ्यांनी दंगली आरंभिल्या. १ मे, १९७१ या दिवशी वॉशिंग्टन या खुद्द राजधानीच्या शहरात तर अशी काही प्रक्षोभक निदर्शने झाली की ती आवरणे पोलिसाना कठीण गेले. आतापर्यंत वॉशिंग्टनमध्ये वा अन्यत्र युद्धविरोधी निदर्शने

झाली नव्हती असे नाही. पण या वेळचा लोकक्षोभ प्रशासनाने भयभीत व्हावे एवढा उग्र होता. सरकारवर गौरकाय नागरिक संतापले आहेत हे पाहून, अन्याय आणि उपेक्षा यानी आजवर ज्यांच्या जीवनात अंधार निर्माण केला आहे ती कृष्णकाय निग्रो जनताही खवळून उठली. विशेषतः ब्लॅक पँथर या संघटनेच्या अनुयायानी तर बाँबस्फोट आणि लुटालूट यांचे अखंड सत्रच आरंभिले.

वस्तुत: आपल्याविरुद्ध हा आगडोंब का उसळला आहे याचा शांत आणि समतोल मनाने निक्सन यांनी विचार करायला हवा होता. परंतु राजकीय प्रतिस्पर्ध्यांना लोकमताच्या आधारावर पराभूत करून राज्यसत्तेवर पकड मिळवली की लोकशाहीतील सत्ताधाऱ्यानाही विवेक उरत नाही. कोणताही विरोध वा भिन्नमतदर्शन म्हणजे विरोधकानी आपल्याला सत्ताभ्रष्ट करण्यासाठी रचलेला डाव आहे, अशीच त्याच्या मनाची समजूत होते, आणि मग ते हुकुमशहाच्या थाटात आपल्या शासनयंत्रणेला आदेश देतात—' अराजक माजवू पाहाणाऱ्या आमच्या विरोधकाची पाळेमुळे बेशक खच्ची करा. लोकशाही अबाधित राखण्यासाठी हा कठोर मार्ग अनुसरलाच पाहिजे.'

निक्सन यांनी हेच केले.

१९७१ मधील दंगली उफाळल्यानंतर नव्हे तर सत्तेवर आल्यापासूनच, विद्यार्थ्यांच्या आणि निग्रोच्या निदर्शनामागे अन्य देशांचा हात असला पाहिजे असे त्यांच्या मनाने घेतले आणि त्यानी सी. आय. ए. या अमेरिकेच्या आतरराष्ट्रीय हेर-संघटनेला आदेश दिला—' आपल्या देशात होणाऱ्या दंगलीमागे कोणत्या परकीय देशांचा हात आहे त्याचा कसून शोध करा.'

सी. आय. ए. ही या क्षेत्रातील वाकबगार संघटना. अनेक देशातील राजवटी, त्या अमेरिकाविरोधी आहेत असा किंचितसाही संशय येताच, हा हा म्हणता या संघटनेने खाली खेचल्या, स्वत:च्या नावाचा वा कार्याचा बोभाटा होऊ न देता. अशा या संघटनेला अमेरिकेतील उद्रेकामागे कोणाचा हात आहे हे शोधून काढणे मुळीच अशक्य नव्हते. परंतु तिने या बाबत भरपूर चौकशी केल्यानंतर राष्ट्राध्यक्षाना कळविले—' या दंगलीमागे कोणत्याही परराष्ट्राचा हात नसून आपल्याच लोकमताला सध्याचे सरकारी धोरण पसंत नसल्यामुळे त्याने हे रूप धारण केलेले आहे.'

सी. आय. ए. चा हा निष्कर्ष निक्सन यांना पटणे शक्यच नव्हते. त्यानी देशान्तर्गत हेरगिरी करणाऱ्या एफ. बी. आय. ची मदत घेण्याचे ठरविले. त्यासाठी त्यानी एफ. बी. आय. ला निरनिराळ्या वीस देशात आपले प्रतिनिधी पाठविण्याचा हुकूम दिला. आपल्या कार्यक्षेत्रात एफ. बी. आय. ढवळाढवळ करीत असल्याचे पाहून सी. आय. ए. चे वरिष्ठ रागावले. परंतु राष्ट्राध्यक्षाचाच तसा आदेश असल्यामुळे ते गप्प बसले. एफ. बी. आय. कडूनही अशाच आशयाचा अहवाल आल्यानंतरही निक्सन यांनी आपले शोध-कार्य आवरते घेतले नाही.

' राजापेक्षाही अधिक राजनिष्ठ ' असलेल्या लोकाचा घोळका बहुतेक सर्व सत्ताधाऱ्यांपाशी जमा झालेला असतोच. निक्सन यांनी श्वेतभवनामध्ये गोळा केलेले सल्लागार आणि अधिकारी याच प्रवृत्तीचे होते. निक्सन यांचे हितसंबंध जपण्यासाठीच आपला जन्म झालेला आहे असे मानणाऱ्या या मंडळीनी निक्सनना सांगितले, ' सी. आय. ए. काय किंवा एफ. बी. आय. काय, नोकरशाहीचा बुजबुजाट झालेल्या या शासकीय यंत्रणा आहेत. त्यामुळे आपल्याला त्यांच्याकडून विश्वसनीय माहिती मिळेल हा संभव कमी आहे. म्हणून आपण देशात दंगली कोण माजवीत आहे आणि त्याचा उपशम करून अंतर्गत सुरक्षितता राखण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत यासबंधी सल्ला देण्यासाठी एक वेगळी यंत्रणा उभारली पाहिजे. त्याशिवाय हा धोका नाहीसा होणार नाही.'

निक्सन याना ही कल्पना एकदम पसंत पडली.

ही यंत्रणा उभारण्याचे काम टॉम चार्ल्स हस्टनकडे सोपविण्यात आले. त्याने प्राथमिक विचारविनिमयासाठी सी. आय. ए. चा रिचर्ड हेल्म्स, एफ. बी. आय. चा जे. एडगर हूवर, संरक्षणखात्यातील हेरविभागाचा लेफ्टनंट जनरल डोनाल्ड बेनेट आणि राष्ट्रीय सुरक्षा प्राधिकरणाचा नोएल गेलर याना बोलावून घेतले.

### सर्वंकष पाळत

निक्सन त्यांना म्हणाले, ' अंतर्गत सुरक्षिततेची जबाबदारी घेण्यासाठी नवी यंत्रणा उभारण्याची वेळ आली आहे असे मला वाटते. तुम्हाला या कार्याचा अनुभव आहे. म्हणून तुमच्या मार्गदर्शनानुसार या यंत्रणेचे स्वरूप ठरविण्याचा आमचा विचार आहे. एडगर हूवर यानी तुम्हा चौघांच्या समितीचे अध्यक्षपद स्वीकारावे. तुमचा अहवाल आम्हाला शक्य तितक्या लवकर मिळावा. त्या दृष्टीने हस्टनने तयार केलेल्या आराखड्यावर तुम्ही नजर टाकावी हे बरे.'

एकटा जे. एडगर हूवर सोडला तर बाकीच्या तिघानी हस्टनने तयार केलेल्या मसुद्याला आपली संमती असल्याचे सांगितले. हस्टन हूवरपेक्षा सत्तेचाळीस वर्षांनी लहान होता. त्यामुळे आपल्या अनुभवाचा फायदा हस्टनला मिळावा म्हणून हूवर त्याला म्हणाला, ' कोणत्याही गोष्टीची घाई करून चालणार नाही. अंतर्गत सुरक्षिततेचा प्रश्न इतका गंभीर आहे की त्याच्याकडे आपल्याला वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.'

निक्सन यांचे स्थान सुरक्षित ठेवण्यासाठी हस्टन एवढा उतावीळ झाला होता की एफ. बी. आय. सारख्या महत्त्वपूर्ण संघटनेचे संचालकपद भूषवित असलेल्या हूवरच्या सूचनेचा आपण नीट विचार केला पाहिजे अशीही त्याला गरज वाटली नाही. उलट हूवरचा अपमान करण्यासाठी तो उत्तरला, ' हे बघा, आम्हाला भूतकाळाशी कर्तव्य नाही. आम्ही वर्तमानकाळात जगत आहोत.'

हस्टनचा हा उद्दाम उत्साह पाहून हूवर गप्प बसला.

दीड-एक महिन्याने हस्टनने आपली सविस्तर योजना निक्सन यांच्यापुढे मांडली. ज्या व्यक्तीचा सरकारविरोधी निदर्शनाचे पुरस्कर्ते म्हणून संशय येईल त्याची टेलिफोनवरील बोलणी ध्वनिमुद्रित करणे, त्यांच्याकडे येणारी पत्रे आधी वाचून मग ती शहाजोगपणे त्यांच्याकडे पोहोचती करणे, विद्यापीठाच्या वसतीगृहांमध्ये सरकारी खबऱ्यांची संख्या वाढविणे आणि या साऱ्या खर्चासाठी बँकेत एक वेगळे खाते उघडून त्यातून आपल्या ' माहितगारा 'ना ' मानधन ' देणे हा हस्टनच्या योजनेचा मुख्य गाभा होता.

आपल्याच नागरिकावर अशा रीतीने सर्वंकष पाळत ठेवण्याचा कार्यक्रम अमेरिकेने यापूर्वी कधीही—अगदी युद्ध काळातसुद्धा—अमलात

आणलेला नव्हता. मुख्य म्हणजे सी. आय. ए. आणि एफ. बी. आय. यांच्या व्यतिरिक्त आणखी एक गुप्तचर सघटना अस्तित्वात येणार होती आणि तीही संपूर्णतः श्वेतभवनाच्या नियंत्रणाखाली. श्वेतभवनातील अधिकारी-वर्ग हे एक वेगळे अधिकार-केंद्र निर्माण झाले तर श्वेतभवनाची शक्ती तर अमर्याद वाढेलच, शिवाय जी संस्था राष्ट्राध्यक्षाला मजूर नाही तिचा बीमोड करण्याचा आणि त्यायोगे राजकीय विरोधकाचे निर्दालन करण्याचा, लोकसत्तेच्या सकेतानुसार अशोभनीय मानला गेलेला अधिकार श्वेतभवनामध्ये राष्ट्राध्यक्षांच्या भोवती वावरणाऱ्या मडळीना प्राप्त होईल हा धोका ओळखून हूवरने हुस्टनच्या या योजनेला स्पष्ट विरोध दर्शविला.

हूवर आपल्याला बधत नाही हे पाहून हुस्टनने, निक्सन यांच्या मार्फत हूवर याच्यावर दडपण आणण्याचा प्रयत्न केला. परंतु तरीही हूवरने आपला विरोध सोडला नाही. अशा परिस्थितीत ही योजना आपल्याला पुढे रेटता येणार नाही हे हुस्टनच्या ध्यानात आले आणि आपला हा खटाटोप कदाचित उघडकीस आला तर आपल्यावर टीकेचा भडिमार होईल याचा अदाज घेऊन हुस्टनने श्वेतभवनाआपली नोकरी सोडून दिली आणि पुनश्च वकिलीचा व्यवसाय सुरू केला. त्याच्या जागी श्वेतभवनातील सुरक्षितताविषयक सल्लागार म्हणून जॉन डीनची नियुक्ती करण्यात आली.

## पेण्टॅगॉन पेपर्स

जोपर्यंत हूवर एफ. बी. आय. च्या सचालकपदी आहे तोवर देशद्रोहाला सरावलेले कम्युनिस्ट कार्यकर्ते आणि गुडगिरी करून लोकामध्ये दहशत निर्माण करीत असलेले 'माफिआ'चे बदमाश यांच्या व्यतिरिक्त आपल्याला इतरांना पकडता येणार नाही हे श्वेतभवनातील निक्सन याच्या सहकाऱ्याना कळून चुकले.

विद्यार्थ्यांच्या उठावामुळे निक्सन प्रशासन एवढे अस्वस्थ झाले होते की आपल्याला आव्हान देऊ पाहणारी ही प्रवृत्ती वेळीच, कणखर उपाय योजून नष्ट केली पाहिजे यासाठी दररोज खलबते होत होती.

ही अस्वस्थता शिगेला पोहोचविली 'पेण्टॅगॉन पेपर्स'च्या प्रसिद्धीने. उत्तर आणि दक्षिण व्हिएतनाम याच्या दरम्यान सुरू असलेल्या सघर्षामध्ये अमेरिका किती खोलवर रुतली आहे हे सरक्षण खात्यातील अधिकृत कागदपत्राच्या द्वारे 'न्यूयॉर्क टाईम्स'ने दाखवून दिले. या कागदपत्राचा एकेक भाग जसजसा 'न्यूयॉर्क टाईम्स'मध्ये प्रसिद्ध होऊ लागला तसतसा केनेडी आणि जॉन्सन याच्या कारकिर्दीतही, आपल्याला वस्तुस्थितीसबधी किती अधारात ठेवण्यात आले होते हे अमेरिकन लोकांच्या ध्यानात येऊ लागले. या पार्श्वभूमीवर दक्षिण व्हिएतनाममधून आपण आपली सेना काढून घेत आहोत या निक्सन याच्या आश्वासनासबधीचा सशय अधिकच गहिरा झाला. या काळात, निक्सन यानी आपले राष्ट्रीय सुरक्षितता सल्लागार डॉ. हेन्री किसिंजर याच्यामार्फत उत्तर व्हिएतनाम प्रतिनिधीशी गुप्त शातता वाटाघाटी सुरू केल्या होत्या. त्या वाटाघाटीचे फलित निश्चित होण्यापूर्वी निक्सने याना याबाबत अधिक काही जाहीर करणे शक्य नव्हते. त्यामुळे ते आणखीच चमत्कारिक परिस्थितीत सापडले.

परंतु, सरक्षणखात्यातील कागदपत्र लोकापर्यंत पोहोचावेत या घटनेने आणखी एक खास गुप्तचर यंत्रणा उभारावी या त्यांच्या मूळच्या विचाराला अधिकच बळकटी आली. खरे म्हणजे डॅनिएल एल्सबर्ग या सरक्षणखात्यातील एका निवृत्त अधिकाऱ्यामुळेच हे गुप्त आणि गभीर कागदपत्र 'न्यूयॉर्क टाईम्स'ला मिळाले होते हे नतर बाहेर आले होते. तरीही या निमित्ताने आपल्याला आपला मूळचा विचार पुढे रेटणे सोयीचे जाईल हे निक्सन यांच्या चाणाक्ष मनाने टिपले. त्यानी जॉन एलिचमान याला या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक खास विभाग स्थापन करण्याचा आदेश दिला.

जॉन एलिचमान आणि बॉब हाल्डेमान हे निक्सन याचे दोन हस्तक तर या आदेशाचीच वाट पाहात होते. त्यामुळे एलिचमानने मोठ्या उत्साहाने श्वेतभवनातील एका खोलीमध्ये चौकशी विभाग सुरू करून त्याचे प्रमुखपद सर्वस्वी आपल्या तत्राने वागेल अशी खात्री असलेल्या क्रोघ याला बहाल केले. डेव्हिड यग हा क्रोघचा मुख्य सहाय्यक आणि जॉन कॉलफिल्ड नि टॉनी उलासेविक्ष हे त्याचे सहकारी असा गोतावळा तेथे जमला. हे सर्वजण पूर्वी न्यूयॉर्कमधील गुप्त पोलीस खात्यात काम करीत असल्यामुळे त्याच्याकडून तपासाचे काम चोख रीतीने पार पडेल अशी एलिचमानची खात्री होती.

या विभागात आणखी दोघाजणांचा समावेश करण्यात आला. ते म्हणजे हॉवर्ड हूट आणि गॉर्डन लिडी. यापैकी हुंटने सी. आय. ए. मध्ये काम केले असल्यामुळे त्याला दिवसाला शंभर डॉलर पगार देण्याचे ठरले. साम्यवादाच्या आक्रमणापासून लोकसत्ताक जग वाचविणे हे सी. आय. ए. चे उद्घोषित ध्येय असले तरी प्रत्यक्षात अमेरिकाविरोधी राजवटी खाली खेचण्यासाठीच या सघटनेचा जन्म झालेला होता. या सघटनेचा हस्तक म्हणून हुंट काही दिवस पॅरिसला राहिला होता. त्यानतर मॉंटेव्हिडो येथे त्याची बढती देऊन बदली करण्यात आली होती. त्यामुळे क्यूबावरील आक्रमणाच्या गुप्त तयारीमध्ये ज्यांनी विशेष पुढाकार घेतला त्यात हूट होता. आता आपला सी. आय. ए. शी काहीही सबंध नाही अशी बतावणी करण्यासाठी मध्यतरी हूटने त्या सघटनेचा राजीनामाही दिला. मॉंटेव्हिडोहून तो प्रथम मेक्सिकोला आणि नतर मिआमी येथे राहायला गेला. क्यूबातील कॅस्ट्रो याची राजवट उलथवून पाडायची असेल तर त्याच्या राजवटीविरुद्ध लढा करू इच्छिणाऱ्या क्यूबन बडखोराची सेना उभारली पाहिजे हे अमेरिकन प्रशासनाला उमगले आणि म्हणून हुंटरच्या पुढाकाराने क्यूबन क्रांतिकारी समितीची मुहुर्तमेढ रोवण्यात आली. यावेळी हुंटरने एडवर्ड हे साकेतिक नाव धारण केले होते. या काळात तो स्वतः क्यूबाला जाऊन आला होता. कॅस्ट्रोचा खून करणे जमेल की नाही याचा त्याने त्यावेळी अदाज घेतला. पुढे रशियाने क्यूबातील आपले शस्त्रागार काढून घ्यायची तयारी दर्शविल्यामुळे क्यूबा-प्रकरण ताणले गेले नाही. परतु आपल्याला नकोशी झालेली राजवट खाली खेचण्यासाठी सी.आय.ए. च्या हालचाली कोणत्या टोकापर्यंत जाऊ शकतात याची या निमित्ताने पुन्हा एकदा चुणक दिसली.

आपल्या क्यूबाविरुद्ध कारवायाचा सुरस कथाभाग 'गिव्ह अस धिस डे' या पुस्तकात हूटने वर्णन केला आहे. सी. आय. ए. मधील अनुभवाचा लेखक म्हणून हूटने चागलाच उपयोग करून घेतला. त्याने निरनिराळी नावे घेऊन गुप्तचरविषयक सेहेचाळीस कादबऱ्या

लिहिल्या. असा हा हंट चार्ल्स कोल्सनचा हात धरू निक्सन यांच्या कारकिर्दीत श्वेतभवनामध्ये प्रविष्ट झाला. हटला सी. आय. ए. चा अनुभव होता तर गॉर्डन लिडीची हयात एफ. बी. आय. मध्ये व्यतीत झाली होती. त्याच्या हुशारीवर खूश होऊन क्रोघने त्याला श्वेतभवनातील नव्या गुप्तचर विभागामध्ये पाचारण केले होते.

सी. आय. ए. आणि एफ. बी. आय. यांच्याशी सबंध नसलेली ही गुप्तचर सघटना श्वेतभवनात आकार घेत असताना, जनरल रॉबर्ट एव्हर्ट व कुशमन याच्यासारख्या निक्सन यांच्या जुन्या मित्राचे श्वेतभवनातील येणेजाणे वाढू लागले. कुशमन, हंट आणि एर्लिचमान यांनाही परिचित असल्यामुळे त्याला हेल्म्सचा मदतनीस म्हणून नेमण्यात आले. निक्सन-प्रशासनाविरुद्ध साऱ्या देशभर कोठे कोठे कोणकोणते प्रयत्न चालू आहेत याचा छडा लावण्यासाठी हट आणि लिडी यांना आता हिंडावयाचे होते. त्यासाठी देशभरचा वाहन परवाना आणि निरनिराळ्या बनावट स्थानिक सस्थांचे सदस्यत्व पैदा करणे आवश्यक होते. ही कामगिरी कुशमनने पार पाडली. एडवर्ड जोसेफ वॉरेन हे नाव हटने धारण केले तर जॉर्ज लिओनोर्ड हे नाव घेऊन लिडी संचाराला बाहेर पडला.

त्या दोघाना प्रथम पेण्टॅगॉन पेपर्स प्रसिद्ध करून निक्सन यांना डोकेदुखी निर्माण करणाऱ्या डॅनिएल एल्सबर्गला बदनाम करावयाचे होते. एल्सबर्गला मध्यतरी काही काळ मानसिक आजाराने पछाडले होते हे एफ. बी. आय. कडून कळल्यामुळे तर हंट आणि लिडी भलतेच खूश झाले. एल्सबर्गने वेडाच्या भरात पेण्टॅगॉन पेपर्सच्या प्रसिद्धीचा उपद्व्याप केला असे त्याना सिद्ध करता आले असते तर मोठीच कामगिरी बजाविल्याचे समाधान त्याना लाभणार होते. म्हणून हटने आपला एक माणूस एल्सबर्गवर उपचार करणाऱ्या डॉ. फिल्डीग याच्याकडे धाडला. रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील सबधाचे महत्त्व डॉ. फिल्डीग जाणत होते. त्यामुळे कोणत्याही आमिषाला बळी न पडता त्यांनी चौकशी करायला आलेल्या माणसाला साफ सांगितले, 'हे बघा, एक डॉक्टर म्हणून माझ्या रुग्णासबधी माहिती देणे मला प्रशस्त वाटत नाही. माफ करा.'

डॉ फिल्डीग याच्याकडून एल्सबर्गच्या मनोवृत्तीचा तपशील मिळणार नाही असे एफ. बी. आय. कडून कळल्यानतरही हट स्वस्थ बसला नाही. त्याने ती कामगिरी सी. आय. ए. कडे सोपविली. सी. आय. ए. मध्ये काम करणारे मानसशास्त्रज्ञ आपल्या व्यवसायात अधिक कुशल असल्यामुळे ते एल्सबर्गसबंधी नक्कीच आपल्याला बरेच काही सागू शकतील अशी हटची कल्पना होती. एखाद्या व्यक्तीच्या हावभावावरून आणि बोलण्यावरून तिच्या विचार-प्रवाहाची दिशा निश्चित करण्याचे कार्य या मानसशास्त्रज्ञानी आतापर्यंत चागल्या रीतीने बजाविले होते. १९६१ मध्ये व्हिएन्ना येथे ख्रुश्चोव्ह यानी भेट घेण्यापूर्वी केनेडी यांना याच शास्त्रज्ञाकडून ख्रुश्चोव्ह याच्या सूक्ष्म मानसिक आदोलनाचा तपशील मिळालेला होता. परतु हा विभाग परदेशी व्यक्तीबाबत माहिती गोळा करण्यासाठी स्थापन करण्यात आल्यामुळे सी. आय ए. ने हटची एल्सबर्गबाबतची विनती अमान्य केली.

तेव्हा डेव्हिड यग हेम्सना म्हणाला, 'मागे तुम्ही 'म्युल्ले' प्रकरणाचा अपवाद करून त्या जहाजाचा कप्तान लॉईड बुचर याची अशीच पाहणी केली होती. पेण्टॅगॉन पेपर्स हे प्रकरण तसेच महत्त्वाचे असल्यामुळे तुम्ही यावेळीही ते काम केले पाहिजे.'

हेम्सने डॉ. जॉन टेटजेन आणि डॉ. बर्नार्ड मॅलॉय यांना बोलावून घेतले. आपण हे काम करणे बरे नव्हे असे त्या दोघा डॉक्टरांनी हेम्सला सुचवून पाहिले. परंतु खुद्द अध्यक्षांकडून तसा आदेश आल्यामुळे आपल्याला नाही म्हणता येणार नाही हे हेम्स यांनी डॉ. टेटजेन आणि मॅलॉय यांना पटवून दिले. त्या नंतर या दोघा डॉक्टरानी एल्सबर्गसबधी वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेला मजकूर, सरकारी नोकरीच्या काळात त्याच्यासबधी वरिष्ठानी वेळोवेळी केलेल्या नोंदी आणि एफ. बी. आय. च्या फायलीमध्ये त्याच्याबाबत केलेली टिपणे यांच्या आधारे एल्सबर्गच्या मनोविश्वाचा आलेख रेखाटला. परतु त्यावरून एल्सबर्ग हा मनोविकारानी पहिल्यापासून ग्रासला गेलेला आहे हे काही सिद्ध होऊ शकले नाही. डॉ. टेटजेन आणि डॉ. मॅलॉय यानी आपल्या वृत्तान्तात एवढेच म्हटले होते. 'एल्सबर्ग हुषार आणि आकांक्षी आहे. अशा माणसांना पस्तीस ते पचेचाळीस या वयोमर्यादेमध्ये एखादा मानसिक ताण असह्य होण्याचा संभव असतो. एल्सबर्गचे असेच झाले असले पाहिजे. जीवनात जे साध्य करावयाचे म्हणून ठरविले होते ते सफल न झाल्यामुळे तो स्वत:वरच वैतागला असला पाहिजे आणि त्यातूनच त्याला पेण्टॅगॉन पेपर्ससारखे कागदपत्र प्रसिद्ध करण्याची ऊर्मी आलेली असावी.'

## शत्रूंची यादी

परंतु या वृत्तान्तातील पुढचा भागच अधिक महत्त्वाचा होता—

'देशद्रोह करावा या प्रेरणेने एल्सबर्गला झपाटलेले होते असे मुळीच दिसत नाही. उलट देशभक्तीच्या भावनेपायीच तो या कृत्याला प्रवृत्त झालेला दिसतो. व्हिएतनामविषयक अमेरिकन प्रशासनाने स्वीकारिलेले धोरण अमेरिकन जनतेच्या हिताशी विसंगत आहे अशी त्याची धारणा होती. शिवाय प्रशासन आणि जनता याच्यात विश्वासार्ह सबध प्रस्थापित होणे आवश्यक आहे असे एल्सबर्गला वाटत असल्यामुळेच त्याने पेण्टॅगॉन पेपर्सच्या प्रसिद्धीत पुढाकार घेतला.'

क्रोघ आणि यग या निक्सन याच्या सुरक्षिततेविषयी काळजी करणाऱ्या यत्रणेच्या प्रमुख अधिकाऱ्यांना या दोघा मानसशास्त्रज्ञांचा हा अभिप्राय रुचणे शक्यच नव्हते. म्हणून त्यानी एर्लिचमानला कळविले, 'हा अहवाल अगदीच वरवरचा आहे.'

एल्सबर्गला बदनाम करण्याची सधी साधता आली नाही म्हणून निराश झालेले एर्लिचमान आणि हाल्डेमान यांना आता स्वस्थ बसून चालणार नव्हते. पुढे तरी असा प्रकार घडू नये यासाठी निक्सन याच्या 'शत्रू'ची यादी तयार करण्याचे त्यानी ठरविले. त्यासाठी श्वेतभवनामध्ये एक वेगळा विभाग लगेच उघडण्यात आला.

हा विभाग सुरू करण्यामागचे उद्दिष्ट लपवून ठेवण्यासाठी हाल्डेमान आणि एर्लिचमान यांच्या वतीने असे सांगण्यात आले की, 'राष्ट्राध्यक्षासमवेत वेळोवेळी जे भोजन-समारंभ आयोजित केले जातात त्यावेळी कोणाकोणाला निमत्रणे द्यावीत आणि श्वेतभवनाची सुरक्षितता लक्षात घेऊन कोणाला त्यावेळी बोलाविण्यात येऊ नये याची माहिती श्वेतभवनाच्या अधिकाऱ्याना असणे आवश्यक आहे. त्या साठीच ही यादी केली जात आहे. जे लोक उघडउघड

अध्यक्षांच्या विरोधात उभे राहतात त्यांना श्वेतभवनामध्ये न बोलावण्यात मुळीच गैर नाही.'

हा खुलासा धादात खोटा होता.

निक्सनना आणि त्यांनी आपल्या भोवती गोळा केलेल्या सुमार बुद्धीच्या आणि वैयक्तिक स्वार्थसाधनेमध्ये गुरफटून गेलेल्या लोकांना जे लोक 'त्रासदायक' वाटत होते त्यांचा पद्धतशीर काटा काढण्यासाठी 'राजकीय शत्रू'ची मोजदाद केली ज़ात होती. अमेरिकन घटनेप्रमाणे आणि परपरेप्रमाणे राष्ट्राध्यक्ष हा सर्वसत्ताधीश असतो. आपल्या चार वर्षांच्या कारकिर्दीत तो एखाद्या बेभान हुकुमशहाप्रमाणे वागू शकतो. निक्सन यांच्या पाठीशी एवढी प्रचंड सत्ता उभी असताना त्याचे राजकीय विरोधक आपण सहजासहजी नामशेष करून टाकू याबाबत हाल्डेमान आणि एर्लिचमान निश्चिन्त होते. जॉन डीननें त्या दोघांना लिहिलेल्या पत्रात तसे अगदी स्पष्ट शब्दात म्हटलेही होते.

### दोनशे व्यक्ती, अठरा संस्था

'राजकीय शत्रू'च्या यादीत पहिले नाव घातले गेले वॉल्टर हायकेल याचे. निक्सननीच त्याला आपला गृहमंत्री म्हणून नेमले होते. परतु हायकेल होयबा नव्हता. अमेरिकेच्या कबोडियावरील आक्रमणाचा निषेध म्हणून विद्यार्थ्यांनी, जेव्हा जोरदार निदर्शने केली तेव्हा निदर्शकांचा पाडाव करण्यासाठी निक्सन प्रशासनाने योजिलेले कठोर उपाय हायकेलला मजूर नव्हते. आपणच नेमलेल्या माणसाने आपल्या विरोधी मत व्यक्त करावे ही गोष्ट अमर्याद सत्तेच्या धुंदीत असलेल्या निक्सनना सहन झाली नाही. म्हणून त्यानी हायकेलची गृहमत्रीपदावरून हकालपट्टी केली. जो विरोधी मत नोदवतो तो आपला शत्रू असे निक्सन मानीत असल्यामुळे 'शत्रू'च्या यादीतील पहिला मानकरी म्हणून हायकेलचे नाव दाखल झाले.

या यादीच्या निमित्ताने हाल्डेमान आणि एर्लिचमान यांच्या हाती एक कोलीतच सापडले.

ही यादी भलीमोठी केली पाहिजे याचाच त्यांनी ध्यास घेतला. जॉर्ज वॉलेस यांनी अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचा 'गुन्हा' केलेला असल्यामुळे त्यांनाही या यादीत ढकलण्यात आले. युजिन मॅकर्थी हा कवीही 'शत्रू' ठरला. पण हे काहीच नाही. एखादे लहानसे आणि असबद्ध कारणही एकाद्या व्यक्तीला या यादीत समाविष्ट करायला पुरेसे ठरू लागले. सॅन क्लेमेण्टे येथील निक्सन याचे निवासस्थान 'पश्चिमेकडील श्वेतभवन' म्हणून ओळखले जात होते. या इमारतीत बसविण्यात आलेल्या यात्रिक जिन्यांपैकी एक नीट चालत नव्हता. झाले, हा एलेव्हेटर तयार केलेल्या ओटिस एलेव्हेटर्स कपनीच्या अध्यक्षाची – राल्फ वेलेट याची – राष्ट्राध्यक्ष निक्सन याचा 'शत्रू' म्हणून नोद करण्यात आली.

असाच आणखी एक किस्सा सांगण्यासारखा आहे.

पेन सेंट्रल रेलरोड कपनीची आर्थिक अवस्था अगदी हलाखीची होती. या हलाखीतून बाहेर पडण्यासाठी कपनीने वीस कोटी डॉलर्सचे कर्ज काढण्याचे ठरविले. जर सरकार या कर्जाला तारण राहिले तरच लोक आपले पैसे त्या कपनीत गुंतवतील हे ओळखून कंपनीच्या सचालकांनी निक्सन याना तशी विनंती केली आणि त्यानी ती मानलीही. कारण निक्सन यानी या कंपनीत बरीच गुंतवणूक केली होती. आपल भाडवल सुरक्षित रहावे म्हणूनच पेन सेंट्रल रेल रोड कंपनीसाठी सरकार तारण राहायला तयार झाले आहे या आरोपाचा राईट पॅटमन याने प्रतिनिधीगृहामध्ये उच्चार करताच क उभारणीचा सारा बनाव विसकटून गेला. त्यामुळे पॅटमन 'शत्रू'च्या यादीत दाखल झाला.

या यादीची लाबीरुदी ऐसपैस वाढत होती.

दोनशे व्यक्ती आणि अठरा संस्था निक्सन यानी शत्रूस्थानी ठरविल्या. त्यात येल विद्यापीठाचे कुलगुरू होते, हॉर्वर्ड विद्यापीठविधिविभागाचे प्रमुख होते, एक नोबेल पारितोषिक विजेता होता, तर पुलिट्झर पारितोषिकाचे चार मानकरीही या माळेत गोवले गेले होते. चार भूतपूर्व मत्री आणि दोन भूतपूर्व राजदूत याच्या समवेत जो नॅमथ हा फूटबॉल खेळाडूही राष्ट्राध्यक्षाचा 'शत्रू' ठरला. डेमोक्रॅटिक पक्षाचे मान्यवर नेते तर या नाममालिकेतून सुटण्यासारखे नव्हतेच. टेड केनेडी, विल्यम फुलब्राईट, एडमड मस्की, जॉर्ज मॅकगव्हर्न, शिवाय न्यूयॉर्कचा महापौर जॉन लिंडसे यांच्या कारवायांवर या पुढे सक्त नजर ठेवण्यात येणार होती. प्रतिनिधीगृहातील आणि सेनेटमधील सर्व निग्रो सदस्याची नोद झाली. ब्लॅक पॅन्थर्स आणि राष्ट्रीय युवक सघटना याच्यावर तर निक्सन प्रशासनाचा विशेष रोष झालेला दिसत होता.

निक्सन याच्या भ्रष्टाचाराविरुद्ध आवाज उठविणाऱ्या पत्रकारांचीही सुटका होणार नव्हती. सत्तावन पत्रकारामध्ये जॅक अँडरसन, जेम्स हस्टन, डॅनिएल स्कॉट, मेरी मॅकगॉरी हे प्रमुख होते. शिवाय अमेरिकन जनमताचे प्रतिबिंब मानली गेलेली आणि साऱ्या जगभर प्रतिष्ठा प्राप्त केलेली 'न्यूयॉर्क टाईम्स' आणि 'वॉशिंग्टन पोस्ट' ही दैनिकेही 'काळ्या यादी'त दाखल झालेली होती.

अभिनेते आणि अभिनेत्री यानाही न वगळण्याची दक्षता घेतली गेली होती. पॉल न्यूमन, जेन फोण्डा, ग्रेगरी पेक, स्टीव्ह मॅकक्वीन, बार्बारा स्ट्रेसाण्ड, कॅरौल कॅनिंग या कलावतानाही 'शत्रू'चा किताब बहाल करण्यात आला.

ही अशी यादी तयार करण्याच्या सैराट कार्यामध्ये काही विनोद घडणे अपरिहार्य होते.

भूतपूर्व अॅटर्नी जनरल रॉबर्ट मॉर्गेन्थो याच्याऐवजी प्राध्यापक हॅन्स मॉर्गेन्थो याचे नाव लिहिले गेले. एका मृत वार्ताहराचेही या यादीत नाव अंतर्भूत करण्यात आले.

'शत्रू'ची यादी तयार झाली, पण त्याचा 'बदोबस्त' कसा करायचा हे अद्याप ठरत नव्हते.

या बड्या व्यक्तींपैकी बहुतेक साऱ्या व्यक्ती प्राप्तीकराच्या वा अन्य कराच्या जाळ्यात कोठे ना कोठे तरी नक्कीच सापडतील असा निक्सन प्रशासनाचा कयास होता. त्यामुळे या साऱ्या व्यक्तीची प्रकरणे विशेष तपासासाठी इण्टर्नल रेव्हेन्यु सर्व्हिसकडे सोपविण्यात आली. त्यातून काही निष्पन्न झाले नाही हे खरे असले तरी, क्लार्क क्लिफर्ड यानी म्हटल्याप्रमाणे, राजकीय शत्रूची यादी करून निक्सन प्रशासन पोलिसी राजवटीच्या दिशेने पावले टाकू लागले होते हे निश्चित.

दारिद्र्याच्या यातना जशा दु:सह असतात तसाच समृद्धीचा शापही विलक्षण असतो. प्रचड प्रमाणावर आर्थिक बळ पाठीशी उभे

असल्याशिवाय सार्वजनिक जीवनामध्ये पायरोवा करताच येऊ नये अशी अवस्था समृद्धीच्या शिखरापर्यंत झेप घेतलेल्या अमेरिकेची झालेली आहे. त्यामुळे निवडणुका म्हणजे अमाप धनसचयाचा आणि व्ययाचा मोठा अवघड खेळ होऊन बसला आहे.

प्रिन्स्टन येथल्या सिटीझन्स रीसर्च फौंडेशनचे हर्बर्ट अॅलेक्झाडर यानी केलेल्या पाहणीनुसार, १९६८ मध्ये अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष, उपराष्ट्राध्यक्ष आणि निरनिराळया पन्नास राज्याचे गव्हर्नर, त्याचप्रमाणे सेनेट आणि प्रतिनिधीगृह याच्या निवडणुकीसाठी तीस कोटी डॉलर्स खर्ची पडले. १९६४ मधल्या निवडणूक–खर्चांच्या तुलनेने ही रक्कम पन्नास टक्क्यांनी अधिक होती. १९७२ मधल्या निवडणुकीने तर यावर मात केली. सेनेटच्या शंभर जागासाठी उभ्या असलेल्या उमेदवारानी प्रत्येकी सहा लाख डॉलर्स खर्च केले तर प्रतिनिधीगृहाची निवडणूक लढविणाऱ्यानी प्रत्येकी ऐंशी हजार डॉलर्सची खिरापत केली. परतु राष्ट्राध्यक्षपदासाठी उभ्या राहणाऱ्या उमेदवाराच्या खर्चाचे आकडे पाहिले तर प्रतिनिधीगृह आणि सेनेट यांच्या उमेदवारांचे आकडे क्षुल्लक भासावेत.

१९६९ मधल्या निवडणुकीच्या वेळी जे एकूण तीस कोटी डॉलर्स खर्च झाले त्यापैकी दहा कोटी डॉलर्स त्यावेळी अध्यक्षीय निवडणुकीस उभ्या राहिलेल्या उमेदवारानी खर्च केले. त्यापैकी निक्सन याचा एकट्याचा खर्चच सव्वा तीन कोटी डॉलर्सच्या पुढे गेला होता. १९७२ मधील निवडणुकीच्या वेळी निक्सन अध्यक्षपदावर असल्यामुळे स्वत:च्या प्रचारासाठी त्यांना शासकीय यत्रणा भरपूर राबविता आली. तरीही व्हिएतनाम-प्रकरणामुळे त्यांच्या जनमानसातील स्थानाला फार मोठा धक्का पोहोचलेला होता; आणि म्हणून या वेळेला पैशाची फार मोठी गरज त्याना जाणवत होती.

पैशाचा बेबंद वापर करून ही निवडणूक जिंकायचीच अशी निक्सन याची प्रतिज्ञा होती. निक्सन याचा हा मनोरथ कळताच, अॅटर्नी जनरल जॉन मिचेल याने निवडणूक निधी गोळा करण्यासाठी 'राष्ट्राध्यक्ष फेरनिवडणूक समिती' हे सोज्वळ नाव घेतलेला गट स्थापन केला. 'क्रीप' या नावाने हा गट लवकरच अमेरिकेत ओळखला जाणार होता—गाजणार होता.

धनवतांकडून पैसा काढणे हे एक तत्र असते आणि त्या तंत्रात मुरलेल्या लोकाची मदत घेतल्याशिवाय राजकारणी नेत्याचे चालत नाही. मिचेलने मॉरिस स्टान्स आणि हर्बर्ट कामबाच यांना त्यासाठीच 'क्रीप'मध्ये घेतले.

वाढत्या महागाईमुळे दुग्धव्यावसायिकांना आपल्या उत्पादनांची किंमत वाढवून मिळायला हवी होती. म्हणून त्यानी कृषिमंत्री क्लिफर्ड हार्डिन याची भेट घेतली. हार्डिनने त्याचे सगळे म्हणणे ऐकून घेऊन लोण्याचा भाव चार डॉलर सहासष्ट सेंट ठरवून दिला. परतु ही किंमत परवडणारी नसल्यामुळे आपल्याला तिच्यात आणखी वाढ मिळावी असा दुग्धव्यावसायिकांनी आग्रह धरला. किंमत आणखी वाढवून दिली तर ग्राहकाचा असतोष पत्करावा लागेल असे सागून हार्डिन याने किंमत आणखी वाढवून द्यायला नकार दिला.

दुग्धव्यावसायिक मंडळी चतुर होती. राजकारणी व्यक्तींच्या गरजाचा फायदा कसा घ्यायचा हे त्यांना पूर्णपणे ठाऊक होते. कृषिमंत्री भाव वाढवून देत नाहीत हे आढळून येताच त्यांनी रिपब्लिकन पक्षाच्या निवडणूक निधीला दहा हजार डॉलर्सची देणगी दिली.

ही देणगी अतिशय परिणामकारक ठरली. कारण दुसऱ्या दिवशी खुद्द निक्सन यांनी या दुग्धव्यावसायिकाना चर्चेसाठी पाचारण केले. दुग्धव्यावसायिकांनी आपली मूळची मागणी त्याच्या पुढे माडली; पण निक्सनही चलाख होते. त्यानी 'विचार करतो' एवढे आश्वासन देऊन या मडळीची बोळवण केली.

दुग्धव्यावसायिक काय समजायचे ते समजले. त्यानी पंचवीस हजार डॉलर्सचा दुसरा हप्ता 'क्रीप'कडे धाडून दिला. चोवीस तासांच्या आत कृषिमंत्री हार्डिन यानें जाहीर केले, 'दुग्धपदार्थांच्या किंमती सत्तावीस सेंटनी वाढवून देण्यात येत आहेत.'

हार्डिनची घोषणा ऐकताच दुग्धव्यावसायिकांनी 'क्रीप'च्या तिजोरीत आणखी सव्वाचार लाख डॉलर्सचा भरणा केला.

### पैसा गोळा करण्याची मोहीम

राजकीय पक्षांनी आणि विशेषत: सत्तारूढ पक्षाने निवडणूक निधीसाठी आरभिलेला भ्रष्टाचार अनेक अमेरिकन लोकप्रतिनिधींना खटकत होता. त्यामुळे निवडणूक निधीचा–व्यवहार गुप्त राहता कामा नये या उद्देशाने त्यानी ससदेमध्ये एक विधेयक मंजूर केले. या विधेयकानुसार दहा डॉलर्सपेक्षा अधिक रकमेच्या देणग्या जाहीर केल्या पाहिजेत आणि शभर डॉलर्सवरच्या देणग्यांच्या खर्चाचा हिशेब ससदीय हिशेब समितीला सादर केला पाहिजे असे ठरले. हे विधेयक स्वाक्षरीसाठी २६ जानेवारी, १९७२ रोजी अध्यक्ष निक्सन याच्याकडे आले.

'क्रीप'ने आपल्यासाठी उभारलेला उद्योग निक्सन याना पूर्णपणे माहीत असल्यामुळे त्यानी या विधेयकावर लगेच स्वाक्षरी केली नाही. दहा दिवस थाबून त्यानी ७ फेब्रुवारीला त्या विधेयकावर आपल्या मान्यतेचे शिक्कामोर्तब केले. परतु जणू काही ही तरतूद आपल्याला एकदम पसत आहे असा आभास निर्माण करण्यासाठी विधेयकावर स्वाक्षरी केल्यानतर निक्सन उद्गारले, 'निवडणुकीवरचा लोकाचा विश्वास कायम राखण्यासाठी अशा तऱ्हेच्या कायद्याची गरज होतीच.'

हा नवा कायदा सात एप्रिलपासून अमलात येणार होता. म्हणजे अद्याप आपल्या कारवाया बिनदिक्कत चालू ठेवायला 'क्रीप'ला दोन महिन्याचा अवधी होता. या दोन महिन्यामध्ये जे काही जमा होईल त्याचा हिशोब द्यायचा नसल्यामुळे 'क्रीप'ने धनाढ्य उद्योगपती आणि मातबर शेतकरी यांच्याकडून पैसा गोळा करण्याची मोहीम आरभिली.

बॉब हाल्डेमान, जॉन एर्लिचमान, जॉन मिचेल आणि कोलसन प्रभृती निक्सन याचे हस्तक एखाद्या वादळासारखे सुसाट धावू लागले. एर्लिचमान आणि मिचेल यानी पूर्वी वकिलीचा व्यवसाय केलेला असल्यामुळे त्यांना श्रीमत कुळांचा ठावठिकाणा माहीत होता, तर बॉब हाल्डेमान, जे वॉल्टर टॉम्सन या जागतिक ख्यातीच्या प्रसिद्धी संस्थेमध्ये मोठ्या हुद्द्यावर होता. त्यामुळे त्याची अनेक उद्योगपतींशी चांगली जान-पहचान होती. निक्सन यानी आपल्या भोवती गोळा केलेली ही सगळी माणसे कमालीची स्वार्थी तर होतीच, पण हाती बेसुमार अधिकार आल्यामुळे सार्वजनिक नीतिमत्तेच्या

प्राथमिक मूल्यालाही ती पारखी झालेली होती.

रिपब्लिकन पक्षाचा एक सेनेटर खूपच आजारी होता. त्यामुळे, राष्ट्राध्यक्षानी स्वत. जाऊन, मृत्युशय्येवर पडलेल्या त्या सेनेटरची भेट घ्यावी म्हणजे त्याला बरे वाटेल अशी चिठ्ठी त्या सेनेटरच्या मित्राने श्वेतभवनात धाडली. ती हाल्डेमान याच्या हातात पडली. चिठ्ठी घेऊन येणाऱ्या माणसाला हाल्डेमानने सागितले, ' तो सेनेटर मेला की आम्हाला कळवा. मग राष्ट्राध्यक्ष त्याच्या विधवेचे सांत्वन करायला जातील. '

' निक्सनसाठी तू काय करशील ' असे एकदा कोणी तरी कोल्सनला विचारले तेव्हा ती स्वारी उदगारली, ' निक्सननी सांगितले तर मी माझ्या म्हाताऱ्या आजीच्या शरिरावर नाचायलाही कमी करणार नाही. '

असे हे निक्सन याचे बेमुर्वतखोर सहकारी !

माणसाची किंमत त्याच्या भोवती वावरणाऱ्या मित्रांच्या लायकी-वरून करता येते. हाल्डेमान, मिचेल, एर्लिचमान प्रभृतीच्या वक्तव्यांवरून आणि वर्तनावरून निक्सन कोणत्या पातळीवरच्या मडळीमध्ये वावरत होते याचा सहज अदाज येतो.

' क्रीप 'च्या कार्याला वाहून घेण्यासाठी जॉन मिचेलने अॅटर्नी जनरल पदाचे त्यागपत्र दिले आणि ' क्रीप 'चा सचालक हे बिरूद त्याने आपल्या नावाभोवती चिकटविले. मॉरिस स्टान्स ' क्रीप 'च्या आर्थिक समितीचा अध्यक्ष झाला तर त्याचा मदतनीस म्हणून कामकाज काम पाहू लागला.

' क्रीप 'मध्ये दाखल होण्यापूर्वी स्टान्स व्यापारमत्री होता. त्या-मुळे देशातील जवळजवळ सर्व प्रमुख उद्योगपती त्याच्या परिचयाचे होते. शिवाय गेली वीस वर्षे त्याचा श्वेतभवनामध्ये वावर होत होता. आयसेनहॉवर यांच्या कारकिर्दीत तो त्यांचा एक प्रमुख सल्लागार होता. विक्रयकलेमध्ये अनन्यसाधारण प्राविण्य दाखविल्याबद्दल त्याला मधल्या काळात अनेक सस्थाकडून पारितोषिके मिळाली होती. गरीब बेल्जियन मातापित्याच्या पोटी जन्म घेतलेल्या आणि एका लहानशा कारखान्यामध्ये कारकुनाच्या नोकरीपासून चरितार्थाला प्रारंभ केलेल्या स्टान्सने आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या बळावर बराच मोठा पल्ला गाठला होता.

असा हा स्टान्स ' क्रीप 'च्या आर्थिक समितीचा अध्यक्ष म्हणून निक्सन यांच्या फेरनिवडणुकीसाठी पैसा गोळा करायला बाहेर पडल्यानतर अमाप धनभांडार हाती आले नसते तरच नवल ! स्टान्सला लहान मासे ठाऊकच नव्हते. त्याच्यात त्याला रसही नव्हता. त्याने आपले जाळे अमेरिकन अर्थव्यवस्थेचे आधारस्तभ मानल्या गेलेल्या कारखान्यावर फेकले. मग काय–फिलिप्स पेट्रोलियम कपनी एक लाख डॉलर्स, गल्फ ऑईल कॉर्पोरेशन एक लाख डॉलर्स, अॅशलॅण्ड ऑईल इन्कॉर्पोरेटेड एक लाख डॉलर, अमेरिकन एअर-लाईन्स पचावन्न हजार, गुडइयर टायर कपनी चाळीस हजार, मिनिसोटा मायनिंग अँड मॅन्युफॅक्चरिंग कंपनी तीस हजार असा देणग्यांचा पाऊस पडू लागला.

पुढे पुढे तर एक लाख डॉलर्सपेक्षा कमी रकमेची देणगी स्वीकारली जाणार नाही असे स्टान्सने जाहीर केले.

सात एप्रिलपासून निवडणूक निधीचे हिशोब मागणारा कायदा कार्यवाहीत येणार होता. आदल्या दिवशी स्टान्सने आतापर्यंत गोळा झालेल्या देणग्याची बेरीज केली. निक्सन याचा निवडणूक-निधी दोन कोटी डॉलर्सच्या घरात गेलेला होता, आणि त्यापैकी जवळ जवळ पावणे दोन कोटी डॉलर्स तर अगदी रोख रक्कम होती. तरीही स्टान्स याने आपले प्रयत्न आवरते घेतले नाहीत. साडे पाच कोटी डॉलर्स ' क्रीप 'च्या तिजोरीत जमा झाले तेव्हाच कोठे तो थाबला.

एवढ्या अजस्र आर्थिक पाठिंब्याची तरतूद झाल्यावर रिचर्ड निक्सन यानी राष्ट्राध्यक्षपदाच्या फेरनिवडणुकीसाठी आपली उमेदवारी जाहीर करण्याचे ठरविले.

श्वेतभवनालगतच्या इमारतीमध्ये ' क्रीप 'चे कार्यालय होते तर पोटोमॅक नदीच्या काठावरील ' वॉटरगेट ' या वास्तुसमूहामध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या केंद्रीय समितीची कचेरी होती. प्रतिस्पर्ध्याच्या सिद्धतेचा आणि सामर्थ्याचा अदाज घेण्याच्या उद्देशाने ' क्रीप 'च्या कार्यकर्त्यांची नजर ' वॉटरगेट 'भोवती भिरभिरू लागली. त्यातूनच एका धाडसी बेताचा बनाव तयार झाला.

हे कृष्णकृत्य लवकरच ' वॉटरगेट प्रकरण ' या नावाने साऱ्या जगाला परिचित होणार होते.

**उत्तरार्ध पुढील अंकी**


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

**वार्षिक : छत्तीस रुपये**

**सहामाही : वीस रुपये**

**परदेश : (जलमार्गे)**

**पंचावन रुपये**

## माणिकगड, धुळे आणि पुणे : पृष्ठ १० वरून

एक परिषद घेतल्यानंतर हे प्रकार थांबले. तरीही ४ गावातील २०० झोपडया पाडल्याच.

झोपडयांना आगी लावल्याचे सरकारने विधान सभेत मान्य केले आहे.

जिवती हे वनविभाग–शेतीविभागाचे मुख्य ठाणे. २९ एप्रिलला या ठाण्यावर प्रचड मोर्चा काढण्यात आला. तसेच २९–३० मेला प्रचड मोर्चा, प्रखर निदर्शने आणि ठाण्याला घेराव करण्यात आला. ५९१ लोकांना अटक केली गेली, तरीही शेकडो लोकांनी घेराव चालूच ठेवला.

माणिकगडावर देखील घेराव चालूच होता. पोलिसांनी लाल झेडे जप्त केले आणि लोकाना सागितले की, 'आता तुमचे झेंडे जप्त केले आहेत. तुमचा घेराव आता कायदेशीर नाही!' झेडा नाही मग लढायचे कसे? गमत म्हणजे लोकानी घेराव उठविला.

वन अधिकाऱ्यानी जरी झोपडया पाडल्या असल्या तरी ९०% लोकानी आजूबाजूला मुक्काम केला आहे आणि पेरण्यादेखील केल्या आहेत. नुकताच मी या भागातून परत जाऊन आलो. कपाशी, मका, भुईमूग ही पिके उत्कृष्ट आली आहेत.

### चोर सोडून संन्याशाला फाशी

माणिकगडावरील परिस्थितीच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित झाले आहेत.

१ : यातील बहुसख्य लोक भूमिहीन शेतमजूर आणि अनुसूचित जातीजमातीचे आहेत. उपजीविकेचे इतर साधन नव्हते म्हणून हे लोक येथे आले.

२ : माणिकगडावरील जमीन मोकळी आहे असा त्याचा हेतुत. समज करून देण्यात आला,

३ : हे लोक कायदेशीर सारा वगैरे भरतात.

४ : या आदिवासीची बाजू घेणारी स्थानिक मडळी पूर्वी नव्हती. सुदैवाने आता परिस्थिती बदलली आहे. कॉंग्रेसच्या स्थानिक राजकारणामुळे या लोकाना परके (मराठवाडयातील) मानीत असत. अर्थात स्थानिक आदिवासीना देखील जमिनी मिळाल्या पाहिजेत याबाबत दुमत नाही.

५ : या आदिवासीनी गवताखालची जमीन लागवडीखाली आणली. जगलतोड करून नव्हे.

६ : १५ ऑगस्ट ७२ पर्यंतच्या काळातील जमिनीच्या मालकीचे पट्टे द्या, असा सरकारी आदेश निघून देखील या आदेशाची अमलबजावणी होत नाही.

७ : जगल तोडण्याबद्दल खटले जरूर भरा, पण मग हे खटले बडे भाडवलदार, उद्योगपती यांच्यावरही भरावे लागतील व जबाबदार म्हणून जगल अधिकाऱ्यांना देखील शिक्षा केली पाहिजे. पण हे होत नाही. चोर सोडून सन्याशाला फाशी दिले जात आहे.

जगल सवर्धन झाले पाहिजे हे सपूर्ण मान्य. जी जो जमीन जगलाला उपयुक्त ती लागवडीखाली आणू नये असे आम्हालाही वाटते. पण जी जमीन जगलाच्या लागवडीखाली आणण्याची शक्यता नाही अशी कितीतरी जमीन आहे. जियले जंगल उजाड झाले आहे अशी सावतवाडी ते मुंबई दुतर्फा उजाड झालेली जमीन दिसते आहे. पुणे, नगर, औरगाबाद, सोलापूर, बीड या जिल्ह्यातही जंगल सवर्धन करणे शक्य आहे. परंतु तेथे होत नाही आणि जेथे लागवड केली आहे, होत आहे ती जमीन काढून घ्यावी का?

केवळ हट्टाग्रहामुळे, सैद्धान्तिक भूमिकेमुळे हे सर्व प्रकार चालले आहेत. जगल टिकविणे, वाढविणे याची सपूर्ण जबाबदारी जंगलखात्यावर आहे. पण या खात्याला या कामात रस नाही. वन अधिकारी लाचलुचपत घेऊन दुर्लक्ष करतो. त्यामुळे ठेकेदारांना फावते आणि त्याना अक्षरशः रान मोकळे होते. या उलट जो आदिवासी जगलचे सवर्धन–रक्षण करतो त्या आदिवासीला जंगल प्रशासनात काहीही सहभाग मिळू नये? आदिवासीला जंगल प्रशासनात सहभागी करून घेतलेच पाहिजे अशी आमची मागणी आहे.

माणिकगड येथील आदिवासीचा हा जीवनमरणाचा लढा आहे. आपली जमीन सोडायची नाही हा त्याचा ठाम निर्धार आहे. श्रम करून त्या उत्पन्नाचा उपभोग घेण्याचा श्रमिकांना सपूर्ण हक्क आहे. या हक्कावर सरकार आक्रमण करीत आहे. बेकायदेशीर आणि बळाचा वापर करून आदिवासीच्या हक्कावर, पर्यायाने लोकशाही हक्कावर सरकार आक्रमण करीत आहे. त्याचा सगळ्या सुबुद्ध नागरिकांनी धिक्कार आणि प्रतिकार केला पाहिजे, असे आवाहन करून साथी पन्नालाल सुराणा यानी आपले भाषण सपविले.

या नंतरचे वक्ते होते कॉ. शरद पाटील. धुळे जिल्ह्यातील आदिवासीच्या लढ्यात सक्रिय भाग घेणारे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे धुळे जिल्ह्याचे ते कार्यवाह आहेत.

श्री. शरद पाटील :–धुळे जिल्ह्यात आदिवासी व मार्क्सवादी कम्युनिस्टांनी प्रति सरकार स्थापन केले आहे असा धादांत खोटारडा आणि दिशाभूल करणारा आरोप कलेक्टर बी. एन. मरवीजा यानी पत्रकार परिषद घेऊन केला आणि सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे. या सदर्भात वस्तुस्थिती नेमकी काय आहे या विषयी मी आपणास माहिती देणार आहे. महाराष्ट्रात एकूण २९॥ लाख आदिवासी आहेत. त्यातील ६। लाख आदिवासी धुळे जिल्ह्यात आहे. किंबहुना आदिवासीचा हा सर्वात मोठा जिल्हा. बहुसख्य आदिवासी शेतमजूर आहेत. देशात एकूण २७ टक्के शेतमजूर आहेत. त्यातील बहुसंख्य आदिवासी आहेत. शहादा येथे ४० टक्के आदिवासी शेतमजूर आहेत.

सरकारची आदिवासीकडे पाहाण्याची दृष्टी दुटप्पी आणि ढोंगी आहे. एकीकडे आदिवासीची प्रगती झाली पाहिजे असा फसवा प्रचार करायचा आणि दुसरीकडे हे आदिवासी जगलांचा उच्छेद करतात असा खोटा आरोप लादून त्याना ठोकून काढायचे, त्यांच्यावर अत्याचार करायचे!

आदिवासी अत्यत भयानक जीवन जगताहेत.

पिंपळनेर जवळील बाणखेडा येथे एका सभेच्या निमित्ताने गेलो

होतो. सकाळचे ७ वाजलेले. आदिवासी स्त्रियांचा एक मोर्चा डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन चालला होता. बाजूलाच धरणाच्या पाटाच्या जवळ एक वृद्ध स्त्री दृष्टीस पडली. वय ७० वर्षाच्या पुढे. डोक्यावरील केसाची कपाशी झालेली. जोडा जोडाच्या लुगड्याचे लक्तर झालेले. शरिरावर सुरकुत्यांची जाळी. अस्थिचर्म देह. छाती लोहाराच्या भात्यासारखी हालत होती. मोळी फारच जड होती. ४–५ मैलांवरून आणली होती. अतिश्रमाने, ओझ्याने मोळी रस्त्यावर पडली होती, पुन्हा डोक्यावर घेण्याचा तिचा प्रयत्न चालला होता. पुन्हा पुन्हा हा प्रयत्न फोल ठरत होता. तेवढ्यात म्हातारीची नातवंडे तिच्याकडे आली. म्हातारीने जिवाच्या कराराने कसाबसा बोजा उचलून आपल्या डोक्यावर चढवला आणि सावकाश पाय उचलू लागली. ती बहुधा भिल्ल असावी. हेच तिचे जीवन. एखादे दिवशी याच रस्त्यावर त्या वृद्धेचा दम तुटेल !

### 'भूक' हा यक्षप्रश्न

नवापूर–नंदूरबार रेल्वे प्रवास करीत होतो. सहप्रवासी एक वनरक्षक होता. एक बूट पॉलिश करणारा मुलगा आमच्या डब्यात आला. त्या मुलाकडे पाहून तो वनरक्षक अधिकारी मला म्हणाला की 'ही फॉरेस्ट ऑफिसरची औलाद आहे. अशी असख्य मुले तुम्हाला आढळून येतील. तो पुढे म्हणाला, की या भागातील किमान ५०० स्त्रिया रेल्वेने नदूरबारला जातात. विनातिकिट. प्लॅट फार्मवरच तिकिट चेकर पकडून ठेवतात आणि गार्ड, तिकिट चेकर हे त्या स्त्रियांचा उपभोग घेऊन तिकिटांची वसुली करतात. भोवताली वनरक्षक अधिकारी असतातच. ते आपापसात त्या स्त्रियाची 'वाटणी' करतात.

असे हे आदिवासी जीवन. शिवाय उपाशी पोटं !

आदिवासी कोहार नावाच्या गवताचे दाणे गोळा करतात. पाखडतात. ते वाटून दळून त्याचा जो पदार्थ होईल तो पितात.

विषारी कडूकद रानावनातून मिळवायचे. दोन दिवस पाण्यात ठेवायचे. म्हणजे कडवटपणा थोडा कमी होतो. नतर त्याच्या चकत्या करून खायच्या. महूची फुले वाळवतात, दळतात किंवा त्याची दारू करून पितात आणि धुदीत पडून राहतात. अशी उपासमार हेच आदिवासीचे जीवन.

हा भुकेला, दरिद्र आदिवासी जेव्हा शेतकऱ्याकडे पाहतो तेव्हा त्याला एक सत्य निश्चितपणे जाणवते की जगायचे असेल तर जमीन हवी.

जमिनीची भूक हाच या प्रदेशाचा प्रश्न झाला आहे.

अर्थात आदिवासीची जमिनीची भूक शमविण्याची व्यवस्था या समाज व्यवस्थेत नसल्यामुळे त्याला ही भूक चोरूनच भागवावी लागते.

पाणी पुरवठा योजना, धरण योजना (उदा. उकाई धरण) या आदिवासीचा बळी घेऊनच साकार होतात.

जगल सवर्धन झाले पाहिजे असे म्हणून आदिवासीना हाकलून लावणारे हे सरकार स्वत मात्र जगल तोडण्याचे, उजाड करण्याचेच कृत्य करीत आहे याची अनेक उदाहरणे देता येईल.

अक्कल कुवाचे जगल हे डहाणूच्या खालोखाल अत्यत सपन्न जगल. परतु नरसी अंकलेसरिया नावाच्या कत्राटदाराने कॉंग्रेस पुढाऱ्यांच्या संगनमताने हे जगल संपूर्णपणे तोडले आणि लक्षावधी रुपये कमावले.

दिगबर पडवी हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात उपमंत्री होते. अत्यंत सपन्न कुटुब. त्यांच्या मृत्यूनतर सरकारने जगल तोडून ७ एकर जागा पडवी यांच्या पत्नीला दिली.

शिवाय बेकायदा जगल तोड होते तेव्हा सरकार गप्प बसते. आणि आदिवासीवर मात्र पोलिसी दडपशाही करून आपला पुरुषार्थ मिरवते.

माणिकगडला झाले तसेच अत्याचार धुळे जिल्ह्यामध्ये झाले. अधिक निर्घृण, अमानुष, माणुसकीला काळीमा फासणारे ! जेवढी आदिवासीची घरे तेवढ्या कथा, एकाहून एक भयानक.

प्रारभी दहशतीने लोक घाबरले परतु यातून सावरताच या अत्याचाराचा प्रतिकार करण्याचा लढा देण्याचा आदिवासीनी निर्धार केला.

२९ मार्च १९७४ ला शिदवाडचे लोक आले आणि त्यांनी आपला लढ्याचा मनोदय माझेजवळ सागितला. कॉंग्रेसच्या पुढाऱ्याना हे समजताच त्यांनी या लोकाना व मला खुनाची धमकी दिली.

गोपाबाई नावाच्या आदिवासी स्त्रीवर ६ गुडानी सामुदायिक बलात्कार केला.

वनमत्री मधुकरराव चौधरी या भागात दौऱ्यावर आले असताना लोकांनी एक पत्रक दिले. त्यामध्ये मधुकररावाना प्रश्न विचारला होता की 'तुम्ही दुःशासनाची बाजू घेणार की द्रौपदीची ?' पत्रक वाचून मधुकरराव भयकर भडकले.

कॉंग्रेसच्या हातून हा आदिवासी भाग जाऊ लागल्याचे दिसून येताच सरकारचा क्रोध अनावर झाला असून विरोधी पक्षांची ही चळवळ ठेचून काढण्याचा त्यानी निर्धार केला आहे.

५–७ जूनला शरद पवार आले. दौऱ्याची बातमी गुप्त ठेवली होती. पण त्याचे स्वागत विराट निदर्शनाने होईल याची आम्ही जय्यत तयारी केली साकरी, नवापूरचा दौरा ऐनवेळी रद्द करण्यात आला.

शरद पवार, मधुकरराव चौधरी यांनी सामजस्याचा देखावा केला.

शरद पवाराची सभा ज्या दिवशी झाली त्याच दिवशी दापूरच्या लजूबाई गावीत या स्त्रीला व तिचा नवरा, दीर, चार वर्षाचा मुलगा, वृद्ध सासू याना एस. आर. पी नी बेदम मारहाण केली. नवापूर, साक्री व सबध धुळे जिल्ह्यात एस. आर. पी. नी धुमाकूळ घातला आणि दारू पिऊन कोंबड्या, अंडी पळवून नेऊन फस्त करून अत्याचाराचा हैदोस घातला.

या अत्याचाराच्या विरुद्ध २४ जूनला एक प्रचंड 'धिक्कार मोर्चा' निघाला. १ जुलैला धुळ्याच्या कलेक्टरानी मुलाखत देऊन जाहीर आरोप केला की धुळ्यामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्टानी प्रति सरकार स्थापन केले असून स्त्रियावर बलात्कार होत आहेत.

३ जुलैला मी आणि पन्नालाल सुराणा आदिंनी कलेक्टरची भेट घेतली आणि त्यांनी केलेल्या आरोपातील फोलपणा दाखवून दिला.

९ जुलै रोजी पाणखेडा या भूमीहीनांच्या चळवळीच्या बालेकिल्ल्यात एस. आर. पी. नी युद्ध पुकारावे अशी दडपशाही केली. असेच अत्याचार चिचपाडा, वाकी आदि ठिकाणी झाले.

या अत्याचाराच्या निषेधार्थ २॥ हजार आदिवासीनी प्रचड

मोर्चा काढला. ४५० स्त्रियासह १ हजार लोकाना अटक करण्यात आली. आदिवासीचे महाराष्ट्रातील हे फार मोठे आदोलन झाले.

हे सत्याग्रही सुटल्यानतर त्याना पुन्हा बेदम मारहाण करण्यात आली. १६ ऑगस्ट स्वातत्र्यदिनाच्या मुहुर्तावर मोरानाच्या जगलामध्ये राधोदादा, चैत्राम याचे हातपाय जायबदी करण्यात आले.

दडपशाहीच्या या ज्वाला धुळे जिल्ह्याला ग्रासून टाकीत आहेत. येथील राज्यकर्तेच अराजक निर्माण करीत आहेत.

### प्रचंड चळवळ हवी

या दडपशाहीचा, सरकारी अत्याचाराचा मुकाबला करण्यासाठी महाराष्ट्रातील साऱ्या भूमीहीनांची प्रचंड चळवळ, लढा उभारावा लागेल व त्या दृष्टीने आम्ही पावले टाकीत आहोत. विदर्भात व धुळे येथे मध्यवर्ती परिषदा लवकरच भरविण्यात येणार आहेत.

या प्रश्नाला दोन बाजू आहेत, १ : भूतदयेची आणि २ : वैज्ञानिक. समाजातील या दुर्बल घटकाला सामाजिक, आर्थिक न्याय मिळालाच पाहिजे.

हा केवळ जगलच्या जमिनीचाच प्रश्न नाही तर सबध देशाला भेडसावणारी समस्या आहे. १९७० साली या लोकांनी जमिनी घेतल्या. त्याची व्यसने कमी झाली. नागलीची भाकरी खाणारे आदिवासी स्वतःच्या शेतातील भात खाऊ लागले. सरकार या देशातील सर्वात मोठे जमीनदार. या जमीनदाराविरुद्ध ही कुळं लढत आहेत. या लढ्यात आदिवासीचा विजय झाला तर भाडवलशाही विरुद्धच्या लढ्यातील एक मोठे पाऊल पुढे पडेल असे प्रतिपादन करून श्री. शरद पाटील यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.

प्रा. रा. म. बापट यांनी अध्यक्षीय भाषणात जनतेचे लढे पोलिसी अत्याचाराने चिरडून टाकण्याच्या शासनाच्या धोरणाचा तीव्र निषेध केला.

प्रा. बापट म्हणाले : मक्तेदार, भाडवलदार, बडे बागायतदार, परकीय भांडवलदाराचे हस्तक, नोकरशहा हातात हात घालून काम करीत आहेत. ते आणि याच्या तालावर इदिरा शासन नाचत आहे. पर्यायाने लोकशाही हक्कावर आक्रमण होत आहे. त्याचा सर्व पुरोगामी शक्तीनी निषेध केला पाहिजे.

शोषिताच्या या लढ्यात आता फार मोठा सघर्ष अपरिहार्य आहे. असरक्षित आदिवासीवरील शासकीय अत्याचाराचा केवळ निषेध करून चालणार नाही तर आदिवासीना सघटीत करून, जनता लढे उभारून शासकीय अत्याचाराचा प्रतिकार करावा लागेल. राज्यकर्त्यांच्या पाशवी शक्तीवर हाच जालीम उतारा आहे. यासाठी दीर्घकाळ जनता संघटित करण्याचे काम करावे लागेल. शहरी मध्यम वर्गीयानी या आदोलनाकडे अलिप्तपणाने पाहाता कामा नये. लोकमत जागृत करण्याचे काम त्यांना करता येईल. आर्थिक मदत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कामही त्याना करता येईल.

इदिरा सरकार, नाईक सरकार, आदिवासीना अटकेत टाकून गोळीबार करून हे लढे मोडीत आहे, दडपीत आहे. दडपशाहीचे हे प्रमाण वाढतच जाणार आहे. शहादा, माणिकगड, धुळे येथे हेच घडले आणि भविष्यात हेच घडणार आहे.

इदिरा गांधीच्या ३ जुलैच्या पुणे भेटीच्या प्रसगी युक्राद, ससोपा, समाजवादी युवसभा आदि पक्ष व सघटनाच्या नेत्याना डांबून ठेवण्यात आले. काँग्रेसच्या पुणेरी पुढाऱ्यांच्या दबावाने या नेत्याना अटक करण्यात आली होती. यावरून येथील पोलिस खाते देखील सत्ताधारी पक्षाच्या हातातील बाहुले आहे या बद्दल मनात शका राहात नाही

या सर्व अत्याचाराचा, दडपशाहीचा प्रत्येक सुबुद्ध नागरिकाने धिक्कार केलाच पाहिजे.

" भारतातील दलित, शोषित, कष्टकरी जनतेची भक्कम एकजूट उभारून आदोलन, लढे पुकारूनच सत्ताधाऱ्याना वठणीवर आणता येईल. दीर्घकाळ चालणाऱ्या या लढ्यात सर्व पुरोगामी शक्तीनी एकजुटीने लढले पाहिजे." असे कळकळीचे आवाहन प्रा. राम बापट यानी केले.

सुधीर सोनाळकर यानी आभार मानल्यानतर सभा सपली. शासनाच्या दडपशाहीचा निषेध करणारा ठराव समत झाला.

–दत्ता काळेबेरे

---


# श्रीग्रामायन

प्रसिद्ध झाले | लेखक | राजहंस प्रकाशन
मूल्य पंधरा रुपये | श्री. ग. माजगावकर | पुणे ३०


---

# सेन्सॉरबोर्डाच्या अस्तित्वाला आव्हान द्या

## वि. भा. देशपांडे

चोवीस ऑगस्टच्या अंकात सौ. पुष्पा भावे यांनी 'वासनाकांड'च्या निमित्ताने सेन्सॉर बोर्डाविषयी काही विचार मांडले आहेत. त्यांना अनुलक्षून काही विचार मांडीत आहे. 'वासनाकांड'–संहिता आणि प्रयोग याबद्दल लिहिण्याचे आता प्रयोजन नाही. त्या नाटकाची कलात्मक योग्यायोग्यता हा वेगळा विषय आहे. तूर्त तो विषय मला अभिप्रेत नाही.

'सखाराम बाईंडर'चा खटला सरकार विरुद्ध गेला. त्या खटल्याच्या निमित्ताने न्या. कनिया यांनी सेन्सॉर बोर्डाच्या रचनेसंबंधी, दृष्टिकोनासंबंधी परखड कोरडे ओढले होते. त्या कोरड्याची धार लक्षात घेऊन सरकार काही वेगळा विचार करील असे वाटले होते, पण तसे झालेले दिसत नाही. कारण बोर्डाचे काम सुरू होऊन काही महिने होतात न होतात तोच मागचा प्रकार पुन्हा सुरू झालेला दिसतोय. बोर्डाच्या रचनेत आणि दृष्टिकोनात नेमके कोणते बदल झाले आहेत याबद्दल सरकारने प्रकट स्वरूपात कोठेच काही सांगितलेले नाही. निदान सर्वसामान्यांना माहीत होईल असे काही केलेले नाही. कदाचित सरकारला तशी आवश्यकता वाटली नसावी.

मूळ नियमामध्ये कोणते बदल केले आहेत याच्याशी कर्तव्य नाही. महत्त्वाचा मुद्दा आविष्कार-स्वातंत्र्याचा आहे. एखाद्या नाटकाच्या निमित्ताने एखादी व्यक्ती किंवा संस्था कोर्टात जाणे आणि त्यांनी खटला जिंकणे हेही आता नवीन नाही. कारण सेन्सॉरने ठरवलेले अश्लील नाटक कोर्टात श्लील ठरू शकते. अशी एकाकी झुंज देऊन तात्कालिक समाधान मानण्यापेक्षा मूळ सेन्सॉर बोर्डाचे अस्तित्वच धोक्यात आणणे महत्त्वाचे आहे. बोर्ड कसे असावे, त्यावरची माणसे कोण असावीत ही चर्चा आता व्यर्थ आहे. त्याने काहीही साधणार नाही.

डॉ. श्रीराम लागूनी काही महिन्यापूर्वी महाराष्ट्र टाइम्समध्ये 'सेन्सॉर हटाव' या शीर्षकाचे दोन लेख लिहिले होते. त्यावर उलट-सुलट चर्चा होऊन चांगल्या अर्थाने वादळ होईल असे वाटले होते. अशा वादळातून नवी दिशा सापडण्याचीही शक्यता असते. पण तसे काही घडले नाही. गिधाडे, सखाराम, वासनाकांड यांच्या निमित्ताने चर्चा झाली – होत आहे. यातून काही प्रश्न निर्माण होतात, की मराठी नाट्यक्षेत्रात वावरणाऱ्या लोकांना या प्रश्नाची असावी तेवढी तड नाही का ? सेन्सॉरचा प्रश्न हा एखाद्या नाटकाचा नसून तत्त्वाचा आहे, आविष्कार स्वातंत्र्याचा आहे, काही मूलभूत कलात्मक विचारांचा आहे असे तळमळीने खरोखरच वाटत नाही का ? मूठभर लोकाव्यतिरिक्त कोणालाच त्याची तड नसेल तर मग प्रश्नच नाही. कारण एखादे पत्रक आणि सभा भरवून हा प्रश्न निभणारा नाही, सुटणारा नाही. अशा एखाद-दुसऱ्या पत्रकाने तथाकथित लोकशाहीवादी आणि कल्याणकारी(?) राज्याला उमज पडेल असे दिसत नाही. ज्या पद्धतीने इतर सामाजिक आंदोलने रस्त्यावर येऊ पहात आहेत त्याच पद्धतीने हे आविष्कार-स्वातंत्र्याचे आंदोलन किंवा चळवळ झाली पाहिजे.

ही चळवळ उभारताना केवळ एकांगी विचाराने, भावविवश होऊन भागणार नाही. विरोधासाठी विरोध करून चालणार नाही. तर आविष्कार–स्वातंत्र्याची मागणी करताना तिचे वास्तव–व्यवहारी स्वरूप जाणून घ्यावे लागेल. आपल्या देशात स्वतंत्र हा शब्द आपण अनेक क्षेत्रात पण ढोबळ रीतीने वापरतो. राजकीय स्वातंत्र्यापासून ते आत्म्याच्या स्वातंत्र्यापर्यंतच्या गोष्टी आपण बोलतो. घटनेने–कायद्याने अनेक गोष्टीचे स्वातंत्र्य आपल्याला बहाल केले असूनही प्रत्यक्ष अनुभव वेगळाच येतो. मुद्रण स्वातंत्र्य खरोखरीच आपल्याकडे आहे का ? याही गोष्टीचा विचार करावा लागेल. म्हणजेच या प्रश्नाची उत्तरे आपल्याशी तयार ठेवावी लागतील.

नाटककाराला आपले नाटक पुस्तकरूपाने प्रसिद्ध करता येते, सेन्सॉर बोर्डाच्या परवानी विना खासगी स्वरुपात (म्हणजे तिकीट विक्री न करता) प्रयोगही करता येतो. उत्सुकता असणारा प्रेक्षक अशा प्रयोगांना जातोही. मग फक्त जाहीर प्रयोगांसाठी पूर्व परवानगी कशाला ? प्रेक्षकाच्या स्वातंत्र्यावर हा घाला कशासाठी ? हा प्रेक्षक प्रौढ, सुजाण वगैरे नाही असे सांगितले जाते. पण ते खरे नाही. कारण कोणते नाटक कसे आहे हे प्रेक्षक नेमके हेरतो–जाणतो. त्यावरच नाटकाचे भवितव्य टिकून राहाते. काही नाटके आपल्या मरणाने मरत असतात, गुणानी तगत असतात. आम्हा प्रेक्षकाची (नैतिक) काळजी घेण्याचे या कल्याणकारी राज्याने आता सोडून द्यावे !

सरकार जर ही काळजी घेणे सोडणार नसेल तर त्याबद्दल सरकारला खडसावून सांगावे लागेल. त्यासाठी नट, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, टीकाकार, ठेकेदार, संस्थाचालक आणि प्रेक्षक या साऱ्यांनीच एकत्र येऊन आविष्कार स्वातंत्र्याची मागणी करून सेन्सॉर बोर्डाच्या अस्तित्वाचा प्रश्न धसास लावला पाहिजे. या चळवळीची उग्रता जितकी वाढेल तितका सरकारलाही विचार करावा लागेल. कोणत्याही प्रकारची निष्क्रीयता किंवा मौन हे सोयीने घतले जाते. प्रेक्षकांनी आणि कलाकारांनी सेन्सॉरबद्दल काहीच ओरड केली नाही तर जे चालले आहे ते उत्तम आहे असे सरकार मानील–आज तीच समजूत आहे असे दिसते. म्हणूनच म्हणावेसे वाटते की, पुन्हा एकदा कोणत्यातरी नाटकावर बंदी येण्याची वाट पाहू नका. तसे काही होण्याआधीच संघटित स्वरुपाच्या चळवळीला प्रारंभ होऊ द्या. व्यक्तिनिरपेक्ष, नाटकनिरपेक्ष या विषयाकडे पाहून विचार होऊ द्या ! □



नव्हाळ गोरी नवरी
गर्भ रेशमी मोरपिशी बुट्टीचा शालु
काळाभोर अंबाडा,
त्यावर पिवळीफेक शेवंती नि
नारंगी अबोलीची वेणी,
कपाळावर लालकोर
पिवळ्या हळदीच्या हातात
गर्द हिरवा चुडा,
नि लाल चुटुक मेंदी.
रंगच रंग




नेरोलॅक

रंग–आपल्या जीवनातील एक अविभाज्य अंग

U-GNM-1

## मुंबई (भ्रष्टाचार) विद्यापीठ : पृष्ठ ८ वरून

ठरावाच्या संदर्भात राज्यपालांना पुन्हा पत्र लिहिले. डॉ. वागळ्यांचे पहिले पत्र, विद्यापीठाच्या सदस्य समितीचा ठराव व वागळ्यांचे त्या ठरावासंबंधातले राज्यपालांना लिहिलेले पत्र – हा साराच पत्र-व्यवहार अत्यंत बोलका आहे. म्हणूनच तो इथे इतरत्र जसाच्या तसा उद्धृत केला आहे. विद्यापीठाच्या एकूण कार्यपद्धतीवर त्यामुळे चांगलाच प्रकाश पडेल....

डॉ. वागळ्यांविरुद्ध असा ठराव मंजूर झाला असला तरी, तो इतर प्राध्यापकांना, प्राध्यापक संघटनेला, विद्यार्थ्यांना, कर्मचाऱ्यांना मान्य नाही. त्यांची भक्कम फळी उभी राहात आहे. विद्यापीठातल्या आतापर्यंत पुढे आलेल्या व आता पुढे येऊ घातलेल्या गमतीमुळे जनमतही ह्या झोंडशाहीविरुद्ध तयार होत आहे. शासन अजूनही झोपेचे सोंग घेऊन त्रयस्थाच्या भूमिकेतून हे सारे बघत राहाणार असेल, तर ह्या अफाट सागर खवळल्यावाचून रहाणार नाही! खवळलेल्या सागरापासूनच्या धोक्याची सूचना तूर्तास पुरेशी ठरेल असे वाटते! शासनाच्या माहितीसाठी असे आणखीही स्फोट करावे लागतीलच व ते करीनही! खवळलेल्या सागराने सारे काही स्वाहा करण्यापूर्वी ह्या स्फोटांच्या धडाक्यांनी शासनाला जाग येवो एवढीच सदिच्छा!! ◻

डॉ. वागळे ह्यांनी कुलगुरूंना (राज्यपालांना) पाठवलेले पत्र : मूळ सादर रिपोर्ट दिल्यानंतर तब्बल तीन महिन्याहून अधिक काळ वाट पाहून डॉ. वागळे ह्यांनी हे पत्र लिहिले.

संदर्भ : BUW/7411 दि. १६ जुलै, १९७४

मा. कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ,
राजभवन, मुंबई

महोदय,

मुंबई विद्यापीठाच्या विविध बांधकामावर खूप मोठ्या प्रमाणावर जास्त व अनावश्यक खर्च, उधळपट्टी व एकूण व्यवहारात गैरप्रकार झाल्यासंबंधी प्राथमिक रिपोर्ट आपल्याकडे पाठवून, ह्या प्रकाराची चौकशी व्हावी अशी मी मागणी केल्याला तीन महिन्याहून अधिक काळ उलटून गेला आहे. २ एप्रिलच्या (संदर्भ BUW/7401) व २७ मे, ७४ च्या (संदर्भ BUW/7411) माझ्या पत्रांमध्ये आपल्याला ह्या तपशील आढळू शकेल. माझ्या अंदाजानुसार विद्यापीठाला किमान ५० लाखाचा तोटा ह्या व्यवहारामध्ये झाला आहे. कामाचा दर्जा, वापरलेले सामान वगैरेंची जर बारकाईने तपासणी झाली, तर नुकसानीचा हा अंदाज सहजी ७५ लाखांच्या वर जावा.

ह्या अहवालानंतर वेगवेगळ्या वृत्तपत्रातून मुंबई विद्यापीठातल्या गोंधळावर अनेक लेख आले. त्यातून एक जनमत तयार होऊ पहात आहे. विद्यापीठाच्या कारभाराची संपूर्ण चौकशी व्हावी ही मागणीही मूळ धरीत आहे. शैक्षणिक क्षेत्रातल्या ह्या प्रकाराबाबत, भ्रष्टाचाराबाबत, विद्यार्थी, कर्मचारी आणि प्राध्यापक, तिघातही नाराजी वाढत आहे. विद्यापीठातल्या इतर गैर व्यवहारावरही वाढत्य प्रमाणात लिखाण सर्वत्र प्रसिद्ध होत आहे. प्रभंजन, मनोहर ह्या मराठी साप्ताहिकांनी श्री. चिदम्बरम् आणि प्रेस प्रमुख श्री. मोघे ह्यांच्याविरुद्ध व्यक्तिशः गंभीर आरोप केलेले आहेत. आकडेवारी देऊन ह्या दोघांचा खर्च त्यांच्या घोषित उत्पन्नापेक्षा कितीतरी अधिक असल्याचे दाखवून दिले आहे.

त्याचप्रमाणे रजिस्ट्रारनी प्रॉ. फंडातली ९०% रक्कम ज्या घाईगर्दीने काढून घेतली त्या बद्दलही बऱ्याच बातम्या प्रसृत झालेल्या आहेत. परीक्षा विभागात अनेक गोंधळ असल्याच्या, भ्रष्टाचार भयानक प्रकारात वाढला असल्याच्या अनेक तक्रारी रोज वाढत आहेत. त्या विभागात १५ ते ३२ वर्षे सातत्याने काम करणाऱ्या मंडळींच्या बदल्या केल्या जाव्यात ही साधी मागणीही कुलगुरू टोपे ह्यांनी फेटाळून लावली आहे. त्यामुळेही असंतोष वाढत आहे. १५ जून (BUW/7409) आणि २७ मे (BUW/7405)च्या माझ्या पत्रातून मी हे गैरप्रकार मांडले होते. पण अद्याप त्यावर काहीही कृती करण्यात आलेली नाही.

चौकशीची मागणी करून आज तीन महिने होऊन गेले आहेत. मी सादर केलेल्या प्राथमिक अहवालाची प्रामाणिक शहानिशा करण्यासाठी हा कालावधी निश्चितच पुरेसा आहे. परंतु नेमलेल्या तथाकथित चौकशी समितीची संथ वाटचाल पाहाता, आणखी कित्येक महिने लोटतील असे वाटू लागले आहे.

दरम्यानच्या काळात विद्यापीठातल्या आतल्या गोटाने अशा पद्धतीने चक्रे फिरवायला सुरुवात केली आहे की, ज्यामुळे विद्यार्थी, कर्मचारी व प्राध्यापक ह्यांच्यात अंतर्गत दुफळी माजावी. भ्रष्टाचाऱ्याचा बुरखा फाडायला कटिबद्ध झालेल्यामधले परस्पर सहकार्य कोलमडून पडेल अशा पद्धतीने ह्या गटाच्या कारवाया चालू आहेत. प्रलोभने, बढत्या, धाकदपटशा वगैरे मार्ग चोखाळले जात आहेत. वेळकाढू धोरण स्वीकारून माझ्या अहवालातली हवा कशी काढून टाकता येईल ह्या दृष्टीने पावले टाकली जात आहेत. दिरंगाईतून होणारे नुकसान दृष्टिआड केले जात आहे. कुलगुरू त्यांच्या अधिकारांचा गैरवापर करीत आहेत.

ह्या एकापाठोपाठ घडत जाणाऱ्या घटनांमुळे विद्यापीठावरील जनतेच्या विश्वासाला तडे जात आहेत. विद्यापीठाची परंपरा व एकूण शैक्षणिक क्षेत्राचा विचार करता, ह्या पुढील दिरंगाई अत्यंत धोकादायक ठरण्याची शक्यता आहे.

हे सारे लक्षात घेता, माझ्या पत्र क्रमांक BUW/7401 दि. २–४–७४ मध्ये मागणी केलेल्या खास चौकशी समितीच्या नेमणुकीसाठी आणखी किती महिने वाट पाहावी लागेल ते मला कळेल काय?

आपला विश्वासू
**डॉ. एस्. एस्. वागळे**
सदस्य, एक्झिक्युटिव्ह कौन्सिल व सिनेट,
मुंबई विद्यापीठ

### विद्यापीठ एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचा ठराव

दि. ७ ऑगस्ट १९७४

'मुंबई विद्यापीठाच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या ७ ऑगस्ट,

१९७४ रोजी झालेल्या सभेत डॉ. एस्. एस्. वागळे ह्यांनी कुलगुरूना धाडलेल्या अहवालावर विचार करण्यात आला. त्याचप्रमाणे ह्या अहवालावर, बिल्डिंग कमिटीने जो सविस्तर प्रतिअहवाल तयार केला होता त्यावरही विचार विमर्ष करण्यात आला.

३१-८-१९६९ ला सिनेटवर निवडून आल्यावर आणि पुढे १-३-७० ला सिनेटमधून कौन्सिलवर निवडून आल्यावर, डॉ. वागळे ह्यांचा विद्यापीठाशी जवळून संबध आला. साहाजिकच ह्या काळातल्या घडामोडीवर डॉ. वागळे ह्यानी विशेष भर दिला आहे आणि ते एका परी आश्चर्यजनक आहे. विद्यापीठ नियमानुसार, बाधकामाविषयक सर्व महत्त्वाचे निर्णय सिनेट व कौन्सिल ह्यांच्या मान्यतेशिवाय घेता येत नाहीत. डॉ. वागळे सामान्यतः कुठल्याही मुद्द्यावर मतभिन्नता दर्शविण्यात व निषेध नोदविण्यात, सिनेट व कौन्सिलच्या बैठकामध्ये आघाडीवर असतात. परंतु ६९-७० पासून बाधकाम विषयक आलेल्या सर्व योजनावरील चर्चेच्या वेळी अशा बैठकातून डॉ. वागळे आश्चर्यकारकरित्या मौन पाळून असत. विशेष म्हणजे एरवी सदैव जागृत असणारे डॉ. वागळे ही ह्यावेळी एकमात्र व्यक्ती अशी होती की जी सातत्याने मौन पाळून होती कुठेही, केव्हाही विरोधाचा, आक्षेपाचा आवाज ह्या सपूर्ण काळात त्यांनी काढला नाही ! १५ फेब्रुवारी १९७४ च्या कौन्सिलच्या बैठकीत प्रथमच त्यानी ह्या विषयावर, ७१-७२ च्या ऑडिट रिपोर्टातल्या काही बाबीवर खुलाशाची मागणी केली. किंमतराय बिल्डिंगची जी दुरुस्ती झाली त्या संबंधीचे कागदपत्र पाहायला मिळावे अशीही मागणी डॉ. वागळे ह्यांनी केली. ही परवानगी तर देण्यात आलीच, पण त्याचबरोबर, सर्व सबधित कागदपत्रही उपलब्ध करून देण्यात आले. परंतु आपली चौकशी किंमतराय इमारतीपुरती मर्यादित न ठेवता, डॉ. वागळे ह्यानी एकूणच सर्व बाधकामाची छाननी सुरू केली. विद्यापीठ कर्मचारी सघाच्या सदस्यांना बरोबर घेऊन त्यानी विद्यापीठाच्या निरनिराळ्या इमारतीनाही भेटी दिल्या. डॉ. वागळे ह्यांच्या ह्या सर्व प्रयत्नाना देखील विद्यापीठाने आडकाठी केली नाही; उलट सहकार्यच केले.

अशा तऱ्हेने डॉ. वागळे ह्यांनी तयार केलेला अहवाल इमारत समितीपुढे ठेवण्यात आला. सध्याच्या इमारत समितीच्या अस्तित्त्वापूर्वीचे काही प्रश्न डॉ. वागळे ह्यानी उपस्थित केले होते. तेही ह्या समितीला विचारात घेण्यास सांगण्यात आले.

इमारत समिती आणि विद्यापीठ इंजिनियर ह्यानी डॉ. वागळ्याच्या अहवालाची सपूर्ण छाननी केली. त्यातल्या विसंगती शोधून काढल्या. डॉ. वागळ्यांच्या चुकीच्या समजूती खोडून काढल्या, हे सारे काम फारच प्रचड होते, आणि ज्या तत्परतेने हे काम पार पाडले गेले त्याची साभिमान नोद एक्झिक्युटिव्ह कमिटी ह्या ठरावान्वये घेत आहे. इमारत समितीने डॉ. वागळ्याचे मुद्दे खोटे ठरवू शकेल अशी वस्तुस्थिती विशद केली आहे. त्याचप्रमाणे जी अतर्गत चौकशी आम्ही केली त्यावरूनही असे वाटते की डॉ. वागळे ह्याचा अहवाल केवळ पूर्वग्रहदूषितच होता असे नव्हे, तर त्या अहवालाची मांडणी त्यानी हेतुपुरःसर विद्यापीठाच्या प्रतिष्ठेला बाध येईल अशा पद्धतीने केली आहे.

मे. हरीभाई देसाई ह्यांच्याबद्दल त्यानी आपल्या अहवालात 'विद्यापीठाची कृपादृष्टी असलेले कत्राटदार' असा वारवार उल्लेख केला आहे. ही बाब खेदाची आहे. देसाई विरुद्धचा डॉ. वागळ्याचा आकस एवढा जबरदस्त आहे की, देसाईंनी न केलेले कामही त्यानी देसाईंच्या नावावर दाखवले आहे. चुकांचे खापर देसाईंवर फोडले आहे. मे. देसाई १९५० पासून विद्यापीठाची कामे करीत आहेत. प्रशासकीय इमारतीचा पूर्व भाग आणि इतर काही कामे त्याच्या कुशलतेची द्योतक आहेत.

स्वतःचे मुद्दे पटविण्यासाठी डॉ. वागळ्यानी वेळोवेळी 'निष्णात तज्ञां'च्या मताचा उल्लेख केला आहे. परंतु असे निष्णात तज्ञ त्यानी नेहमीच अंधारात ठेवले आहेत. हे चमत्कारिक भासते यात वाद नाही.

डॉ. वागळे ह्यांनी आपल्या अहवालाच्या प्रती युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशनला, वृत्तपत्रानाही दिल्या. त्याचे विकृत वृत्तातही प्रसिद्ध केले गेले. यु. ग्रँ. कमिशनला पाठविलेल्या पत्रात त्यानी असेही म्हटले की, 'कुलगुरूना चौकशी समिती नेमण्याबाबत केलेल्या विनंतीनुसार कुठलीही कृती करण्यात आलेली नाही.' विद्यापीठातल्या सर्वोच्च व्यक्तीचा हा फार मोठा अपमान आहे असे कौन्सिलला वाटते. त्याचवेळी कुलगुरूना पाठविलेल्या पत्रात डॉ. वागळे म्हणतात, '...दरम्यानच्या काळात, संबधित कागदपत्रामध्ये बदल करणे, जमल्यास काही गहाळ करणे, इतर काही कृती घाईघाईने करणे वा तत्सम इतर प्रयत्न सबधित व्यक्ती करतील अशी मला साधार भीती वाटते...' अशा तऱ्हेचा आशय व्यक्त करणारी निवेदने प्रसृत झाली आहेत. देशीभाषिक व इंग्लिश वृत्तपत्रातून त्यांना प्रसिद्धीही देण्यात आलेली आहे. ह्या साऱ्यातून एकच गोष्ट प्रकर्षाने जाणवते. डॉ. वागळे विद्यापीठाचे नाव बद्दू व्हावे ह्याच दिशेने जाणूनबुजून प्रयत्नशील आहेत.

आपल्या अहवालात डॉ. वागळ्यांनी वेगवेगळी आकडेवारी वेगवेगळ्या सदर्भ–नोट्स्मधून उद्धृत केली आहे. आकडे खोटे कधीच नसतात. परंतु वेगवेगळ्या पद्धतीने फिरवून व इकडचे तिकडे जोडून आकडे माडले, की तयार होणारी आकडेवारी फार फसवी असते. डॉ. वागळ्यानी हाच प्रकार केला आहे आणि धडधडित खोटीनाटी विधाने अशा फॅब्रिकेटेड फसव्या आकडेवारीच्या आधारे केली आहेत. अशी आकडेवारी तोडावर फेकून, उच्चपदस्थाविरुद्ध केलेल्या आरोपात लोकाना नेहमीच तथ्य वाटते. म्हणून हा प्रयत्न जास्त भयकर ठरतो. आणि अशा तऱ्हेचा पूर्वग्रहदूषित, घाणेरडा, धोकादायक आणि विद्यापीठाच्या प्रतिष्ठेवर घाला घालणारा प्रचार एक्झिक्युटिव्ह कौन्सिलच्या एका सभासदानेच करावा, ही अत्यत शरमेची बाब आहे.' □ □

**[ या ठरावातील आरोपांचे खंडन डॉ. वागळे यांनी १४ ऑगस्ट १९७४ ला कुलगुरूंना लिहिलेल्या पत्रात विस्ताराने केलेले आहे. जरूर पडल्यास पुढील एखाद्या 'स्फोटात,' मी या पत्राचा अवश्य अंतर्भाव करीन. —लेखक ]**

## साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

७-९-७४ ते १३-९-७४

### सत्तारूढ पक्षाला ग्रासून टाकणारा सप्ताह

पंतप्रधान इंदिरा गांधी संघर्षातच चमकतात व कोणत्याही संकटाला शांत मनाने सामोऱ्या जातात असा आजवरचा अनुभव आहे. यावेळची परिस्थिती त्यांची विलक्षण कसोटी पहाणारी असेल. मात्र मंगळ व रवी या सामर्थ्यशाली ग्रहाचे प्रत्यक्षात व्यक्तिश. त्यांना सहाय्य असल्यामुळे हातून निसटणाऱ्या परिस्थितीवर पकड बसवण्यात त्या यशस्वी होतील. बिहारमधून गफूर-मियाना सुट्टी देण्यात येईल. ललित नारायणाच्या गटाला धक्का बसेल. तेथे तारकेश्वरी रंगमंचावर आल्यावर नवल वाटू नये. बिहारमधल्या आंदोलनाला शह मिळेल मध्यप्रदेशात व उत्तर प्रदेशात कॉंग्रेसच्या फाटाफुटीची चाहूल तर महाराष्ट्रात मंत्र्याच्या भ्रष्टाचाराचा स्फोट. केंद्रिय मंत्रिमंडळात असंतोषाची चाहूल. राज्यपाल व मुख्यमंत्री संघर्षाची नवी डोके दुखी असा सप्ताह आहे.

**मेष : मंगळाची सहानुभूती**

सेनापती मंगळ हा तुमच्या राशीचा स्वामी आहे आणि तो आता कन्या राशीत म्हणजे तुम्हाला सहावा झाला आहे. खरे म्हणजे गेल्याच आठवड्यात झालेल्या या बदलाने तुमच्या थांबलेल्या प्रगतीची गाडी वेगाने धाऊ लागलेली आहेच दि. १० च्या बुध-प्लूटो युतीपासून या प्रगतीला नवे दालन मिळू शकेल. प्रामुख्याने नोकरीविषयक अनेक गुंतागुंतीचे प्रश्न सहज सुटू शकतील. अडचणीवर तोड निघू शकेल. उद्योगधंद्यातील सुप्त योजना प्रत्यक्षात येण्याची शक्यता दिसू लागेल. आर्थिक अडचणी दूर होतील. **महिलांस :** अनेक महत्त्वाची कामे पुरी होतील नोकरीचा प्रश्न सुटेल.

**वृषभ : महत्त्वाकांक्षेला चालना**

खरे म्हणजे वृषभ व्यक्तीला गेल्याच आठवड्यात झालेल्या पंचमस्थ बुध-मंगळ युतीपासून चांगले दिवस येऊ लागले आहेत. आता तुम्ही कोणत्याही क्षेत्रात असा. तुमचे स्थान व दर्जा उंचावला जाईल. तुम्ही जर एखाद्या वरिष्ठ अधिकार पदासाठी 'परीक्षा' दिली असेल तर तुम्ही पास होणार हे नक्की समजा यावेळच्या चंद्रभ्रमणाचा एक विशेष असा घडेल की, बेकारांची बेकारी संपुष्टात येईल. चालू नोकरीत बरेच काही पदरात पडेल. आणि व्यापाराच्या उभारणीसाठी योजलेला प्रवास अत्यंत सफल होईल. **महिलास :** नोकरीत तुमचा अधिकार वाढेल व कामाचे कौतुक होईल.

**मिथुन : जागेचे प्रश्नचिन्हं**

आठवड्याची सुरुवात चंद्राच्या शुभ दृष्टीवर होत आहे. राशीत शनी आहे. तो तुमचे सामाजिक व राजकीय जीवन सतत उंचावतच आहे. त्याची कृपा असेपर्यंत तुम्हाला कशाचीच भीती बाळगण्याचे कारण नाही. दि. १० च्या बुध-प्लूटो युतीपासून नोकरी व्यवसायातील अडचणी कमी होऊ लागणार आहेत. थोडीफार कठीण होऊन बसलेली पैशाची समस्या देखील सुटू लागेल. नोकरीच्या निमित्याने परदेशच्या प्रवासाचाही योग येऊ शकेल. यावेळी तुम्हाला त्रास होईल तो चौथ्या मंगळाचा. शनि-मंगळाचा योग राहत्या जागेच्या अडचणी वाढवील. मन:शांतीला धक्का बसेल. **महिलांस.** शेजाऱ्याच्या भांडणात लक्ष घालू नका नका. नोकरीत मन गुंतवा.

**कर्क : मित्राची मदत**

कन्या राशीत प्रविष्ट झालेला मंगळ हा तुमचा मित्र आहे. त्याचा सल्ला व मदत तुमच्या दैनंदिन व्यवहारात मोलाची ठरणार आहे. या आठवड्यात श्रीमंत व कलावंत मित्रांचा लाभ होईल. तुमच्या एखाद्या नव्या योजनेची सुरुवात होईल व त्यासाठी तुम्हाला या मित्राची मदत मिळेल. तुम्ही जर लेखक असाल तर तुमचे साहित्य वाचकांना आवडेल, व वाचकाकडून तुम्हाला पत्रे येतील. नोकरीत बदली व बढतीचा उत्तम योग आहे. सध्याच्या त्रासदायक नोकरीत देखील बदल होऊ शकेल. पैसा खर्चताना मात्र काळजी घ्या. **महिलांस :** विवाहाचा योग अकस्मात जमून येईल. नोकरीत कौतुक

**सिंह : यशाची कमान**

केतूने ग्रासलेल्या चंद्राने या आठवड्याची सुरुवात होत आहे. पण हा चंद्र दहावा असल्यामुळे प्रतिकूल जाणार नाही. उलट हा दशमस्थ चंद्र पहिले दोन-तीन दिवस तुमचे नोकरी व्यवसायातील अनेक मनोरथ सफल करील. प्रामुख्याने चालू नोकरीत महत्त्वाचा बदल होण्याची शक्यता असून हा बदल तुमच्या एकंदर राहाणीत बरेच स्थित्यंतर घडवून आणील. तुमचा एखादा धंदा असला वा तुम्हास एखादा धंदा सुरू करायचा असला तर त्यात प्रगतीची पावले पडतील. दुसरा मंगळ मोठे यश मिळवून देईल. कुटुंबात स्थावराच्या योजना आखाल. **महिलांस :** उगाच हवेत मनोरे बांधू नका. हाती काही लागणे कठीण.

**कन्या : आत्मविश्वास वाढेल**

कन्या राशीचे तंत्र गेले अनेक दिवस बिघडून राहिले आहे. प्रामुख्याने बाराव्या मंगळाने तुमच्या नाकीनऊ आणले होते. यश नाही. प्रकृती नादुरुस्त व मनाचा विश्वासही डळमळला होता. पण मला आता लिहायला समाधान वाटते की, आता राशीत प्रविष्ट झालेला मंगळ तुमचा आत्मविश्वास वृद्धिंगत तर करीलच, पण तुमच्या हातून आश्चर्यकारक असे अनेक पराक्रम घडवील. मनात ठाण मांडून बसलेली निराशा-भीती पार कुठच्या कुठे भिरकावली जाईल. नव्या

उमेदीने व नव्या कल्पना घेऊनच तुम्ही नोकरी-व्यवसायात पाऊल टाकाल. महिलांस निराशा व अपयश मनात न घोळवता नव्या संधीला सामोरे जा.

**तूळ : जरा जपून**

तुम्ही तूळ राशीची माणसे सध्या आघाडीवर आहात हे खरे. रवी अकरावा व गुरू पाचवा ही ग्रहस्थिती तुमच्या कर्तुम-कर्तुम् शक्तीला स्फूर्ती देणारीच आहे. असे असले तरी मंगळ बारावा झाला आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष करणे उचित ठरणार नाही. कारण मंगळ हीच मुळी मोठी शक्ती आहे व ती तुमच्या विरुद्ध आहे. याचा अर्थ सर्व काही 'जरा जपून' करा. एखाद्या स्त्रीची सहज म्हणून थट्टा कराल व ते प्रकरण भलतेच अंगाशी येईल. कलाक्षेत्रात तुम्हाला जबरदस्त प्रतिस्पर्धी निर्माण होईल. नोकरीत जमवून घेणे इष्ट होय. महिलांस : नोकरीत मतभेद होतील. मनाविरुद्ध घटना घडतील.

**वृश्चिक : चांगला सहवास लाभेल**

या आठवड्याची सातव्या चंद्राने होणारी सुरुवात तुमच्या उग्र स्वभावाला काहीशी चादण्याची प्रसन्नता आणल्याखेरीज राहाणार नाही. एखाद्या 'नाजूक' प्रकरणात तुमच्या पदरी निराशा आल्यामुळे वठलेले तुमचे मन तशाच 'नाजूक' स्पर्शाने प्रफुल्लित होईल. तुमचे अधिकाराचे स्थान पक्के राहील. मालक वा वरिष्ठ तुमच्या वाटेस जाणार नाहीत. पण अधिकाराची धुंदी वाईट असते हे विसरू नका. सिंहस्थ दहावा रवी राजकारणात नेतृत्व देईल तर नोकरीत बढतीचा योग आणील. पण त्याचबरोबर अहंकारदेखील वाढवील. तो टाळा. महिलांस : सार्वजनिक कामात मोठा सन्मान घडेल. सेवेचे चीज होईल.

**धनू : उत्तुंग यश**

राहूसारखा ग्रह मंगळासारख्या तामसी ग्रहाच्या वृश्चिक राशीत बसून तुम्हाला सतत सतावीत आहे. प्रत्येक क्षेत्रात संघर्षा-शिवाय काही घडू नये अशीच परिस्थिती तो निर्माण करीत आहे. पण भाग्यात असलेला रवी व आता दहावा आलेला मंगळ साऱ्या अद्वितीय शक्तीचा फौजफाटा तुमच्या दिमतीला उभा करीत आहेत. रवी-मंगळा-सारख्या ग्रहांची स्फूर्ती मिळते तेव्हा हातून अलौकिक असे काही तरी घडते. नोकरी, व्यवसाय, व्यापार, धंदा, धर्म, तत्त्वज्ञान, वाङ्मय वगैरे अनेक क्षेत्रात तुमचे उत्तुंग यश फडकत राहील. महिलांस : अपेक्षित पैसा सहज हाती येईल. त्रास कमी होईल.

**मकर : सुखाची चाहूल**

आठवा रवी याच आठवड्यापुरता तुम्हाला त्रास देऊन घेईल. पण त्याची एवढी फिकीर मुळीच करू नका. कन्येचा सामर्थ्यशाली व तुमचा मित्र असा मंगळ तुमचे भाग्यचक्र प्रगतीच्या दिशेने नेल्याशिवाय राहाणार नाही. प्रकृतीत नेत्रदीपक अशी सुधारणा दिसू लागेल. धाडस करायला तुम्ही घाबरत होतात ती घबराटी वृत्ती दूर होईल. नवे पाऊल योग्य दिशेनेच पडेल. नोकरीत ज्या मार्गाचा अवलंब तुम्ही करायला भीत होता तो आता बिनदिक्कत करा. वरिष्ठ तुमच्या-वर खूश असतील व हाताखालची माणसेही योग्य आदर करतील. आर्थिक परिस्थितीत लक्षणीय सुधारणा. महिलांस : यश तुमच्या हाती येणार आहे. उद्योगात पाऊल टाका.

**कुंभ : कोंडी फुटेल**

एकमेव गुरू तेवढा सोडला तर तुम्हाला हा आठवडा देखील थोडाफार त्रासाचा, घाईचा, विलक्षण गडबडीचा व कौटुंबिक अडचणींना जाणवणारा आहे. मात्र असे असले तरी परिस्थितीची ही कोंडी यावेळी फुटल्या-शिवाय राहाणार नाही. संघर्षाचा काळ संपला असे मानू नका. पण संघर्षातही तुम्ही जी अपेक्षा उराशी बाळगून आहात ती राज-कीय संधी दृष्टिपथात येत असल्याची चाहूल याच आठवड्यात तुम्हाला लागेल. मनही चिंतनशील बनेल. उपासकानां दैवी चमत्काराचा साक्षात्कार घडेल. प्रवासाचा योग येईल. अनेक स्वप्ने पुरी होऊ लागतील. महिलांस : व्रतवैकल्याचे फळ हाती येईल. समाधान लाभेल.

**मीन : संसारात अडचणी**

बारावा गुरू, सहावा रवी व सातवा मंगळ ही ग्रहस्थिती काही अनुकूल नव्हे. पण तसे घाबरून तरी काय करणार? तुम्ही सात्विक वृत्तीचे आहात, धार्मिक आहात. इष्ट अशी ईश्वरी उपासना करा. प्रतिकूल परिस्थितीस तोंड देण्याचे सामर्थ्य तुम्हाला प्राप्त झाल्याशिवाय राहाणार नाही. यावेळी पती-पत्नीला स्वतःचा केवढाही आत्मविश्वास व कर्तृत्वाचा अहंकार असला तरी एकोपा आत्यंतिक प्रयत्नाने टिकवणे आवश्यक आहे. दोघात गैरसमज निर्माण होण्यासारख्या घटना पदोपदी घडू लागतील. नोकरीत आसन डळमळते की काय अशी परिस्थिती निर्माण होईल. धंद्यात नुकसान होऊ शकेल. योजलेले बेत अर्ध्यावरच सोडावे की काय असे वाटेल. पैशाची तर तंगीच होईल. तरीही शेवटी परिस्थितीवर ताबा ठेवण्यात यश मिळेल. महिलांस : रामनामाचा जप करा. मन शांत राहील.

□ □


महाराष्ट्र राज्य ग्रंथ-पारितोषिक मिळवणारे
आमचे एक विशेष प्रकाशन

डॉ. सुधीर फडके

# कोठे आणि कधीतरी

किंमत : दहा रुपये

राजहंस प्रकाशन

# चकनाचूर

भाऊ पाध्ये

## महंमूद : त्याच्या कॉमेडीशी मुकाबला मुश्किलीनेच !

" सायरा-धर्मेंद्रचे गेल्या काही दिवसात एकामागून एक आलेल्या पिक्चर्समध्ये 'पॉकेट मार' हे १३ वे पिक्चर असेल. एकाच जोडीच्या एकामागून एक येणाऱ्या आणि त्याचबरोबर फ्लॉप होणाऱ्या पिक्चर्सचा हा रेकॉर्ड असेल. सायराने आपला दर कमी केल्यामुळे बचत झालेले पैसे धर्मेंद्रला देण्याची निर्मात्यांची सोय झाली. ॲव्हरेज बरी दिसणारी आणि ॲव्हरेज काम करणारी सायरा मिळाल्यामुळे हेमा मनातल्या मनात चुरमुरू लागली आहे असे सांगतात.

धर्मेंद्र-सायराचे 'पॉकेट मार' मात्र चालेल असा अंदाज आहे आणि ते चालले तर ते या हिरो-हिरॉइनमुळे न चालता, हिरोचा जोडीदार महंमुद याच्या कामामुळे चालेल असे वाटते. महंमुदची अलिकडे पूर्वीसारखी पिक्चर्स येत नाहीत. एक काळ होता की महंमुद हिरोपेक्षाही जास्त पैसे घ्यायचा. एकूण तो प्रोड्युसर्सना परवडेनासा झाला होता. दुसरी गोष्ट म्हणजे धर्मेंद्र-राजेंद्र-मनोज-संजय-विश्वजित यांचा काळ संपून पुन्हा राजेश खन्नाबरोबर हिरोंचा जमाना सुरू झाला होता. पुन्हा पब्लिक हिरोची कामे बघू लागली, त्यासरशी कॉमेडीयन महंमुदला आपली पडद्यावरची जागा खाली करून द्यावी लागली होती. त्याने 'मस्ताना', 'लाखों में एक' अशा पिक्चर्समध्ये हिरोची भूमिका करून आपले हात पोळून घेतले आणि मग, तो सरळ निर्मितीच्या पाठीमागे लागला. 'बाँबे टु गोवा', 'दो फूल' अशी पिक्चर्स स्वतः काढायची, त्यात एक नॉमिनल हिरो घ्यायचा आणि संपूर्ण कॉमेडी करायची. इतर निर्मात्यांच्या लफड्यात पडायचेच नाही. प्रमोद चक्रवर्तीसारखे जे निर्माते आपली पहिल्यापासून इज्जत करतात त्यांना सांभाळायचे, असे ठरवून आपल्या १४ मुलांचा, तीन भावांचा संसार घेऊन त्याने मुंबई सोडली आहे आणि बंगलोरला जाऊन स्थाईक झाला आहे.

महंमुदचे नाव सिनेमासृष्टीत फारसे ऐकू येत नाही आणि असराणी हा नवा विनोदी नट मिळाल्यामुळे हिंदी निर्माते महागड्या महंमुदकडे आता बघायला तयार नाहीत. एकूण महंमुद जुना झाला आहे. महंमुदने 'प्यासा'मध्ये गुरुदत्तच्या नीच भावाची जी भूमिका केली त्यानंतर तो घोड्यावर जॉकी बसावा त्याप्रमाणे हिंदी चित्रपटसृष्टीच्या पाठीवर बसून आपल्या चित्रपटाची शर्यत दौडवत होता; त्याची आता घोडदौड स्वतःच्या पिक्चर्सपुरती राहिली आहे. हिरोचा साथीदार ही भूमिका त्याला फिट्ट बसली होती. ही भूमिका वठवताना जॉय मुखर्जी, मनोजकुमार, राजेंद्रकुमार, धर्मेंद्रसारख्या हिरोंना खिशात टाकून, पिक्चर आपल्याबरोबर घेऊन जात असे. जिद्दी (हिरो-जॉय) गुमनाम (हिरो-मनोज) शतरंज (हिरो-राजेंद्र) आंखे (हिरो-धर्मेंद्र) हे प्रत्येक चित्र लोकांनी महंमुदसाठी पाहिले. शम्मी कपूरसारख्या धमाल हिरोला त्याने 'दिल तेरा दिवाना'मध्ये असे काही तंग केले होते की त्याने आपण पुन्हा महंमुदबरोबर काम करायचेच नाही असे ठरवले. पुन्हा ते दोघे 'प्रीतम'मध्ये आले आणि शम्मी हिरो म्हणून संपलाच. अलीकडेच हिरो म्हणजे जितेंद्रचे हमजोली, संजीवकुमारचे 'पारस', संजयचे 'दुनिया का मेला', ही चित्रेही महंमुदसाठीच लोकांनी पाहिली.

आपल्याकडचे कॉमेडीयन्स तीनच. किशोर, महंमुद आणि जॉनी वॉकर. तिघांच्या विनोदाच्या तीन जाती आहेत. किशोरच्या विनोदाची जात बेबंद आहे. असराणी त्याला न आवरणाऱ्या तब्येतीचा विनोद म्हणतो. तुफान कल्पनाशक्ती हा त्याचा आत्मा आहे. जॉनी वॉकरचा विनोद हलका-फुलका आहे. चटपटीत आहे. डायलॉग्जवर त्याचा भर आहे. जॉनी वॉकर हा पडद्यापेक्षा जर रंगभूमीवर असता तर त्याने 'पॅक्ड' हाउसेस रोज घेतली असती. महंमुदचा विनोद मात्र आपल्या तमाशाच्या जवळ अधिक आहे. द्व्यर्थी शब्दांचा आणि वाक्प्रचारांचा उपयोग, पब्लिकची भाषा

(' भकस ' हा शब्द पडद्यावर प्रथम महमुदने वापरला) आणि लकबी, नेहमी कुणी ना कुणी तोडी लावण्यासाठी पकडण आणि सर्वात म्हणजे अफलातून आयडीयाबाजी करीत बसण आणि जगावेगळे खुलासे करीत बसणं. ' प्रीतम ' या चित्रामध्ये त्याने सफाचट न्हाव्याचे काम केले आहे. त्यावेळी आपल्या धंद्याची महती कशी सांगितली पहा. ' आम्ही ' बाल ' काटतो म्हणजेच सतती नियमन करतो. ' महमुदचा विनोद पूर्णपणे एन्जॉय करण्यासाठी प्रथम आपला तमाशा ' एन्जॉय ' केला असला पाहिजे. त्याच्या विनोदात अश्लीलता आहेच. म्हणूनच अग्रेजी अखबारवाल्यानी त्याला पिटातल्या पब्लिकसाठी केलेला विनोद म्हणून हिणवल आहे. त्याचा ' महमुदन् ' विनोद म्हणून उपहास केला आहे. हिंदी सिनेमावाले ज्यावेळी पब्लिकच्या जवळ जातात त्यावेळी अग्रेजी अखबारवाल्याच्या असेच पोटात दुखते. स्वर्गवासी गुरुदत्त पब्लिकच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करीत असे आणि अग्रजी अखबारवाल्यांनी त्याला कधीच चांगले म्हटले नाही. पण, तो मेल्यावर मात्र त्याचे तोड भरभरून कौतुक करू लागले. तसेच अग्रेजी अखबारवाले महमुदबद्दल करतील यात शका नाही.

परंतु, महमुदच्या भूमिकाना अग्रेजी अखबारवाल्यानाही ' महमुदन् ' जोक्स म्हणून उडवून लावता आलेले नाही. महमुदने काही ' अडर प्ले ' केलेल्या भूमिका त्यानाही मजूर झाल्यासारख्या दिसतात. त्या भूमिकानी महमुदची असलीयत सिद्ध केली आहे. ' मझील 'मधला सगीतवेडा पानवाला, कोण विसरू शकेल ? ' प्यार किए जा 'मध्ये प्रत्येक वस्तूकडे दोन बोटाच्या फ्रेममधून पहाण्याची सिनेमावाल्यांची स्टाईल आणि सस्पेन्स पिक्चरची स्टोरी बापाला सागण्याची त्याची लकब अशी काय जबरदस्त होती की बोलायची सोय नाही. ' पॉकेटमार 'मध्येही त्याने असच ' अंडर प्ले ' केलं आहे. त्याने पॉकेटमारच्या अधु दृष्टीच्या साथीदाराची भूमिका केली आहे. मजा अशी की, तो नेहमी चष्मा असून तो न वापरता वावरतो आणि त्यामुळे प्रत्येक प्रसंग त्याच्या अगाशी येतो. ' पॉकेटमार 'मुळे पुन्हा महमुदविषयी अग्रेजी अखबारवाल्यानी बरे म्हटले आहे.

सिनेमावाल्याच्या नकला करणे हा एक त्याच्या हातचा मळ आहे. ' हमजोली 'मध्ये त्याने पेश केलेली कपूर फॅमिलीची नक्कल अविस्मरणीयच होती. पण, सिनेमाधद्यातील नाना गोष्टीची त्याने ' मै सुंदर हूं 'मध्ये टिंगल केली आहे. प्रत्येक सिनेमावाला ' मै सुहर हू ' बघेल तर फिल्म इंडस्ट्रीमध्ये जराशी सुधारणा होईल.

किशोरकुमारच्या नतर महमुद हा व्हर्सटाईल माणूस. प्रत्येक विनोदी नट हा थोडा फार नर्तक असतोच. ' कागझ के फूल 'च्या सामुदायिक गीतात महमुद चार स्टेप्स घेतो नि आपल्या लक्षात येते की, हा खरोखर नृत्यकार महमदअलीचा बच्चा निघाला. ' जिद्दी 'मध्ये ' मै तेरे प्यारसे ' हे गाणे शुभा खोटेबरोबर पेश करताना ' उसने जो अग हिलाया है, उसपर जितेंद्रभी मरेंगे ' आणि ' दो फूल 'मध्ये ' मुत्तु कोडी कवाडी हडा ' गाताना तो आशासमोर उभा (म्युझिकली) राहलाय. ' कुवारा बाप ' मध्ये, त्याने हिजड्याचे गाणे पेश केले आहे. ज्याने ते ऐकले असेल त्यांच्या लक्षात येईल की, हा महमुदचा स्टट नाही, सगीतातला प्रयोग आहे. आर. डी. ला ब्रेक देणारा माणूस फालतु स्टट करणार नाही.

एक गोष्ट; विनोदी भूमिकेत महमुदशी एकाच माणसाने मुकाबला केला आणि आपण अधिक चागले कॉमेडीयन आहोत हे सिद्ध केले. त्या माणसाचे नाव ऐकून तुम्ही चमकाल; राहूल देव बर्मन : फिल्म : भूतबगला.

## अराऊंड पुराण इन थ्री अवर्स

गोपीकृष्ण आणि पद्मा खन्ना यांनी मदन-रति नृत्यातून केलेल्या निरनिराळ्या आसनामुळे, ' हर हर महादेव ' कुणाला पहावासा वाटला तर नवल नाही. (' हर हर महादेव ' ' हर हर कामदेव ' म्हणून एका इग्रजी नियतकालिकाने साऱ्या आसनांचे फोटो छापून चांगलीच प्रसिद्धी केली होती ! ) माझ्यासारखेच दुसरेही लोक या पिक्चरवर तुटून पडतील अशी माझी अपेक्षा होती. पण, ही सगळी आसन सेन्सॉरने उडवल्याची त्यांना आधीच कुणकुण लागली असावी म्हणून कुणीच आले नाही.

अखेर कामदेव नाहीतर महादेव पाहाला सोडला नाही. तीन तोडाचा मास्क साभाळताना चवथी जान असलेली मान आखडलेला ब्रह्मदेव, गणेशगल्ली सार्वजनिक गणेशोत्सवात जसा सीन माडतात तसा कैलासाचा सीन, बिचाऱ्या कालिदासाने ' कुमार संभवा 'चे सारे सर्ग लिहिण्यासाठी काय मेहेनत घेतली असेल ती असो, परतु पधरा मिनिटाच्या सिक्केन्समध्ये दारासिंग, जयश्री गडकर याच्या राजेश खन्ना, शर्मिला टागोर स्टाईलच्या प्रेमातून निघालेली कार्तिक स्वामीची भेट, पुन्हा पाच तोडाचा मास्क साभाळण्यासाठी सहाव्या मानेवर ताण आहेच. (शकराच्या लग्नाची एक गमत राहाली–जयश्री गडकरची ततपश्चर्या आणि फुले उधळणे आणि भुतांची बावळट मे-कप) त्यानतर गणपतीचा जन्म. गणपतीची सोंड म्हणजे इलेक्ट्रिक इन्शुलेशनसाठी फ्लेक्झिबल पाईप वापरतात तो वापरलाय. गणपतीचा जन्म आणि गणेश पुराण ही मध्यतरापर्यंत सपले. अशा रितीने मजल दरमजल करीत तीन तासात आपण युगायुगाचे पुराण तीन तासात पार पाडतो.

एकच वाटले पुराणात विषय केव्हढे अमाप. केव्हढे नाट्यपूर्ण, त्यातल्या व्यक्ती केव्हढ्या महान. दुर्गाबाई भागवत, डॉ. राममनोहर लोहिया स्वर्गवासी इरावती कर्वे अशा प्रतिभावत मडळीनी या साहित्यातून केव्हढा अर्थ शोधून काढण्याचा प्रयत्न केलाय आणि आज त्यावर चित्रपट काढण्याचे काम मात्र सोपवले आहे दारासिगवर. राजकपूरला सागा–काढ यावर चित्रपट. तो कानावर हात ठेवील. ' न्यू वेव्ह ' वाल्याना सागा. ते म्हणतील, ' हे विषय कर्मशिअल आहेत ! ' आणि ' आपल्या अदाकारीला चॅलेंज देणारी भूमिका पाहिजे, ' म्हणून मुलाखत देणाऱ्या अमिताभला नाहीतर आशा सचदेवला सांगा ' ते म्हणतील जी कामे दारासिंग किंवा जयश्री गडकर करतात ती आम्ही करू !

कुणास ठाऊक त्याना हवा असलेला चॅलेंज त्यांना कुठे सापडणार आहे तो ! कल्याणजी-आनदजी आघाडीचे संगीतकार असले तरी हर हर महादेवला सगीत दिल्यामुळे आपली लायकी कमी होते असे मानत तरी नाहीत. ■ ■

## १ सप्टेंबर...

मुखपृष्ठावरून

हवी. अलगपणे, तुटकतुटक पद्धतीने विचार करून भ्रष्टाचाराचा सहस्रमुखी राक्षस नष्ट करता येत नाही हे आता गुजराथ-बिहारच्या आंदोलनानतर तरी पुरेसे स्पष्ट झालेले आहे. जयप्रकाशांना बिहारच्या आंदोलनाची व्याप्ती यासाठीच हळूहळू वाढवत न्यावी लागली. विधानसभा विसर्जन ते शिक्षणात क्रांती एवढा लांबचा पल्ला त्यांना अल्प मुदतीतच काटावा लागला तो यासाठीच. दाडेकरांच्या उपाययोजनेची दिशा नेमकी उलट आहे. आदोलन यामुळे एका विशिष्ट वर्तुळातच फिरत राहण्याचा धोका आहे. ते व्यापक क्षेत्रात खेचून आणण्यासाठी या उपाययोजनेला आणखी काही कृतीची जोड देणे म्हणूनच अवश्य वाटते.

३ : अशी जोड देण्याचे प्रयत्न महाराष्ट्रात ठिकठिकाणी सुरूही आहेत. ऑगस्ट २४।२५ ला धुळे येथे एक महाराष्ट्रव्यापी भ्रष्टाचार निर्मूलन परिषद योजली गेली होती. आण्णासाहेब सहस्रबुद्धे, एस्. एम्. जोशी, गोविंदभाई श्रॉफ, उत्तमराव पाटील, दत्ता ताम्हाणे, आर. के. पाटील, नरुभाऊ लिमये, इत्यादी मान्यवर मडळी या परिषदेस उपस्थित राहिली व सर्वांनी एकमताने काही कार्यक्रमांवर शिक्कामोर्तबही केले. दाडेकरांनी सुचविलेल्या कार्यक्रमाव्यतिरिक्त या परिषदेने सुचविलेले आणखी काही कार्यक्रम असे आहेत—

१. जीवनावश्यक वस्तूंचे साठे बाजारात आणले जावेत. २. गावातील जनतेच्या प्रयत्नाने गावात दारुबदी घडवून आणण्यासाठी आवश्यक पावले उचलावीत. ३. लॉटरी वगैरेसारख्या जुगारांना गावात उत्तेजन मिळणार नाही याचा प्रयत्न करणे. ४. ग्रामीण आवश्यकतेइतके धान्य गावात राहिल्यानंतरच लेव्ही देण्यात यावी. गावातील भूमिहीनांना हे धान्य योग्य भावात मिळवून द्यावे. ५. रोजगार हमी योजना ताबडतोब अंमलात यावी म्हणून गावकऱ्यांनी मोहीम सुरू करावी. ६. सामाजिक जातिभेद नष्ट करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षणाचे कार्य हाती घ्यावे. ७. आदिवासीवर होणाऱ्या सर्व प्रकारच्या अन्यायांचा सघटित विरोध करणे. ८. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचारविरोधी आंदोलन उभारणे. ९. सपूर्ण स्वदेशीचा स्वीकार करण्यासाठी व विदेशी वस्तूंचा बहिष्कार करण्यासाठी चळवळ उभारणे. १०. शासन कार्यक्षम, निकोप व सुदृढ व्हावे यासाठी लोकमताची निर्मिती करावी.

थोडक्यात महाराष्ट्रातील प्रातिनिधिक लोकमत भ्रष्टाचार-निर्मूलनाची व्याप्ती याप्रकारे वाढावी यासाठी प्रयत्नशील आहे तर प्रा. दांडेकर ही व्याप्ती अत्यंत कमी करू पाहत आहेत. एकीकडे अतिव्याप्ती आहे, दुसरीकडे अव्याप्तीचा दोष आहे. शेवटी निर्णय ह्या कार्यकर्त्यांनी घ्यायचा आहे. ही दोन्ही टोके टाळून, जास्तीत जास्त लोकांना बरोबर घेऊन जाणारे निर्णय कार्यकर्ते घेतील तर ते उचित ठरणार आहे. □


# टॉलस्टाय एक माणूस

सुमती देवस्थळे

लवकर प्रसिद्ध होत आहे.

मूल्य २५ रुपये

राजहंस प्रकाशन


राजहंस प्रकाशन सस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर